# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, सोमवार ७ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०




# मुख्यमंत्र्यांनी केली सपत्नीक विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीची शासकीय महापूजा



## राज्याच्या प्रगती आणि शेतक-यांच्या कल्याणाची प्रार्थना


**सोलापूर/प्रतिनिधी** : पंढरपुरात आषाढी एकादशीनिमित्त भव्य उत्सव साजरा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्नीसह शासकीय महापूजा केली. राज्याच्या प्रगती आणि शेतक-यांच्या कल्याणाची प्रार्थना करण्यात आली. लाखो भाविकांनी पंढरपूरला भेट दिली. अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर..., अशा जयघोषात पंढरपुरी नगरी दुमदुमली आहे. विठ्ठलनामाच्या गजरात आणि लाखो भक्तांच्या उपस्थितीत आज पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीची महापूजा पार पडली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्नी अमृता फडणवीस यांच्यासह पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीची शासकीय महापूजा केली. राज्याची भरभराट व्हावी आणि शेतकरी सुखी व्हावा, यासाठी मुख्यमत्र्यांनी विठ्ठल चरणी प्रार्थना केली.

आषाढी एकादशीनिमित्त आज मध्यरात्री २.३० वाजताच्या सुमारास पारंपरिक पूजा संपन्न झाली. या पूजेसाठी पंढरपुरातील विठ्ठल मंदिराला आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते. यामुळे मंदिराचे पावित्र्य अधिकच खुलले होते.या वर्षीच्या शासकीय पूजेचा मान सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील पिंप्रद येथील शेतकरी दाम्पत्य बाळासाहेब पाटील आणि श्रीमती शोभा पाटील यांना मिळाला. मुख्यमंर्त्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या हजारो वारक-यांनी आणि भाविकांनी चंद्रभागेच्या तीरावर आणि पंढरपूरच्या मार्गांवर अलोट गर्दी केली होती. या सर्वांना विठ्ठलाच्या दर्शनाची आस लागल्याचे पाहायला मिळत होते. या पूजेदरम्यान विठ्ठलाच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंर्त्यांनी आणलेला खास पोशाख विठ्ठलाला परिधान करण्यात आला. यानंतर विठ्ठलाची आणि रुक्मिणी मातेची आरतीही मुख्यमंर्त्यांच्या हस्ते करण्यात आली. विशेष म्हणजे, मुख्यमंर्त्यांची पूजा सुरू असतानाही सर्वसामान्य भाविकांसाठी मुखदर्शनाची रांग सुरु होती. त्यासोबतच व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले. यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला. राज्यभरातून सुमारे २० ते २२ लाख वारकरी आणि भाविक पंढरपुरात दाखल झाले होते. वारकरी परंपरेत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंगाला पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करताना दरवेळी एक नवीन उर्जा मिळते. ही आपली संस्कृतीच अलौकिक आहे. विठ्ठल-रखुमाई हे आपले आराध्य दैवत आहे. सर्व वारक-यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी व सन्मार्गाने चालण्याची बुद्धी द्यावी तसेच बळीराजाला सुखी ठेवण्याची शक्तीही द्यावी अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठुरायाकडे केली. या सोहळयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या पूजेनंतर मुख्यमंर्त्यांनी वारक-यांशी संवाद साधून त्यांना आषाढी एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.



## पंढरपूर नगरीत भक्तीचा महापूर, वारक-यांचा महासागर; दर्शनासाठी पाच किलोमीटरपर्यंत रांग...!

**सोलापूर** : आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली आहे. पोलिसांनी, प्राथमिक अंदाजानुसार पंढरपुरात सध्या १५ ते २० लाख भाविक असल्याची माहिती दिली आहे.आज पहाटे मुख्यमंत्री यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय पूजा संपन्न झाली. पंढरपुरातील दर्शनाची रांग पाच किलोमीटर अंतरापर्यंत पसरली आहे. मागील तीन दिवसांपासून विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करीत आहेत. देशाच्या विविध राज्यातील व राज्याच्या कानाकोप-यातील भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. चेंगराचेंगरी सारखा प्रसंग घडू नये यासाठी सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मंदिर परिसरातील प्रमुख १४ मार्गावर पोलिसांनी नियोजन करून गर्दी आटोक्यात आणली आहे. प्रत्येक मिनिटाला साधारणपणे ३० ते ३५ भाविक दर्शन घेत असल्याची माहिती मंदिर समितीने दिली.





## विदर्भात 24 तासांत अतिजोरदार पावसाचा इशारा

**नागपूर :** येत्या २४ ते ४८ तासात चंद्रपूर व गडचिरोलीसह विदर्भात जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विभागाने याबाबत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. पूर्व विदर्भात दोन दिवस शांत राहिलेले ढग मुसळधार बरसण्याची शक्यता आहे. ईशान्य अरबी समुद्रात सध्या कुंड तयार झाला आहे, जो पश्चिम बंगालमध्ये गंगेच्या खो-यात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याकडे सरकत आहे. तिथून उत्तर गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड व झारखंड होत दक्षिणेकडे सरकत आहे. या प्रभावानेच ७ जुलै रोजी चंद्रपूर, गडचिरोली व गोंदियात अत्याधिक जोराचा पाउस होईल, असा वेधशाळेचा अंदाज आहे. याशिवाय नागपूर, भंडारा, वर्धा व अमरावती जिल्ह्यात अतिजोरदार पावसाची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. त्यानंतर ८ जुलै रोजी नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात अतिजोरदार पावसाचे सत्र कायम राहिल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. सोबत विजा व ढगांचा जोरात गडगडाट होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा वेधशाळेने दिला आहे. दरम्यान पूर्व विदर्भात दोन दिवस ढग शांत राहिले. चंद्रपूरला रविवारी सकाळपर्यंत पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. गोंदिया जिल्ह्यात तुरळक पावसाची हजेरी लागली. नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली भागात हलकी रिपरिप झाली. पश्चिम विदर्भात मात्र चांगल्या सरी बरसल्या. रात्री अकोला ३० मि.मी.. अमरावती १०.६ मि.मी.. यवतमाळ १५.५ मि.मी. चांगला पाउस झाला. यवतमाळला रविवारी दिवसाही १८ मि.मी. पावसाची नोंद झाली. बुलडाणा जिल्ह्यातही २१ मि.मी. नोंदीसह जोरात पाउस झाला.

## वडाळा येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सपत्निक पूजा

**मुंबई/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर वडाळा येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात जाउन सपत्निक विठुरायाची पूजा केली. प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाणा-या वडाळा येथील विठ्ठल-रखुमाई मंदिराच्या विकास, सुशोभीकरण आणि सोयी-सुविधांच्या कामासाठी २५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यानुसार लवकरच या प्राचीन मंदिरातील अंतर्गत विकास आणि परिसराच्या सुशोभीकरण कामाला सुरुवात करण्यात येईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.वडाळा येथील विठ्ठल-रखुमाईचे मंदिर हे १६व्या शतकातील मंदिर असून हे प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते.



संत तुकाराम महाराजांच्या हस्ते या मंदिरात विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. ज्या भाविकांना आषाढी वारीला पंढरपूरला जाणे शक्य होत नाही ते भाविक वडाळा येथे येउन विठुरायाचे दर्शन घेतात. आषाढी वारीच्या दिवशी पंढरपूरइतकीच गर्दी आणि उत्साह याही ठिकाणी पहायला मिळतो. आज या प्राचीन मंदिरात विठ्ठलाची पूजा करण्याचे सौभाग्य मिळाल्याबद्दल शिंदे यांनी यावेळी आनंद आणि समाधान व्यक्त केले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पत्नी सौ. लता शिंदे, आमदार कालिदास कोळमकर, आमदार प्रसाद लाड, आमदार मनीषा कायंदे, शिवसेना प्रवक्त्या सौ. शीतल म्हात्रे, शिवसेनेचे सह-मुख्य प्रवक्ते राजू वाघमारे, माजी नगरसेवक अमेय घोले आणि महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रवासी बस नदीत कोसळली; 2 ठार, 25 जण जखमी

**जळगाव** -प्रवाशांनी भरलेल्या खासगी बसला भीषण अपघात झाला आहे. यावल तालुक्यातील फैजपूर-अमोदा मार्गावर मोर नदीच्या पुलाजवळ इंदोरकडून भुसावळकडे येणारी खासगी ट्रॅव्हल्स नदीवरील पुलावरून १५ फूट खोल नदीपात्रात कोसळली. या भीषण दुर्घटनेत २ प्रवासी ठार झाले असून २५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यात हा भीषण अपघात सकाळी सातच्या सुमारास घडला आहे.दरम्यान इंदोर येथून खासगी बस भुसावळकडे येत होती. फैजपूर-अमोदा दरम्यान असलेल्या मोर नदीवरील पुलावरून जात असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. यानंतर बस पुलाचा कठडा तोडून थेट १५ फूट खोल असलेल्या नदीमध्ये कोसळली.

## भीमा कोरेगाव प्रकरणाचा अहवाल लवकरच सादर होणार

### युक्तीवाद पूर्ण, 85 जणांची झाली उलटतपासणी

**नागपूर/प्रतिनिधी:** भीमा कोरेगावदिनी झालेला हल्ला हा सुनियोजीत कट होता. मुलतत्ववादी संघटनेने तो घडवून आणला होता. त्यांचे पितळ उघडे पडले. पोलीस यंत्रणांचे अपयशही यातून पुढे आले. याप्रकरणीचा युक्तीवाद आता पूर्ण झाला आहे. यात शरद पवार, प्रा. जोगेंद्र कवाडे, ॲड. प्रकाश आंबेडकरांसह जवळपास ८५ जणांची उलटतपासणी करण्यात आली. याप्रकरणी गठीत आयोगाचा अहवालही तयार असून तो लवकरच सरकारला सादर होईल. इतिहासाला विकृत स्वरूप देण्याचा मुलतत्वादी संघटनेचा प्रयत्न फसला असून, सरकारनेच भीमा कोरेगावचा इतिहास सत्य असल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे न्याय मिळेल अशी अपेक्षा या प्रकरणात न्यायालयात लढा देणारे ॲड. किरण चन्ने यांनी येथे व्यक्त केली. एका कार्यक्रमासाठी ते नागपुरात आले असता पत्रकारांशी बोलत होते. ॲड. किरण चन्ने म्हणाले, भीमा कोरेगावचा इतिहास खोटा असल्याचा जोरदार प्रयत्न झाला. ऐतिहासिक दस्ताऐवज आणि मिलीट्री पुस्तक, सिंबॉल आदी पुरावे सादर करण्यात आले. राज्य सरकारने सुद्धा भीमा कोरेगावचा इतिहास हा सत्य असल्याचे विधिमंडळात मान्य केल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.






# गरीबांच्या संख्येत वाढ

■ संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे

■ मंत्री गडकरींकडून सरकारला कानपिचक्या

**नागपूर/प्रतिनिधी:** देशात आर्थिक विकास होत असला, तरी त्याचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहचत नाही, हीच खरी चिंतेची बाब आहे असे वक्तव्य करत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी वाढत्या आर्थिक विषमतेकडे लक्ष वेधले आहे.नितीन गडकरी पुढे बोलताना म्हणाले की, हळूहळू गरीबांची संख्या वाढते आहे आणि संपत्ती काही मोजक्या श्रीमंतांच्या हाती केंद्रित होते आहे अशी स्थिती देशासाठी आरोग्यकारक नाही. संपत्तीचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे.



ग्रामीण भागाचा विकास आणि रोजगार निर्मिती हाच आपल्या अर्थव्यवस्थेचा खरा पाया असायला हवा, असेही त्यांनी नागपूर येथील एका कार्यक्रमात बोलताना म्हटले आहे. नितीन गडकरी म्हणाले की, आपण एकाच ठिकाणी संपत्तीचा संचय करतो आणि त्याचा सर्वसामान्यांवर परिणाम होतो. हे रोखणे गरजेचे आहे. तर माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव आणि माजी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक उदारीकरण धोरणांचे त्यांनी कौतुक केले, पण अनियंत्रित आर्थिक केंद्रीकरणावर त्यांनी थेट टीका केली.

### शेतीची दुर्दशा

**अधोरेखित-** भारताच्या जीडीपीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा ५२-५४ टक्के, उत्पादन क्षेत्राचा २२-२४ टक्के, तर ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असूनही, तिचे योगदान केवळ १२ टक्क्यांवरच मर्यादित आहे, याकडे गडकरींनी लक्ष वेधले. ही असमानता दूर करणे आपल्या धोरणांचे केंद्रबिंदू असायला हवे असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. रस्ते बांधकाम संदर्भात केंद्रीय मंत्री गडकरी यांनी स्पष्ट केले की, माझ्या विभागाकडे निधीची कमतरता नाही. उत्पन्न प्रकल्प पूर्ण करणा-या सक्षम लोकांची गरज आहे. सध्या टोलमधून ५५ हजार कोटींचे उत्पन्न असून, पुढील दोन वर्षांत हे उत्पन्न १.४० लाख कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. हे उत्पन्न चलनीकरण केल्यास १२ लाख कोटींच्या गुंतवणुकीची क्षमता निर्माण होते, अशी माहितीही त्यांनी दिली. चार्टर्ड अकाउंटंट्सच्या भूमिकेबाबतही नितीन गडकरी म्हणाले की, सीए हे केवळ कर सल्लागार नसून, अर्थव्यवस्थेच्या वाढीचे इंजिन ठरू शकतात.

## 8 व 9 जुलै रोजी बंद राहणार राज्यातील सर्व शाळा

**मुंबई :** अनुदान आणि लाभांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यात सरकारकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांनी ८ आणि ९ जुलै रोजी महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद ठेवल्या आहेत. राज्यभरात दोन दिवसांच्या शाळा बंदची दखल घेण्याचे आवाहन पालक आणि विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या कर्मचा-यांनी हे आंदोलन पुकारले आहे. राज्य सरकारने वारंवार आश्वासन देउनही त्यांच्या तक्रारींचे निवारण झाले नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्था तात्पुरती विस्कळीत होण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षी, अनुदानित शाळांसाठी वाढीव आर्थिक अनुदानाच्या मागणीसाठी शिक्षक आणि कर्मचा-यांनी १ ऑगस्ट २०२४ पासून ७५ दिवस राज्यव्यापी निदर्शने केली. सरकारने त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी, नंतर १४ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या अधिकृत सरकारी ठरावात (जीआर) निधी वाटप करण्यात ते अपयशी ठरले, ज्यामुळे नवीन नाराजी निर्माण झाली. १० ऑक्टोबर २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंर्त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनुदानित शाळांना अनुदानाचा पुढील हप्ता देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

## महापालिका निवडणुकांमध्ये काँग्रेसची स्वबळाची तयारी?

**मुंबई/प्रतिनिधी:** आगामी महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी मोठ्या प्रमाणात महायुतीत प्रवेश करताना पाहायला मिळत आहेत. यातच ठाकरे बंधू एकत्र येण्याचा कयास बांधला जात आहे. यातच राज ठाकरे महाविकास आघाडीत सामील होणार की, फक्तउद्धव ठाकरेंशी युती करणार, यावरूनही राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लावले जात आहेत. या घडामोडी सुरू असतानाच काँग्रेसमधून मात्र आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढल्या पाहिजेत, असा सूर उमटत असल्याचे बोलले जात आहे. ठाकरे बंधूंच्या मुंबईतील मेळाव्याला शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड आणि लहान मित्रपक्षांचे काही नेते उपस्थित होते, पण काँग्रेसचा एकही बडा नेता उपस्थित नव्हता. मराठी-हिंदीच्या वादात न पडण्याची भूमिका काँग्रेसने घेतल्याचे दिसले. उद्धव-राज भविष्यातही एकत्र आले तर महाविकास आघाडी राहील का आणि त्यात काँग्रेस राहील का, हा विषय आता चर्चिला जात आहे. यातच ग्रामीण आणि निम-शहरी भागांत काँग्रेसने पुन्हा एकदा आपली पकड मजबूत करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीत न लढता स्वबळावर लढाव्यात. निसटून चाललेला एकेक भाग पुन्हा काबीज करावा, असे काँग्रेसमधील काही नेत्यांचे म्हणणे आहे, असे समजते.



## टीम इंडियाचा बर्मिंगहॅममध्ये ऐतिहासिक विजय

### ● इंग्लंडचा 336 धावांनी धुव्वा ● आकाश दीपच्या 5 विकेट्स

**बर्मिंगहॅम/वृत्तसंस्था- :** आकाश दीप आणि मोहम्मद सिराज या वेगवान गोलंदाजांच्या जोडीने केलेल्या धारदार बॉलिंगच्या जोरावर भारतीय कसोटी संघाने इंग्लंडच्या भूमीत शुबमन गिल याच्या नेतृत्वात इतिहास घडवला आहे. टीम इंडियाने इंग्लंडचा बर्मिंगहॅममधील दुस-या कसोटी सामन्यात ३३६ धावांनी धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. टीम इंडियाने इंग्लंडसमोर विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र गोलंदाजांनी इंग्लंडला ६८.१ ओव्हरमध्ये २७१ रन्सवर गुंडाळले. भारताने यासह कसोटी क्रिकेटच्या इतिहासात बर्मिंगहॅममध्ये पहिलावहिला विजय मिळवला. भारताने यासह ५ सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी केली. भारताने अशाप्रकारे लीड्समधील पहिल्या पराभवाची परतफेड केली. इंग्लंडने टॉस जिंकून भारताला फलंदाजीसाठी भाग पाडले. भारताने कर्णधार शुबमन गिल याच्या ऐतिहासिक द्विशतकी खेळीच्या जोरावर पहिल्या डावात ५८७ धावांचा डोंगर उभारला. शुबमनने २६९ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने ८७ तर रवींद्र जडेजा याने ८९ धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरने ४२ आणि करुण नायर याने ३१ धावा जोडल्या.






# एमडी विक्रेता जेरबंद, ८.८८ लाखांचा साठा जप्त

## पाटीपुरा येथील घटना, शहरात ड्रग्ज रॅकेटला धक्का



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात तरुणांच्या जीवनाशी खेळणाऱ्या 'एमडी माफिया'ला पोलिसांनी मोठा झटका दिला आहे. पाटीपुरा येथील 'इमरान ऊर्फ मुम्मू' नावाच्या तरुणाकडून तब्बल ७५.७९० ग्रॅम 'मेफेड्रॉन' (एमडी) ड्रग्ज जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत तब्बल ८ लाख ८८ हजार ४५० रुपये इतकी आहे. अमरावती पोलिसांची अंमली पदार्थ विक्रीविरोधातील मोहिमेत ही सर्वात मोठी कामगिरी मानली जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या तरुणाचा संपर्क थेट मुंबईतील एमडी रॅकेटशी जोडलेला असल्याची माहितीही पुढे येत आहे.नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांना 'इमरान सलीम खान' (वय २६, रा. पाटीपुरा) ड्रग्ज विक्रीमध्ये सक्रीय असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी मागील १२ दिवस इमरानवर गुप्त नजर ठेवली. रविवारी संधी साधून पाटीपुरा परिसरात त्याच्या मोपेडची झडती घेतली असता एमडीचा साठा हाती लागला. तत्काळ फॉरेन्सिक तज्ज्ञ व पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करून ड्रग्ज व वाहन जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, डीसीपी गणेश शिंदे व एसीपी अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

### मुंबई-अमरावती ड्रग्ज लिंकचा तपास सुरू!

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, एमडीचा साठा मुंबईहून अमरावतीत येत होता. इमरानने यापूर्वी कोणाला माल विकला? त्याचे 'नेटवर्क' किती मोठं आहे? हे समजून घेण्यासाठी तपास सुरु आहे. 'शहरात एमडी विकणाऱ्यांचा पूर्ण पर्दाफाश होईल, एकाही टोळीला सोडणार नाही,' असा इशारा पो.नि. उरलागोंडावार यांनी दिला आहे.



# पुसद मध्ये अवतरली पंढरी!

## दर्शनासाठी भाविकांची अफाट गर्दी



पुसद/प्रतिनिधीः-

विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढी एकादशीनिमित्त पुसद शहरात अवघी पंढरी अवतरली होती.विठ्ठल मंदिरासह विठुनामाच्या गजराने शहर भक्तिमय झाले होते. ज्ञानेश्वर संस्थान तर्फे मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त विविध जन उपयोगी कार्यक्रम घेण्यात आले.विठ्ठल मंदिरात पुसद तालुक्यातील भाविकांनी विठ्ठल दर्शनासाठी गर्दी केली होती.महिला पुरुष अबाल वृद्ध यांनी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. ज्ञानेश्वर संस्थानच्या विठ्ठल मंदिरात विविध सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले.पहाटे ३ वाजता महापूजा करण्यात आली. त्यानंतर ज्ञानेश्वरीचे सामूयिक पारायण झाले. सकाळपासून तर सायंकाळपर्यंत भजन व भक्तिगीतांचे कार्यक्रम झाले.ज्ञानेश्वर मंदिर संस्थानतर्फे यानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले.तसेच नागरिकांकडून देहदानाचे संकल्प पत्र भरून घेण्यासाठी स्टॉल लावण्यात आले. झाडे लावा झाडे जगवा,बेटी बचाओ-बेटी पढाओ, करा योग-रहा निरोग, पाणी अडवा-पाणी जिरवा आदींचे फलक लावून भाविकांमध्ये जनजागृती करण्यात आली.भाविकांची मोफत चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली. साबुदाण्याची उसळ व लाडू प्रसाद म्हणून देण्यात आला.या सोहळ्यानिमित्त बसस्थानक-गुजरी चौक ते परत एसटी स्टॉप पर्यंत भाविकांना निशुल्क वाहनांची सुविधा ज्ञानेश्वर संस्थानने उपलब्ध करून दिली.दिव्यांग भाविकांसाठी व्हील चेअर उपलब्ध करून देण्यात आल्या.त्यांना थेट दर्शनाचा लाभ देण्यात आला. कार्यक्रमासाठी १४०० सेवाधारी,मंदिर प्रशासनाचे कर्मचारी तैनात होते.पोलिस प्रशासन व नगरपालिका,विद्युत महामंडळ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# विठू-माउलीचा गजर...



### पालखी व पदयात्रेने दुमदुमली गुरुकुंजनगरी -रामकृष्णहरी मंदिर दासटेकडीवर आषाढी एकादशी महोत्सव -प्रति पंढरपूरात भक्तांची मांदियाळी

**तिवसा/प्रतिनिधीः-**

'विठ्ठल.. विठ्ठल.. विठ्ठला..पांडुरंग विठ्ठला 'च्या जयघोषात परिसरातील श्री क्षेत्र गुरुकुंजातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी पासून ते रामकृष्णहरी विश्वमानव मंदिर दासटेकडी पर्यंत टाळ मृदुंगाच्या गजरात,भगवी पताका उंच थिरावत आषाढी एकादशीनिमित्त भव्य पालखी व पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रा व पालखी दरम्यान विठ्ठल रखुमाई यांची वेशभूषा परिधान केलेली बहुरुपी आकर्षनाचा केंद्र बिंदू ठरले.विठू नामाच्या गजराने अक्षरशः गुरुकुंजनगरी दुमदुमून गेली होती. गुरुकुंजातील राम कृष्ण हरी विश्वमानव मंदिर दासटेकडी म्हणजे विदर्भातील दुसरं मिनी पंढरपूर असे म्हटल्या जाते. याठिकाणी आषाढी एकादशी निमित्त भाविकांची दर्शन घेण्यासाठी मांदियाळी होते. विदर्भातील जे वारकरी भक्त पंढरपूरला जाऊ शकत नाही ते प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दासटेकडी येथील रामकृष्णहरी मंदिर येथे येऊन समाधान व्यक्त करतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संकल्पनेतून हे मंदिर साकारण्यात आले आहे.या ठिकाणी शेकडो भाविक पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी येतात. जे भाविक पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी काही कारणास्तव जाऊ शकत नाही ते आषाढी एकादशीच्या दिवशी गुरुकुंजातील दासटेकडी येथे दर्शनासाठी येतात व येथील दोन दिवसीय कार्यक्रमाचा लाभ घेतात.आज सकाळपासूनच याठिकाणी भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली असून आज पहाटे चार वाजता रामकृष्णहरी भगवंताची पूजा व अभिषेक करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी गुरुकुंजातुन निघालेल्या मानाच्या पालखी व पदयात्रेचे प्रवेशद्वारावर अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ तर्फे पूजन व भव्य स्वागत करण्यात आले. दुपारी १२ वाजताच्या दरम्यान 'अभंग रंगले पांडुरंगी', हा अभंगवाणीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. याकरिता अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ , मानव सेवा छात्रालयातील विद्यार्थी, व भाविक मोठया प्रमाणात सहभागी झाले होते.एक सूर,एक ताल याप्रमाणे येथील विठू नामाचा गजर पाहण्यासारखा होता.सायंकाळी सामुदायिक प्राथनेने आयोजित कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# शासकीय गोदामातील सोयाबीन चोरीप्रकरणी टोळी गजाआड

## ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई; ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-**

दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या शासकीय गोदामातून तब्बल २७ गोण्या सोयाबीन आणि तूर चोरी प्रकरणी पाच जणांच्या टोळीला ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून एक क्विंटल सोयाबीन, दुचाकी असा एकूण ९० हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपींमध्ये मयूर प्रमोद कांबळे (वय २६, रा. धामणगाव रेल्वे), जितेंद्र जगदेव वानखडे (वय २७, रा. धामणगाव रेल्वे), नीलेश अशोक शेंडे (वय ३५, रा. आसेगाव, धामणगाव रेल्वे), सचिन सदाशिव राऊत (वय ३६, रा. धामणगाव रेल्वे), अमन व्यास (रा. दत्तापूर) यांचा समावेश आहे.

२० ते २२ जून २०२५ दरम्यान रात्रीच्या सुमारास, दत्तापूर येथील शासकीय विश्रामगृह परिसरातील गोदामाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी २७ गोण्या सोयाबीन व तूर (एकूण किंमत अंदाजे ८७,०६० रुपये) असा माल चोरीला नेला होता. धामणगाव रेल्वे येथील तहसील कृषी अधिकारी यांनी २३ जून रोजी दत्तापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. जिल्ह्यातील वाढत्या चोरीच्या घटनांकडे लक्ष देत पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा तपास तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांनी विशेष पथक तयार केले. पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू असताना, चांदूर रेल्वे विभागातून माहिती मिळाली की धामणगाव रेल्वे येथील मयूर कांबळे व त्याचे साथीदारच या चोरीमागे आहेत. या माहितीवरून पोलिसांनी कॉटन मार्केट चौकातून मयूर कांबळेला ताब्यात घेऊन चौकशी केल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली व इतर चार साथीदारांची माहिती दिली. त्यानंतर उर्वरित आरोपींनाही अटक करण्यात आली.

# १ व १० वरिल उर्वरित

### मोटरसायकल व स्कूटीचा अपघात

एच.२७ डी यु ६५०९ ने अप्पर वर्धा धरण बघण्यासाठी गेल्या होत्या.परत येत असतांना नकुल राजेश नवले (वय २३ रा.अंतोरा) हा आपली मोटर सायकल क्र.एम एच २७ एपी २७६५ ने अंतोरा येथे जात असतांना या दोन्ही दुचाकी वाहनांची आमने-सामने जबर धडक झाली.या अपघातात नकुल नवले याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल पंडागरे,रवी परतेती, श्याम मोरे,यश पांडे, अभिषेक झोड,तेजस नागले यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक व जखमींना इरफान यांच्या ॲम्बुलन्सद्वारे उपजिल्हा रुग्णालय दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जखमींवर औषधोपचार केल्यानंतर एका महिलेसह दोन तरुणीला अतिशय गंभीर मार बसल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे रवाना केले. पुढील तपास पोलीस करीत आहे.

### जुन्या वादातून कुत्र्याला

त्यांना कुत्र्याचे अंगावर चार ते पाच मोठ्या मोठ्या जखमा झालेल्या होत्या. कुत्रा मरणासन्न अवस्थेत पडलेला होता . बावऱ्या कुत्र्याची अवस्था पाहून पाठक यांच्या डोळ्यात पाणी आले.

दरम्यान पशुप्रेमी उषा पानसरे यांनी तात्काळ तेथे पशुंचे डॉक्टर बोलावून त्याच्यावर उपचार सुरू केला होता व असदपूर पोलीस स्टेशन शी संपर्क साधला. घटनेची माहिती दिली. चौकशीसाठी बिट जमदार घोडकर घटनास्थळी आले. त्यांनी पाठक यांना आसेगाव पोलीस स्टेशनला आणून फिर्याद नोंदवून घेतली.

### विठ्ठल नामाच्या जयघोषात पार

अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. पुढील टप्प्यात आज दि. ६ जुलै, रविवार रोजी आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने या अभियानांतर्गत राजापेठ प्रभागातील हरिओम कॉलनीच्या विठ्ठल-रुख्मिणी मंदिर परिसरातील साफसफाई करण्यात आली. दरवर्षी या मंदिरात आषाढी एकादशी निमित्त परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने दर्शनाला येत असतात. तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देखील आषाढीनिमित्त केले जात असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या मंदिर सभोवतालच्या परिसरात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र युवक कॉंग्रेसच्या 'स्वच्छता वारी' आंदोलनाच्या इशाऱ्याने मनपाची यंत्रणा खडबडून जागी झाली. युवक कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या मेहनतीने मनपाच्या यंत्रणेच्या सहाय्याने परिसरातील कचरा उचलून स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवली. परिसरातील नागरिकांनीही यावेळी युवक कॉंग्रेसच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला व युवक कॉंग्रेसच्या अभियानाचे स्वागत केले.

यावेळी माजी नगरसेवक मुन्ना राठोड, नितीन गौरखेडे, दिलीपराव कदम, राजेश फिस्के, प्रकाश पुसदकर, निलेश मसदकर, गजानन रेवाळकर, सागर बिजवे, सचिन काळे, काकर्डे, प्रफुल्ल ठाकरे, अमोल पुसदकर, संकेत पांडे व परिसरातील इतर नागरिक व दर्शनाला आलेले इतर भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवक कॉंग्रेसच्या या शहर स्वच्छता अभियानात समीर जवंजाळ, वैभव देशमुख, योगेश बुंदेले, संकेत साहू, शुभम बांबल, मोहीत भेंडे, श्रेयस धर्माळे, शंतनु देशमुख, प्रियल मोहोड, अंकुश टोपले, शुभम हिवसे, ओम कुबडे, वेदांत केने, अभय देशमुख, साईप्रसाद जाधव, सुशांत कोते या युवक कॉंग्रेस व एनएसयुआयच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### जि.प.उर्दु शाळेत शिक्षकांच्या

शिक्षकांची नेमणूक होत नाही, तोपर्यंत ते आपली मुले शिक्षणापासून दूर ठेवतील, अशी चेतावनी त्यांनी तालुका गट शिक्षण अधिकाऱ्यांना दिली आहे.

प्राप्त माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागात उर्दू माध्यमाच्या एकूण १३ जिल्हा परिषद शाळा आहेत. यामध्ये एकूण ३८ शिक्षकांची गरज आहे. मात्र, मे महिन्यात बऱ्याच शिक्षकांचे इतर तहसीलमध्ये बदली झाल्यामुळे सध्या १६ शिक्षकांची कमतरता आहे. १३ शाळांपैकी सर्व शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. विशेष म्हणजे ,कापुसतळणी,विहीगांव, कसबेगव्हान,नारायनपुर शाळेत तीन-तीन शिक्षक,व मुऱ्हा देवी,चौसाळा गावातील शाळेत तर एकही शिक्षक नाही.या स्थितीवर उपाय म्हणून पालक व स्थानिक नागरिकांनी तालुका गट शिक्षण अधिकारी सुधीर खोड़े यांच्याकडे तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये नवीन शिक्षकांची तातडीने नेमणूक करण्याची मागणी केली आहे.प्रभारी गटशिक्षण अधिकारी सुधीर खोड़े यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून पवित्र पोर्टवर निवड झालेल्या नवीन उर्दू माध्यमाच्या शिक्षकांची नियुक्ती अंजनगाव तालुकातील शाळांमध्ये करण्याची मागणी केली.मात्र, पालकांची वारंवार मागणी असूनही शिक्षण विभागाकडून दुर्लक्ष व हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. या गोष्टीमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य संकटात सापडले आहे. शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा भूमिकेमुळे पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, त्यांनी मुलांना शाळेतून काढून घेण्याचा इशारा दिल्याने संपूर्ण शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

### शोषण करायचं अन् कंपनीराज

सामूहिक आत्महत्या म्हणून नोंद असलेल्या साहेबराव करपे यांचे जन्मगाव चिलगव्हाण (जि. यवतमाळ) येथे १४ जुलै रोजी होणार आहे. या यात्रेत कोणताही पक्षीय झेंडा नाही, असे कडू यांनी यावेळी स्पष्ट केले. ही यात्रा सरकारला दोष देण्यासाठी नाही, तर शेतकऱ्यांना जागवण्यासाठी आहे, असे कडूंनी स्पष्ट केले. मार्गात शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे त्यांनी सांगितले.या देशात धर्म आणि जात दाखवून सामान्य कष्टकरी माणसाला वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. शेती विकायची, शोषण करायचं आणि कंपनीराज आणायचं हे सरकारी षड्यंत्र असल्याची टीका त्यांनी केली. मागील तीन महिन्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी आपल्या हक्कांप्रती जागा झाला, तर सत्तेचे सिंहासन हादरेल, असा इशारा त्यांनी दिला. विठ्ठला, सरकारला शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची सदबुद्धी दे, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.सातबारा कोरा यात्रा केवळ आंदोलन नाही, तर शेतीवर चाललेलं षड्यंत्र उघडं पाडण्याची चळवळ आहे, असे ते म्हणाले. या निमित्ताने शेतकरी व मजूर एकत्र आले, तर सत्ताधाऱ्यांची झोप उडेल. त्यांच्या पँट ओल्या होतील, असे ते म्हणाले.सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाने साडे तीन लाख शेतकरी कुटुंबातील महिलांचे सिंदूर पुसले. ही यात्रा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा मूक आक्रोश असून, सत्ताधाऱ्यांना हा आक्रोश महागात पडेल, असे ते म्हणाले. मजुरांना सहा महिन्यांपासून मजुरी नाही, हा सरकारचा असंवेदनशील चेहरा असल्याचे ते म्हणाले.

काम करणाऱ्यांचे महत्त्व सरकारला नाही. शेतमजूर, विधवा, दिव्यांग यांच्या हक्कांवर सरकार गदा आणत असल्याची टीका त्यांनी केली. मग्रारोहायो योजनेत पेरणी समाविष्ट करून, विधवा-दिव्यांग शेतकऱ्यांना यात जोडण्याची मागणी, त्यांनी यावेळी केली. शेतीचं व्यापारीकरण सुरू असून राज्यात कारखानदारांची हुकूमशाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चार लाख कोटींचा खत-औषध व्यापार आहे, पण शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेणखताला सबसिडी नाही, हे धोरण बदलविण्याची गरज आहे, असे कडू म्हणाले.

आज पंढरपुरच्या विठुरायाचे दर्शन नाही झाले. परंतु धरतीवरचा देव शेतकरी त्यांचे देव स्व. वसंतराव नाईक यांच्या समाधीचे दर्शन झाले. आज ७/१२ कोरा यात्रेच्या निमित्ताने हरितक्रांतीचे जनक, माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे जन्मगाव गहुली (ता. पुसद, जि. यवतमाळ) येथील समाधीस्थळी भेट देऊन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यात्रेचा समारोप १४ जुलै रोजी होणार असून, त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आत्मचिंतन करण्यासाठी



१४ जुलै रोजी राज्याला हरितक्रांती देणारे स्व. वसंतराव नाईक यांच्या समाधीस्थळी शेतकरी प्रतिनिधी, कार्यकर्ते एकत्र येऊन आत्मचिंतन करणार आहोत.- बच्चू कडू

### पोलीस आयुक्त चावरीया

संवर्धन यासारख्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

कार्यक्रमादरम्यान पोलीस आयुक्तांनी क्लबच्या कार्याची प्रशंसा करत, रोटरी परिवाराशी जोडले जाणे ही एक सकारात्मक आणि प्रेरणादायी संधी असल्याचे मत व्यक्त केले. त्यांनी रोटरी क्लब अंबिकाचे 'मानद सदस्यत्व' स्वीकृत करत क्लबच्या उपक्रमांना आवश्यक त्या सहकार्याचे आश्वासन दिले.या विशेष प्रसंगी अध्यक्ष रोटे. अमोल चवणे यांनी त्यांना रोटरी बॅच लावून सन्मानित केले. सचिव रोटे. डॉ. लोभस घडेकर यांनी क्लबच्या ध्येयधोरणांची थोडक्यात माहिती देताना, 'रोटरी हे फक्त एक क्लब नसून, समाज परिवर्तनाचे एक शक्तिशाली माध्यम आहे' असे प्रतिपादन केले.या प्रसंगी रोटे. सुरेश मेठी, रोटे. अतुल कोल्हे, रोटे. डॉ. समीर केडिया, आणि डॉ. शशिकांत थोरात यांच्यासह अनेक रोटरी सदस्य उपस्थित होते. पोलीस आयुक्त चावरीया यांना मानद सदस्यत्व बहाल करण्यात आल्याने क्लबच्या सदस्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण दिसून आले.

### अंदाजपत्रक फलक लावण्याचा

विविध स्वरूपाची कामे सुरू आहेत. शहराच्या अनेक मुख्य रस्त्यांसह लहान-लहान रस्त्यांवरही कामांना सुरुवात करण्यात आली आहे. ही कामे करताना संबंधित काम कोणत्या विभागाचे आहे, कामाचे स्वरूप काय आहे, हे काम पूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी काय आहे, संबंधित काम करणारा कंत्राटदार कोण, या कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी पालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, अशा स्वरूपाची सर्व माहिती काम सुरू असलेल्या ठिकाणी नागरिकांसाठी प्रसिद्ध करण्याचे आदेश यापूर्वी काढण्यात आले आहेत. या फलकावर अडचणीच्या वेळी संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी/मोबाइल क्रमांकही नमूद करणे गरजेचे आहे.तसेच कामाचे ठीकाणावर होत असलेल्या कामाचे मंजुर अंदाजपत्रक व नगरपालीका कार्यालयात दर्शनीभागात लावन्याचे नियम आहे. मात्र नगपालिकेतर्फे केल्या जात असलेल्या अनेक कामांच्या ठिकाणी हा नियम सर्रास धुडकावला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. नगपालिकेच्या अनेक विभागांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे एखाद्या कामाचे स्वरूप काय आहे आणि ते किती दिवस चालणार, याची कोणतीही माहिती स्थानिक नागरिकांना किंवा संबंधित रस्त्याचा दैनंदिन स्वरूपात वापर करणाऱ्या नागरिकांना होत नाही.

नगपालिकेतर्फे एखाद्या कामाचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देतानाच, संबंधित कंत्राटदाराला कामाच्या ठिकाणी सर्व माहिती देणारा फलक लावण्याची सूचना केली जाते. तरीही, संबंधित कंत्राटदारांकडून हे माहिती फलक लावण्यास टाळाटाळ केली जात असूनही अटी-शर्तींचा भंग केल्याप्रकरणी नगपालिकेकडून त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. हे अधीकारी एवढे गेंड्याचे कातडीचे आहेत की त्यांचेवर या बाबत लेख्यामध्ये गंभीर ताशोरे ओढल्यवरही ते सर्रास अटीशर्तीचा दिशानिर्देशांचा भंग करत आहेत. ही बाब वाटते तेवढी साधीसरळ नसुन यात नगरपालीकेच्या काही कमीशनखोर अधीका-ृयांचे व कंत्राटदाराचे गैरहेतुने दडवण्यात आलेले कृत्य असुन यात सर्व सामान्य जनतेला कामाबाबत माहीतीच मिळु नये या षडयंत्रातुन कंत्राटदार व प्रशासन यांनी रचलेले कटकारस्थान असल्याची चर्चा शहरात होत आहे.

### केकमध्ये गुंगीचं औषध देऊन

आरोपी त्यांच्या घरी राहायला आला होता. त्यावेळी एका कॉलेजमधील मुलाकडून त्रास होत असल्याचे पीडितेने त्याला सांगितले. त्याने 'मदतीचं' आश्वासन दिलं. काही दिवसांनी पीडिता आपल्या आईसोबत नागपूरला लग्नासाठी गेली असता, आरोपीने तिला केक खायला दिला. केक खाल्ल्यानंतर तिला विचित्र वाटू लागले. डोळ्यांसमोर अंधार पसरू लागला.आणि त्या अस्वस्थतेच्या क्षणीच आरोपीने तिच्या शरीराला स्पर्श करत तिचा विनयभंग केला. ती घाबरून तिथून निघून गेली. या धक्क्यानंतर ती तीन वर्षे शांत राहिली. आरोपीचा नंबरही तिने ब्लॉक केला. मात्र एप्रिल २०२५ मध्ये एका चुलत भावाच्या लग्नात तो पुन्हा तिच्यासमोर आला. त्यावेळी त्याने थेट तिच्या वडिलांना फोन करून 'तिचे फोटो व्हायरल करीन' अशी धमकी दिली. आणि १० लाखांची खंडणी मागितली. या धमक्यांमुळे घरात अस्वस्थता, भीती, आणि असहायता यांचा अंधार पसरला. अखेर या सर्व त्रासाला कंटाळून पीडित तरुणीने धैर्य दाखवत राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर राजापेठ पोलिसांनी त्वरित गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे. नागपूर येथील आरोपीविरुद्ध गुन्हे नोंदवले गेले असून, लवकरच त्याला अटक होण्याची शक्यता आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर-मुख्यमंत्री

## पाच वर्षात कृषी क्षेत्रात २५ हजार कोटींची गुंतवणूक करणार

**पंढरपूर-** शेतकऱ्याला शेती फायद्याची व्हावी यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आगामी काळात शेतीच्या सर्व फिडरचे सौरऊर्जिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या योजनेत महाराष्ट्रात सोलापूर जिल्हा प्रथम असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजित सिंह मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय कृषी सह संचालक दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, शेतीच्या क्षेत्रात यावर्षीपासून येत्या ५ वर्षात दरवर्षी ५ हजार अशी २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. गतकाळात निर्णय घेतल्याप्रमाणे साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल आकारले जात नाही.पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, योजनांची माहिती मिळावी यासाठी कृषी प्रदर्शन भरवावे अशी अपेक्षा सुधाकरपंत परिचारक यांनी



२०१५ मध्ये व्यक्त केली होती. तेव्हापासून दरवर्षी हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये शासनाचे विविध विभाग, कृषी विद्यापीठे यांचे स्टॉल, विविध योजना, वेगवेगळ्या व्यावसायिकांनी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचाही या प्रदर्शनात समवेश आहे. एकात्मिक कीड नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'चा वापर, उत्पादकता वाढविण्यासाठीच्या वेगवेगळी प्रदर्शने या ठिकाणी पहायला मिळत आहे. सेंद्रिय खते, नैसर्गिक खते, वेगवेगळ्या खतांचे मिश्रणे, माती परीक्षण ते कापणीपर्यंत पर्यंतच्या तंत्रज्ञानाची झलक येथे पाहायला मिळते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले, वारकरी आणि शेतकरी वारीच्या दोन बाजू आहेत. शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाची वारीत सहभागी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शेती चांगली आणि सुरळीत करण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करीत आहे. या प्रदर्शनात सुमारे २५० स्टॉलच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, पीएमएफएमई योजना, आत्मा, स्मार्ट प्रकल्प आदींची माहिती देण्यात येत असून या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत चांगली शेती करत आहेत. केळीची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. माशीमुळे डाळिंब आणि इतर फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बॅगेज, ठिबक, मल्चिंग पेपर आदीं योजनांचा फलोत्पादसाठी शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

पणनमंत्री जयकुमार रावल म्हणाले, पंढरपूर बाजार समिती ही उत्कृष्ट बाजार समिती आहे. केळीचे सर्वात मोठे निर्यात हब सोलापूर जिल्हा बनले आहे. मनुके, द्राक्ष, डाळिंबाच्या क्षेत्रात प्रगती करणारा हा जिल्हा आहे. ड्रॅगन फ्रुटची लागवड करण्याचे धाडस तालुक्यात झाले आणि ते यशस्वीही करण्यात आले.लवकरच 'एडीबी'ची योजना राज्यात आणण्याचा प्रयत्न होणार आहे. यामध्ये मार्केट कमिटीची बळकटी करण्यासाठी योजना आणण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. त्यात पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजू गावडे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.




# 'विठ्ठला सरकारला कर्जमाफी देण्याची सदबुद्धी दे'

### बच्चू कडूंची पोस्ट चर्चेत

**अमरावती-** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांवर गेल्या महिन्यात आठवडाभर अन्नत्याग आंदोलन केले. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी आंदोलन स्थगित केले, पण अजूनही ते आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत. बच्चू कडू यांनी समाज माध्यमांवर आषाढी एकादशीनिमित्त मनातल्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या सध्या चर्चेत आहेत.

'विठ्ठला, मागील ३ महिन्यात महाराष्ट्रात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपलं जीवन संपवलंय. दिवसरात्र शेतात राबून बळीराजा साऱ्या जगाचं पोट भरण्यासाठी आपला घाम गाळतो, कष्ट करून जीवाचं रान करतो. पण जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी राजावरच उपाशीपोटी झोपायची वेळ सध्या आलीय.

विठ्ठला, आमची शेतकऱ्याची जात हाय. स्वतःच्या कष्टाचंच आम्ही खातो. फुकट काही मिळायची आमची अपेक्षा पण नसतेय अन तसलं आम्हाला पचनी पण पडत नाही. पण काबाडकष्ट करून, मातीत पैसा ओतून जो शेतमाल आम्ही पिकवतो त्याला जर किमान बाजारभाव भेटला नाही अन नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमालाचे नुकसान झाले तर मात्र आम्ही कुणाकडे मदतीची याचना करायची? कुणाकडे पदर पसरायचा?

विठ्ठला तुझ्या दारात भक्ताला जात, पात, धर्म, रंग नसतो तसाच शेतकऱ्याच्या कपाळावरही फक्त शेतकरीच लिहिलेलं असतं. तेव्हा पांडुरंगा, राजकारण बाजूला ठेऊन सरकारला कर्जमाफीचा निर्णय देण्याची सदबुद्धी दे अशी तुझ्याकडे प्रार्थना', अशा शब्दात बच्चू कडू यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.सरकारने शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, पण अजूनही अनेक मागण्यांवर तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे बच्चू कडू हे आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांच्या मूलभूत हक्कांसाठी उद्या ७ जुलैपासून १३८ किलोमीटरची पदयात्रा सुरू केली जाणार असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षातर्फे सांगण्यात आले आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या अमरावती जिल्ह्यातील पापळ येथून पदयात्रेला प्रारंभ होणार असून दोनद, उंबर्डा बाजार, लोही, तरणोडी, मानकी, तळेगाव, दारव्हा, वळसा, लाखखिंड, तिवरी, चिरकूटा, तूपटाकळी, वसंतनगर, काळी दौलत, माळकिन्ही, गुंज, या गावांमधून ही पदयात्रा १४ जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण (साहेबराव करपे- पहिली शेतकरी आत्महत्या झालेले गाव) आंबोडा येथे पोहोचणार आहे. एकूण सात दिवसांत १३८ किलोमीटरचे अंतर पदयात्रेच्या माध्यमातून पार केले जाणार आहे.

## संक्षिप्त

### पोटच्या चिमुरडीचा साडेतीन लाखांत सौदा



**पुणे-** मुलगी हरवल्याची तक्रार देत पोलीस ठाण्यात आलेल्या दाम्पत्यानेच चाळीस दिवसांच्या चिमुरडीला साडेतीन लाखांत विकल्याचा प्रकार पुण्यातील येरवडा परिसरात उघड झाला आहे. या प्रकरणात खरेदीदार महिलेसह आईवडील आणि एजंट अशा सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.एजंट साहिल अफजल बागवान (वय २७, रा. सातारा), रेश्मा शंकर पानसरे (वय ३४, रा. येरवडा), सचिन रामा अवताडे यांच्यासह मुलीचे आई -वडील आणि मुलगी विकत घेणारी संगमनेर येथील महिला अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस हवालदार सचिन गवळी यांनी फिर्याद दिली आहे.बिबवेवाडी येथील हे दाम्पत्य आहे. संबंधित महिलेला पहिल्या पतीपासून एक मुलगा आहे. दुसऱ्या पतीकडून तिला २६ मे रोजी मुलगी झाली. तिच्या पतीचा मित्र असलेल्या साहिलने आणि त्यांनी ही मुलगी विकण्याचे ठरवले. साहिलच्या ओळखीची महिला रेश्मा पानसरे मूलबाळ नसलेल्या महिलांच्या संपर्कात असल्याचे त्याला समजले. तिच्या माध्यमातून संगमनेर येथील रहिवासी असलेल्या महिलेसोबत साडेतीन लाखांत व्यवहार ठरविला होता

### कोल्हापुरी चप्पलांचा वाद उच्च न्यायालयात

**मुंबई-** कोल्हापुरी चप्पलांची 'प्रेरणा' घेत इटालियन लक्झरी फैशन ब्रेड 'प्राडा'ने बनवलेले फूटवेअर २२ जून रोजी मिलानमधील 'स्प्रिंग/समर मेन्स कलेक्शन 'मध्य सादर केल्यानंतर निर्माण झालेला वाद आता खूप चाढला आहे. याबाबत संतप्त प्रतिक्रिया उमटल्यावर काही दिवसांनी कंपनीने मौन सोडले असतानाच, कोल्हापुरी चप्पलांच्या कारागीरांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. 'प्राडा'ने मेन्स फॅशन शोमध्ये सादर केलेल्या 'टो-रिंग' फूटवेअर म्हणजे कोल्हापूर चप्पलांची कोपी आहे. या कंपनीने आपल्या चपला बाजारात आणताना एक निवेदन जाहीर करत त्यात संबंधित उत्पादनामागील प्रेरणा भारतीय कारागिरांकडून घेतल्याचे नमूद केले होते.या सँडल्सच्या डिझाईन आणि वैशिष्ट्यांमध्ये भौगोलिक मानांकन (जीआय) प्राप्त कोल्हापुरी चपलांशी ठळक साम्य आहे. आंतरराष्ट्रीय फॅशन शोमध्ये १ लाखाहून अधिक किंमत असलेल्या या सँडलचे प्रदर्शन करण्यात आले. या चप्पलांचे खरे मूळ मान्य न करता त्याचे युरोपियन लेबलखाली पुन्हा अँड करण्यात आले आहे. तसे करून कंपनीने भारतीय कारागीरांच्या आर्थिक व मूलभूत हक्कांचे उल्लंघन केले आहे, असे प्रा. ॲड. गणेश हिंगमिरे पांच्यासह अन्य वकिलांनी जनहित माचिकेद्वारे न्यायालमाच्या निदर्शनास आणले. कोल्हापुरी चप्पलांशी लोकांच्या भावना जोडलेल्या आहेत. ब्रेडने यासंदर्भात दिलेली कबुली ना सार्वजनिक होती ना अधिकृत, ती केवळ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर टीका झाल्यानंतरच देण्यात आली. त्यामुळे या प्रकरणी इटालियन लक्झरी बँडने सार्वजनिक माफी मागावी, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

### राज्याच्या समुद्रकिनारी असलेल्या कांदळवनांचे सर्वेक्षण सुरू

**मुंबई-** गुजरातच्या सीमेपासून ते गोवा राज्याच्या सीमेपर्यंत राज्याच्या समुद्रकिनारी कांदळवन आहेत. या कांदळवनांचे वनविभागाच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू आहे. यामुळे लवकरच कांदळवनांच्या अचूक क्षेत्रफळाची माहिती मिळणार आहे, असे वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य भास्कर जाधव यांनी प्रश्न उपस्थित केला होता.प्रश्नाच्या उत्तरात वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, पालघर जिल्ह्यातील कांदळवनांच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही लावण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वन , महसूल व गृह विभागाच्या अधिकाऱ्यांनी आळीपाळीने कांदळवनांच्या संरक्षणासाठी गस्त घालण्याचेही सूचित करण्यात आले आहे. मुंबईतील डेब्रिज कांदळवनांमध्ये टाकताना आढळल्यास त्यावरत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.कांदळवनांच्या संवर्धनासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिकाही दाखल करण्यात येईल, अशी माहितीही वनमंत्री नाईक यांनी दिली.

# घोडा मैदान जवळ, निवडणुकीत ताकद कोणाची ते दिसेलच

## सुनील तटकरेंचा ठाकरे बंधूंना टोला



**नाशिक-** 'शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे हयात असताना शिवसेना एकत्रितच होती. त्यामुळे त्यांना एकत्रित येणार यापेक्षा आपला पक्ष मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच घोडा मैदान जवळ असून, या निवडणुकीत ताकद कोणाची आहे ते दिसेलच,' असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ठाकरे बंधूंना लगावला.

'एनडीए'सोबत राहण्याचा आमचा निर्धार पक्का असून, आमच्या विचारधारा ज्यांना मान्य असेल ते सोबत येऊ शकतात,' असे भाष्यही त्यांनी पवार कुटुंबाच्या एकत्रिकरणावर केले. 'महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका एकत्रित लढण्याबाबत चर्चा झाली,' असा दावाही तटकरे यांनी केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्याच्या दृष्टिने सुनील तटकरे यांनी उत्तर महाराष्ट्रापासून दौऱ्याला सुरुवात केली. नाशिकमध्ये शनिवारी (दि. ५) राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची बैठक घेत त्यांनी आढावा घेतला. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटना बळकट करणे, नवीन आलेल्यांना सन्मानाने सोबत घेणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पक्षाची सध्याची राजकीय परिस्थिती समजून घेण्यासाठी हा दौरा सुरू आहे,' असे त्यांनी सांगितले. 'एनडीएसोबत जाण्याविषयी यापूर्वीदेखील आमची भूमिका होती. आजही तीच भूमिका आहे. आगामी निवडणूक एकत्रित लढविण्याविषयी समन्वय समितीच्या बैठकीत चर्चा झाली असली तरी अद्याप त्यावर अंतिम निर्णय होणे बाकी आहे.

निवडणूक काळापर्यंत काय स्थिती असेल त्यावर बरेच काही अवलंबून असेल. गेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले. एकट्या नाशिकमधून पक्षाचे सात आमदार निवडून आले आहेत. संख्याबळ



पाहता महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत अधिकाधिक जागा मिळाव्यात, अशा कार्यकर्त्यांच्या भावना आहेत. यामुळे त्याचा निश्चितच विचार करून कार्यकर्त्यांना न्याय दिला जाईल,' असे आश्वासन त्यांनी दिले. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे, माजी खासदार समीर भुजबळ , आमदार पंकज भुजबळ, सरोज अहिरे, रवींद्र पगारे, रंजन ठाकरे, विष्णुपंत म्हैसधुणे, प्रेरणा बलकवडे आदी उपस्थित होते.

# सिंहस्थ खर्चावर लक्ष! ऑडिट होणार

## कुंभमेळा प्राधिकरणाला विधिमंडळाची मंजुरी

**नाशिक-** नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ मेळ्यासाठी विशेष प्राधिकरणाच्या स्थापनेला विधिमंडळाने मंजुरी दिली आहे. सिंहस्थाअंतर्गत विविध कामांवर जवळपास १० ते १२ हजार कोटी रुपये खर्च केला जाणार असून, या खर्चाचे ऑडिट केले जाईल आणि त्याचा अहवाल दोन्ही सभागृहांत सादर करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे.

सिंहस्थ कामांच्या निविदा काढण्याचे अधिकारही प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. सिंहस्थात निधी कुठे खर्च झाला,

कोणत्या कामांसाठी खर्च झाला, त्याचे ऑडिट केले जाणार असल्याने भ्रष्टाचाराला आळा बसणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.सिंहस्थ मेळ्यात येणाऱ्या भाविकांना सेवा-सुविधा देण्यासाठी नाशिक महापालिकेसह विविध शासकीय विभागांकडून एकूण २४ हजार कोटींचा सिंहस्थ आराखडा तयार करण्यात आला आहे. सिंहस्थासाठी आता जेमतेम दोन वर्षांचा कालावधी शिल्लक राहिला असताना अद्याप या आराखड्याला सरकारची मंजुरी मिळू शकलेली नाही. त्यामुळे निधीअभावी सिंहस्थ कामे सुरू होऊ शकलेली नाहीत. या संदर्भात साधू-महंतांकडून नाराजी व्यक्त केली गेल्यानंतर सरकारने पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्या मंजूर करताना सिंहस्थासाठी एक हजार कोटींची तरतूद केली आहे,

तर दुसरीकडे सिंहस्थासाठी स्थापन केलेल्या प्राधिकरणालाही आता विधिमंडळाने मंजुरी दिली आहे.

# सर्व प्रतिज्ञापत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफ

## महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा

**मुंबई-** सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत शुक्रवारी केली. आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरऐवजी साध्या कागदावर अर्ज करून विविध प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यामुळे विशेषतः विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जातपडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यासह शासकीय कार्यालयांत दाखल कराव्या लागणार्या सर्वप्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा



निर्णय घेण्यात आला आहे. अशी प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागत होते. आता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्रे मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा खर्च वाचणार आहे.दहावी, बारावीच्या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी धांदल सुरू होते. केवळ शैक्षणिकच नाही, तर इतर अनेक कारणांसाठीही दाखले लागतात.महसूलवाढीसाठी अशा दाखल्यांसाठीचे मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून ५०० रुपये करण्याचा निर्णय नव्या सरकारने घेतला होता. या निर्णयाचा सर्वाधिक फटका हा विद्यार्थ्यांना बसणार असल्याने हा निर्णय मागे घेत सर्वप्रकारचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय बावनकुळे यांनी जाहीर केला होता. आता या निर्णयाची माहिती त्यांनी निवेदनाद्वारे सभागृहात दिल्याने या निर्णयाची अंमलबजावणी लगेचच होणार आहे.महसूलमंत्री बावनकुळे यांनी, प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा केल्यानंतर प्रामुख्याने विद्यार्थी आणि पालकांनी या घोषणेचे जोरदार स्वागत केले आहे. यामुळे आता साध्या कागदावर अर्ज करून आम्हाला आवश्यक दाखले मिळवता येतील,अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# संजय गायकवाडांच्या वक्तव्यावरून विजय वडेट्टीवार भडकले

**मुंबई-** हिंदी सक्तीचा जीआर मागे घ्यायला लागल्यामुळे थयथयाट करणारे मिंधेचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांबद्दल एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. त्यावरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हे संतापले असून त्यांनी ट्विट करत सत्ताधाऱ्यांना खडसावले आहे.

'छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराजांना मूर्ख म्हणतात, कशासाठी तर हिंदी भाषेच्या सक्तीसाठी. सत्ताधाऱ्यांना लाज वाटली पाहिजे, आपण कशासाठी कोणाचे उदाहरण देतो, भाषा काय वापरतो. महापुरुषांचा



अवमान करणं ही सत्ताधाऱ्यांची अधिकृत संस्कृती झाली आहे ? या सत्ताधाऱ्यांना कसली मस्ती आली, अशा शब्दात वडेट्टीवार यांनी महायुती सरकारला व आमदार संजय गायकवाड यांना फटकारले

हिंदी सक्तीचा जीआर मागे घेण्याविषयी पत्रकारांनी संजय गायकवाड यांना विचारताच ते म्हणाले की,

छत्रपती संभाजी महाराजांनी १६ भाषा शिकल्या मग ते काय मूर्ख होते का? छत्रपती शिवाजी महाराज महाराणी ताराराणी, जिजाऊँ हे सर्व बहुभाषिक होते. ते काय मूर्ख होते का जे त्यांनी इतक्या भाषा शिकल्या. त्यामुळे भाषेवरून वाद करणं चुकीचं आहे, असं संजय गायकवाड म्हणाले. संजय गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांसमोर केलेल्या या वक्तव्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून त्यावरून नेटकरी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका करत आहेत.

# माफी न मागितल्यास अजित पवारांना कोर्टात खेचणार; हाकेंना इशारा

**बारामती-** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरले होते. अजित पवार ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय करत असल्याचा आरोप हाके यांनी केला या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते नितीन संजय यादव यांनी कायदेशीर नोटीस बजावली आहे. माफी न मागितल्यास त्यांना कोर्टात खेचण्याचा इशारा नितीन यादव यांनी दिला आहे. 'उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात वेळोवेळी जाणीवपूर्वक बेताल वक्तव्य करणाऱ्याविरोधात कायदेतज्ञ ॲड. शंतनु माळशिकारे यांच्या वतीने मी लक्ष्मण हाके यांना आज नोटीस बजावली असून, लक्ष्मण हाके यांनी ७ दिवसात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची लेखी माफी न मागितल्यास लक्ष्मण हाके यास न्यायालयात खेचून दिवाणी, फौजदारी व अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ सोमवार, ७ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## मोटारसायकल चो-यांना लगाम ; दोन सराईत चोरांच्या मुसक्या आवळल्या !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम शहरासह इतर ठिकणाहुन मोटरसायकली चोरणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. दरम्यान त्यांच्या ताब्यातून एकूण सात चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. योगेश अशोक गिरी वय २४, रा. लाखाळा वाशिम विष्णुदास चंद्रकांत झाटे वय २५, रा. पिंपळगाव, ता. मंगरुळपीर जि. वाशीम अशी या अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली होती की, वाशीम शहरातील योगेश गिरी आणि मंगरूळपिर येथील विष्णूदास झाटे हे दोघे वाशीमसह इतर ठिकाणाहून



मोटरसायकल चोरी करीत आहे.मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींना ताब्यात घेवून विचारपूस केली असता, त्यांनी एकूण सात मोटरसायकली चोरी केल्याची कबुली दिली.यावरून त्यांच्या ताब्यातील एकूण ७ मोटरसायकली जप्त करण्यात आले असून या पैकी २ मोटरसायकल वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे.या प्रकरणी सातही मोटरसायकल जप्त करण्यात आले असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. आणखी काही चोरीच्या मोटरसायकलीचे गुन्हे या चोरट्यांकडून उघडकीस येतात का याचा तपास पोलीस करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, सपोनि. जगदीश बांगर, सपोनि. योगेश धोत्रे, तसेच अंमलदार विनोद सुर्वे, गजानन अवगळे, प्रविण सिरसाट, प्रशांत बक्षी, महेश वानखेडे, संदीप दुतोंडे, अमोल इरतकर, अविनाश वाढे, गोपाल चौधरी, विजय नागरे, दीपक घुगे, संतोष वाघ, सुनील तायडे यांनी केली.

## लसीकरण, औषध साठा, आपत्कालीन सेवा आणि टीबी निर्मूलनावर भर द्यावा - बुवनेश्वरी एस

■ प्रतिनिधी | वाशिम ■



लसीकरण, औषध साठा, आपत्कालीन सेवा आणि टीबी निर्मूलनावर भर द्यावा.असे निर्देश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी संबंधित यंत्रणेला दिले. जिल्ह्यातील सार्वजनिक आणि खासगी आरोग्य यंत्रणांमध्ये अधिक सशक्त समन्वय निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली वाकाटक सभागृहात दि. १ जुलै रोजी दोन महत्वपूर्ण बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत लसीकरण, मातामृत्यू आणि बालमृत्यू नोंदणी, गर्भवतींच्या तपासण्या, औषध पुरवठा तसेच क्षयरोग निर्मूलन यावर सखोल चर्चा झाली.यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या.

या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश परभणकर, इंडीयन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संतोष सारडा, आर एम ओ डॉ. पराग राठोड, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.महेंद्र चाफे, नॅशनल इंटीग्रेटेड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब डाखोरे, डॉ. हरिष बाहेती, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ काळे यांच्यासह विविध खाजगी रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ङआपत्कालीन सेवा समन्वयासाठी व्हॉट्सॲप ग्रुपङ

खासगी आणि शासकीय आरोग्य यंत्रणांमध्ये आपत्कालीन स्थितीत तात्काळ संपर्क व माहिती देवाणघेवाण सुनिश्चित करण्यासाठी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यामुळे आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे हाताळता येतील.

**लसीकरण आणि औषधसाठ्याच्या सातत्यावर भर :** जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी नवजात बालकांचे लसीकरण वेळेवर व सातत्याने होण्यासाठी आवश्यक लसी – बीसीजी, हेपॅटायटिस बी, आणि झिरो पोलिओ – नेहमी उपलब्ध ठेवण्याचे निर्देश दिले.

## रस्ता नाली ही मूलभूत सुविधा उपलब्ध करा
### रहिवाशांचे नगर पालिकेकडे मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील बिलाल नगर ही रहिवाशी वसाहत गेल्या अनेक वर्षापासून वसलेली आहे परंतु या भागामध्ये रस्ते व नाल्याची योग्य सुविधा नसल्याने ह्या भागामध्ये रहिवाशांना अनेक अडचणी येतात. सद्यस्थितीत पावसाचे दिवस असल्याने सदर रस्त्याने ये-जा करणारे शाळकरी लहान लहान मुले-मुली, तसेच वयोवृध्द पुरुष-स्त्रीया यांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. बिलाल नगर येथे नैसर्गिक पाउसाच्या पाण्याने दुर्गंधी पसरली असुन तेथे राहणाऱ्या नागरिकांना डास, मच्छर यामुळे अनेक नागरिक विविध आजाराने ग्रस्त आहेत. पावसाचे पाणी येथील नागरिकांच्या घरामधील घुसत आहे रस्त्याला तलावाचे स्वरूप येत आहे तरी नगरपालिकेने सदर नागरिकांना योग्य ते सुविधा पुरवण्यात अन्यथा आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी बोलताना येथील नागरिकानी आपली समस्या सांगितली.

## स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत ग्राम पंचायत अधिकारी यांच्या कार्यशाळा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या निर्देशानुसार स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ अंतर्गत जिल्ह्यातील सहा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या दोन कार्यशाळा जिल्हा परिषदेच्या महात्मा फुले व वसंतराव नाईक सभागृहात संपन्न झाल्या.

महात्मा फुले सभागृहात वाशिम, मालेगाव आणि रिसोड या तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना स्वच्छ सर्वेक्षण-ग्रामीण बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. गावात सर्वे करण्यासाठी केंद्र शासनाचे पथक आले असुन काही गावांची तपासणी सुरु आहे व लवकरच ते इतरही गावांमध्ये येणार आहे. यासाठी सर्व ग्रामपंचायतीने दक्ष रहावे असे निर्देश यावेळी देण्यात आले. दुपारी ३ ते ५ या दरम्यान मंगरूळपीर, मानोरा आणि



कारंजा या तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण जि प च्या वसंतराव नाईक सभागृहात संपन्न झाले. प्रशिक्षणादरम्यान स्वच्छ सर्वेक्षणाचे घटक, निकष आणि गुणांकन पद्धतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या सर्वेक्षणासाठी एकुण १ हजार गुणांचे तपशिलवार विवेचन आणि त्याबाबत ग्राम पंचायतीने करावयाची तयारी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खेडकर आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मंगरुळपीर गट विकास अधिकारी डॉ. केशव साखरे, सहाय्यक गट विकास अधिकारी गजानन खुळे आणि जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक भुयार यांचीही यावेळी उपस्थिती होती. जिल्हा कक्षाचे राम श्रृंगारे, शंकर आंबेकर, प्रफुल्ल काळे, विजय नागे, सुमेर चाणेकर यांनीही पावर पॉइंट प्रेझेंटेशन च्या आधारे यावेळी माहिती दिली.

**घरकुलाच्या कामांना गती द्याः किरण कोवे**

या कार्यशाळेमध्ये जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या माध्यमातुन देण्यात येणाऱ्या घरकुलाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी येणाऱ्या दिवाळीपूर्वी जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांचा गृहप्रवेश झाला पाहिजे यासाठी घरकुलाच्या कामांना गती देण्याच्या सुचना सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना दिल्या. जिल्ह्यात विविध योजनेअंतर्गत घरकुलाच्या कामांनी गती घेतली असुन सुरु असलेली कामे लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना निधीचे उर्वरीत हफ्ते वितरीत करण्याचे निर्देशही संबंधितांना देण्यात आले.

## वनमहोत्सवा निमीत्त विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी व वृक्षरोपणाचा संकल्प



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासनाच्या वतीने दरवर्षी जुलै महिन्यात वनमहोत्सवाचे आयोजन करण्यात येते त्यानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात येते.

राज्यात सध्या सर्वत्र पाऊस सुरु झाला असून वृक्ष लागवडी साठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थीमध्ये वृक्ष लागवडीबाबत आत्मीयता निमार्ण होण्यासाठी व समाजामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती निमार्ण होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभागच्या वतीने वृक्षदिंडी काढण्यात आली. या वृक्ष दिंडीच्या माध्यमातून निसर्ग ईकोक्लबच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण समतोल राखण्याचा संदेश वाशीमकरांना दिला तसेच शाळेच्या प्रांगणात एक पेड माँ के नाम उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले.ष

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे ,पर्यवेक्षीका प्रणीता हरसुले होत्या .प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोपट्यांनी सजविलेल्या पालखीचे पूजन करून हिरवी झेंडी दाखवून वृक्षदिंडीचे उदघाटन करण्यात आले.

## विदर्भातून प्रथम व पाचवी येणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा श्री शिवाजी विद्यालयात सत्कार

■ प्रतिनिधी | अकोट ■

स्थानिक श्री शिवाजी विद्यालयात आयोजित कार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते 'वैश्विक मूल्याधिष्ठित परीक्षा'त विदर्भातून यश मिळवणाऱ्या दोन गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

या परीक्षेमध्ये गौरी गोपाल मुंडोकार हीने विदर्भातून प्रथम क्रमांक, तर वैभवी नंदकिशोर आकोटकर हिने पाचवा क्रमांक मिळवला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हर्षवर्धन देशमुख होते. यावेळी कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे,



आजीवन सदस्य दादाराव पाथ्रीकर, सेवकराम महाले, आत्माराम पांडे, प्राचार्य संजय वालसिंगे, उपमुख्याध्यापक भास्कर खंडारे तसेच पर्यवेक्षिका अंजलीताई सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व शिक्षणमहर्षी भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व पूजन करून करण्यात आली.यावेळी बोलताना सुरेश खोटरे व अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांचं विशेष कौतुक केलं.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संजय वालसिंगे यांनी, सूत्रसंचालन भास्कर खंडारे यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका अंजलीताई सपकाळ यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## जे.सी. हायस्कूलमध्ये वारकऱ्यांच्या वेशात विद्यार्थ्यांनी सादर केला उत्कृष्ट परिपाठ



■ प्रतिनिधी | कारंजा ■

दप्तर मुक्त आनंददायी शनिवार या शैक्षणिक उपक्रमांतर्गत आषाढी एकादशीचे औचित्य साधून जे.सी. हायस्कूल व जुनिअर कॉलेज, कारंजा मध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर व उत्कृष्ट असा परिपाठ विद्यार्थ्यांसमोर सादर केला .

जे.सी. हायस्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या वेशात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन भक्तिमय वातावरणात परिपाठाचे आयोजन करण्यात आले .यामध्ये आषाढी एकादशी चे महत्व, बोधकथा संतांच्या कार्यांची परंपरा, सात्विक सुविचार आणि विठ्ठलाची भक्ती या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले. डोक्यावर तुळस, हातात विठ्ठल रुक्मिणी ची मूर्ती, गळ्यात टाळ आणि मुखात 'जय जय राम कृष्ण हरी ' च्या उद्घोषाने सर्व वातावरण भारावून गेले.

## संस्कारांची पायवाट हीच खऱ्या शिक्षणाची वाट - उषा मापारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची बीजं रोवण्यासाठी शाळेत सणांची सर्जनशील मांडणी अत्यंत आवश्यक आहे. भक्तीभाव, सांस्कृतिक जाणीव आणि पर्यावरणाचे भान या तिन्ही मूल्यांचा समतोल विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यासाठी माईंड्स आय स्कूल नेहमीच पुढाकार घेत असते. प्रत्येक सण एक शिक्षण देतो, आणि तो विद्यार्थ्यांनी अनुभवावा हीच आमची भावना आहे.असे प्रतिपादन माईंड्स आय इंग्लिश स्कूलच्या संचालिका उषा मापारी यांनी केले.

दि.५ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या निमित्ताने माईंड्स आय इंग्लिश स्कूल, वाशिम येथे विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून विठ्ठल-रुख्मिणीच्या पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. वृक्षदिंडी आणि भजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण व संस्कृती जपण्याचा संदेश दिला. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'एक पाऊल भवतेकडं, एक पाऊल पर्यावरणाकडं' असा संदेश देत भजन, अभंग गायन, नृत्य सादर केलं. बालवर्गातील चिमुकल्यांपासून ते इयत्ता सहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी



विठ्ठल-रुख्मिणीची वेशभूषा साकारत उपस्थितांची मने जिंकली. शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षकांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. पालखी व वृक्षदिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी रस्त्याच्या कडेने झाडांना पाणी घालून वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, पर्यावरण जागरूकता आणि सामाजिक मूल्यांची रुजवण करण्यात माईंड्स आय स्कूलचे हे योगदान उल्लेखनीय ठरले. या प्रसंगी शिक्षक वृंद श्याम दवणे, अश्विनी राऊत, छाया नालेगावकर, माया दंडे, सुषमा ठाकरे, दिपाली हजारे, रजनी ठाकरे आदींची उपस्थिती होती.

## भारत प्राथमिक मराठी शाळेत आषाढी एकादशी साजरी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत ५ जुलै रोजी आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या अध्यक्षा जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांच्या हस्ते पालखीचे व विठुरायाचे पूजन करण्यात आले. त्यांनतर विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेषभूषा करून व डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन उत्साहात पायी दिंडी काढली. 'ज्ञानबा तुकाराम'चा जयघोष करत मोठ्या जल्लोषात सर्व विद्यार्थी दिंडीमध्ये सहभागी झाले. बाल वारकऱ्यांनी वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवित हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, गळ्यात तुळशीच्या माळा घालून हरी नामाचा गजर केला व भजन, अभंग, ओव्या व फुगड्याचा मनमुराद आनंद लुटला. अवघी शाळाच दिंडी सोहळ्यात भक्तीरसात तल्लीन झाल्याची पाहायला मिळाली.

याप्रसंगी मुख्याध्यापिका किरण दुबे यांनी महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांनी दिलेल्या सद्विचार-सद्वर्तनाच्या शिकवणुकीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

## वसंतराव नाईक यांची कृषी दिन म्हणून जयंती साजरी

■ प्रतिनिधी | अडोळी ■

येथील ग्रामपंचायत वतीने ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये माजी मुख्यमंत्री तथा हरीत क्रांती चे जनक वसंतराव नाईक यांची कृषी दिन म्हणून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी जयंती कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी सरपंच सविता ताई इढोळे ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपसरपंच भगवान इढोळे , पोखरा समिती सदस्य गजानन इढोळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, नारायण इढोळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीष इढोळे, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, कृषी सहाय्यक गणेश ठोकळ, पोखरा समिती सदस्या संगीता राजकुमार पडघान, बबन इढोळे, निवृत्ती इढोळे यांची उपस्थिती होती. यावेळी हरीत क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले.

## विद्याभारतीची दिंडी सर्वात न्यारी, जणू वाशिमात अवतरली पंढरीच सारी...

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. भगव्या पताकांनी सजवलेल्या आणि पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी सजलेल्या या दिंडीमुळे वाशिम परिसर पंढरीमय झाल्याचा अनुभव सर्व उपस्थितांनी घेतला.

या दिंडीचे उद्घाटन माध्यमिक उपशिक्षणाधिकारी आकाश आहाळे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्याभारती संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे होते. यावेळी शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेश मिटकरी, उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी, संचालक सुमित मिटकरी, अनिल परहाते , मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते.



दिंडीची सुरुवात पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषा, टाळकरी, लेझीम, मृदुंग, भगवे ध्वज घेऊन रस्ता रंगतदार केला. घोड्यावर विराजमान विठ्ठल-रखुमाई, नऊवारी साडीत साकारलेल्या वारकरी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत नरहरी महाराज, संत चोखामेळा आदींच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक नृत्य व अभंग-भजन सादरीकरणाला वाशिमकरांनी भरभरून दाद दिली. शाळेतील शिक्षकांनीही भक्तिरसपूर्ण गायन सादर केले. पालकांनी आपल्या मुलांचे विविध कलागुण मोबाईलमध्ये कैद करत आनंद व्यक्त केला.

दिंडीची सुरुवात सिव्हिल लाईन येथून होऊन विद्याभारती शाळेपर्यंत झाली. समारोप प्रसंगी अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे यांच्या हस्ते दिंडीची आरती करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे यांनी सांस्कृतिक वारसा जोपासणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. माध्यमिक उपशिक्षणाधिकारी आकाश आहाळे साहेब म्हणाले, 'वारी म्हणजे चालताना 'मी'पणा गाळून 'आपण'पेरणे, हेच विद्याभारतीच्या वारीचं खरे गूढ आहे.' यावेळी व्यापारी बांधव अंकित मिटकरी व रवी वाकूडकर यांच्या वतीने दिंडीतील सर्वांना पाणी व फराळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२२ ■ सोमवार, ७ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## रागात घरून निघालेली महिलेसह मुलीला पोलीसांनी उत्तर प्रदेशातून आणुन परिवाराच्या स्वाधीन केले

### -पत्नीसह मुलीची भेट,वडिलांच्या डोळ्यातून वाहू लागले अश्रू

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील अल्लीपूर येथील महिला व तिच्या ११ वर्षीय मुलीला घेऊन पतीला न सांगता घरा मधून निघून गेली होती.पतीच्या तक्रारी वरुन अल्लीपूर पोलिसांनी शोध कार्य सुरु केले आणि पत्नी व मुलीची भेट घडवून आणली.दोघांना स्वाधीन करताना वडिलांच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले होते.



अल्लीपूर येथील रमेश कीन्नाके त्यांची पत्नी नीलिमा व मुलगी असे तिघे राहतात.दिनांक २९ रोजी पती पत्नी मध्ये वाद निर्माण झाला आणि त्यातून पत्नी नीलिमा या महिलेने ११ वर्षीय रितिका या मुलीला घेऊन घर सोडले होते.याप्रकरणी अल्लीपूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक विजयकुमार घुले यांनी तीन कर्मचाऱ्यांचे पथकाला निर्देश दिले.पथकाने महिलेचा शोध घेतला असता,ती महिला व ११ वर्षीय मुलगी उत्तरप्रदेश राज्यातील रामपूरकला येथे असल्याचे निष्पन्न झाले.पथकाने तेथील पोलिसांची मदत घेऊन महिला व मुलीला ताब्यात घेत अल्लीपूर पोलिस ठाण्यात घेऊन आले.पोलीस ठाण्यात आणल्यानंतर पोलिसांनी पत्नीसह मुलीची भेट घडवून आणली असता,वडिलांच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले होते. पत्नी व मुलीला पती रमेश कीन्नाके यांच्या स्वाधीन करण्यात आले. महिलेने रागात मुलीला सोबत घेऊन घर सोडले आणि थेट वर्धा रेल्वे स्थानक गाठले.वर्धेवरून रेल्वेने नागपूरला पोहचल्या नंतर तिला कुठे जायचे समजले नाही आणि ती लखनऊकडे जाणाऱ्या रेल्वेत बसून थेट लखनऊ गाठले. लखनऊ वरुन

उत्तरप्रदेश राज्यातील रामपूरकला जिल्हा सितापूर या ठिकाणी पोहचली होती असे महिलेने सांगितले.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात सपोनि विजयकुमार घुले ,पथकातील अजय रिठे, रवी वर्मा व उमा कचाटे यांनी केली.

## तन्वी अग्रवाल यांनी सीए परीक्षा उत्तीर्ण करून आर्वीचे नाव उज्ज्वल केले

**आर्वी जनमाध्यम :** शहरातील प्रसिद्ध अनाज व्यापारी पवन अग्रवाल यांची कन्या तन्वी अग्रवाल यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षा उत्तीर्ण करून केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. तन्वीच्या या यशाने आर्वीच्या तरुणांसाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. तन्वीने कठोर परिश्रम, समर्पण आणि दृढनिश्चयाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) द्वारे आयोजित सीए अंतिम परीक्षा उत्तीर्ण करणे ही स्वतःच एक मोठी उपलब्धी आहे, आणि तन्वीने आपल्या मेहनतीने आणि समर्पणाने हे शक्य करून दाखवले. या परीक्षेच्या तयारीसाठी तिने रात्रंदिवस एक केले आणि आपल्या अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले.स्थानिक नागरिक आणि तन्वीचे शिक्षक यांनी तिच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. तिचे वडील पवन अग्रवाल यांनी सांगितले की, तन्वी लहानपणापासूनच अभ्यासात अव्वल होती आणि नेहमी मोठी उद्दिष्टे साध्य करण्याची स्वप्ने पाहत होती. तिच्या या यशाने केवळ कुटुंबालाच गौरवान्वित केले नाही, तर आर्वीच्या इतर तरुणांना हा संदेश दिला आहे की मेहनत आणि समर्पणाने कोणतेही उद्दिष्ट



अशक्य नाही.तन्वीने आपल्या यशाचे श्रेय आपली आई भारती अग्रवाल, वडील पवन अग्रवाल, शिक्षक आणि मित्रांना दिले, ज्यांनी प्रत्येक टप्प्यावर तिला साथ दिली. ती म्हणाली, 'हा प्रवास सोपा नव्हता, पण माझ्या कुटुंबाचा आणि गुरुजनांचा पाठिंबा माझ्यासाठी सर्वात मोठा प्रोत्साहन होता. मी आर्वीच्या प्रत्येक त्या मुलीला प्रेरणा देऊ इच्छिते जी आपली स्वप्ने पूर्ण करू इच्छिते. आर्वीच्या स्थानिक समुदायाने तन्वीच्या या उपलब्धीवर आनंद व्यक्त केला आहे आणि तिला शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या या यशाने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की छोट्या शहरांतूनही मोठी स्वप्ने पूर्ण होऊ शकतात. तन्वी आता आपल्या करिअरमध्ये पुढे जाण्याचा आणि समाजासाठी योगदान देण्याच्या दिशेने काम करण्याचा विचार करत आहे.तन्वीच्या या यशाबद्दल शहरातील मनोहरलाल अग्रवाल, महेंद्र अग्रवाल, लखन अग्रवाल, गोवर्धन अग्रवाल, दिनेश अग्रवाल, नरेश अग्रवाल यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

## मोटरसायकल व स्कूटीचा अपघात, युवक ठार

**-महिलेसह दोन तरुणी गंभीर जखमी**

**-अप्पर वर्धा धरण मार्गावरील घटना**

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी ते सिंभोरा रोडवरील नशीदपूर फाट्याजवळ मोटरसायकल व स्कुटीच्या आमने-सामने झालेल्या धडकेत एका २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून एका गर्भवती महिलेसह दोन तरूणी गंभीर आहेत. जखमींना एक्झॉन हॉस्पिटल अमरावती येथे हलविण्यात आले आहे. हा अपघात आज दि.६ जून रोजी सायंकाळी ६ वाजताचे सुमारास झाला.



मृतक तरुणाचे नाव नकुल राजेश नवले (वय २३,रा.अंतोरा,जि.वर्धा) असे आहे. तर करिष्मा भीमराव रामटेके (वय ३२, रा. वरुड),महिमा प्रदीप भोकरे (वय २५, रा. अमरावती) व दिपाली हरिदास पाटील (वय २३, रा.ब्राह्मणवाडा भगत) असे जखमींचे नाव आहे. यातील एक महिलेसह दोन तरुणी इसाफ बँक मोर्शी येथे कार्यरत असून या तिघी मैत्रिणी आज रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे आपली स्कुटी क्र.एम. एच.२७ डी यु ६५०९ ने अप्पर वर्धा धरण बघण्यासाठी गेल्या होत्या.परत येत असतांना नकुल राजेश नवले (वय २३ रा.अंतोरा) हा आपली मोटर सायकल क्र.एम एच २७ एपी २७६५ ने अंतोरा येथे जात असतांना या दोन्ही दुचाकी वाहनांची आमने-सामने जबर धडक झाली. या अपघातात नकुल नवले याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल पंडागरे,रवी परतेती, श्याम मोरे,यश पांडे, अभिषेक झोड,तेजस नागले यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक व जखमींना इरफान यांच्या ॲम्बुलन्सद्वारे उपजिल्हा रुग्णालय दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जखमींवर औषधोपचार केल्यानंतर एका महिलेसह दोन तरुणीला अतिशय गंभीर मार बसल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे रवाना केले. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## कर्जाच्या चिंतेत शेतकऱ्यांने केली आत्महत्या

**कारंजा (घा) जनमाध्यम :** तालुक्यातील काजळी येथील ३८ वर्षीय शेतकऱ्याने कर्जाचा डोंगर वाढत गेल्याने आणि कर्जाच्या चिंतेत राहून गावा शेजारी असलेल्या शेत शिवारातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली, असल्याची घटना घडली आहे. सुनील देशमुख (३८) असे मृतकाचे नाव आहेत.



काजळी येथील सुनील उर्फ मारोती श्रीराम देशमुख वय (३८) या मृतक शेतकऱ्याकडे वडिलोपार्जित शेती असून, त्या शेती मधून उत्पन्न घेऊन आईवडील, पत्नी व दोन मुलींचा सांभाळ करीत होता.तीन वर्षांपूर्वी शेती मध्ये बियाणे विकत घेण्यासाठी व शेतीची मशागत करण्याकरिता वडिलांच्या नावाने राष्ट्रीकृत बँकेकडून कर्ज घेतले होते.शेतामध्ये उत्पन्न होत नसल्याने, तो सतत चिंतेत राहत होता.कर्जाची परतफेड कशी करायची या चिंतेत असल्याने ३८ वर्षीय शेतकऱ्यांने गावा शेजारी असलेल्या नामदेव बन्नागरे यांच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना घडली. याप्रकरणी मृतकाच्या भावाला माहिती दिली असता, त्यांनी घटनास्थळी धाव घेत कारंजा पोलीस ठाण्याला माहिती दिली.याप्रकरणी पोलीस ठाण्यात घटनेची नोंद घेण्यात आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात हरित एकादशी

### -हिंगणघाट पर्यावरण संवर्धन समिती ची स्थापना वृक्षारोपणाने

**हिंगणघाट जनमाध्यम –** पावन आषाढी एकादशीच्या दिवशी हिंगणघाटकरांनी पर्यावरण पूजनाचा नवा अध्याय लिहिला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात 'हिंगणघाट पर्यावरण संवर्धन समिती'ची स्थापना वृक्षारोपण करून करण्यात आली. हा उपक्रम शहराच्या पर्यावरण जपण्यासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरले. निसर्गाच्या रक्षणासाठी आणि भावी पिढ्यांसाठी हरित वारसा जपण्यासाठी समितीचे हे पहिले पाऊल असून, स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग ही या उपक्रमाची खास वैशिष्ट्ये ठरली.



या शुभकार्याच्या प्रसंगी माजी नगराध्यक्ष प्रेमबाबू बसंतानी , किशोर दिघे, आकाश पोहाणे,उमेश तुळसकर,किरण वैद्य यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. विविध वृक्षांच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला.या समितीचे आकाश पोहाणे, संजय माडे, दिव्यकुमार बोरगमवार, अतुल नंदागवळी,अमोल त्रिपाठी, मोहन तुमराम, उपस्थित होते, भविष्यात समितीचा विस्तार करून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती समिती प्रमुख व अध्यक्षांनी दिली आहे. या कार्यक्रमाला

असंख्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी समितीद्वारे नियमित वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम, प्लास्टिकमुक्ती अभियान यासारख्या उपक्रमांचे आयोजन करून शहर पर्यावरणदृष्ट्या आदर्श बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

## घोराड येथे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील घोराड विदर्भाची प्रतिपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र घोराड येथे आषाढी एकादशी निमित्त ६ जुलै रोजी पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे मंदिर परिसर भाविकांचे गर्दीने फुलून गेला होता.



आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुमिणी मंदिरात पहाटे मुर्तीला अभ्यंगस्नान, महापूजा करण्यात आली. दिवसभर येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. दुपारी १ वाजता परंपरेनुसार मंदिरातून पंचक्रोशी प्रदक्षिणेसाठी दिंडी निघाली. हरिनामाचा गजर करीत दिंडी गावाला प्रदक्षिणा करून मंदिर परिसरात आली. गावातील भजनी मंडळीचा सहभाग होता. दरवर्षी आषाढी एकादशीला परंपरेनुसार मंदिरातून दिंडी काढण्यात येते संपूर्ण गावाला या दिवशीला दिंडीची प्रदक्षिणा असते. दुपारी चार वाजता दिंडी मंदिराजवळ येताच या दिंडी सोहळ्याची सांगता झाली. मंदिर परिसर भाविकांचे गर्दीने फुलून गेला होता. देवस्थान कडून फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

## पोस्ट खात्यातील रक्कम परस्पर गहाळ, तक्रार होताच पोस्ट खात्यातून पैसे परत

**सेलू जनमाध्यम :** पोस्टाच्या खात्यातील रक्कम परस्पर लंपास करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार तालुक्यातील बोरी कोकाटे येथील डाकघरात घडला. याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. बोरी कोकाटे येथील पोस्टमास्तर यांनी गावातीलच दोन युवकांना हाताशी धरून अनेकांच्या खात्यात गडबड-घोटाळा केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. यात अनेकांच्या खात्यातील रक्कम परस्पर गहाळ करण्यात आली आहे.

ज्यांच्या खात्यात रक्कमचं नाही, अशांच्या खात्यात देखील अचानक रक्कम आल्याचे सांगितले जाते. नंदलाल पाटील यांच्या खाता पुस्तकात खोडतोड करून व्हाईटनरने नोंदी गहाळ करण्यात आल्याचा देखील प्रताप पोस्टमास्तरने केला आहे. अशाप्रकारे अनेकांच्या खात्यात अफरातफर करण्यात आली. ही बाब लक्षात येताच खातेधारकांनी पोलिसांत धाव घेत याप्रकरणी तक्रार दाखल केली. दरम्यान काहींच्या खात्यात यावेळी अचानक मोठी रक्कम जमा सुद्धा करण्यात आल्याचे सांगितले जाते. या गंभीर प्रकारामुळे गावात मोठी खळबळ उडाली असून दोषींवर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा खातेधारकांनी व्यक्त केली आहे.

## हिंगणघाट शहरात विद्युत तार अंडरग्राउंड करा, होणारी वृक्षतोड थांबवा

### -आधार फाउंडेशनचे मुख्याधिकारी यांना निवेदन

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरात विद्युत तार अंडरग्राउंड करा आणि विद्युत तारासाठी होत असलेले वृक्षतोड थांबविण्यात यावी या मागणीकरिता आधार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अतुल वांदिले यांच्या मार्गदर्शनात सर्व सदस्यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे.



हिंगणघाट शहरामध्ये विद्युत तारा अंडरगाऊंड करावी कारण दरवर्षी वाढत असलेले तापमान लक्षात घेता पर्यावरणविषयी जागरूक असलेल्या विविध सामाजिक संस्था व संघटना वेगवेगळ्या ठिकाणी किंवा रोडलगत वृक्षारोपण करीत असतात, विद्युत खाबांला व ताराला वृक्षाच्या फांद्या लागतात या कारणा? महावितरण मार्फत दरवर्षी या झाडाच्या फाद्या तोडतात यामुळे झाडे कोलमडून पडते रस्त्याचे सौंदर्यीकरण विद्रुप होते व पर्यावरणाचा ऱ्हास होतो. आधार फाऊंडेशन सुद्धा दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करीत असते वृक्षतोड होऊ नये याकरिता नगर परिषदे कडून तात्काळ विद्युत तारा अंडरगाऊंड करावी असे निवेदन आधार फाउंडेशनचे सर्व प्रमुख सदस्यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले.

यावेळी आधार फाउंडेशनच्या कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहिरकर, पराग मुडे, श्याम निमट,सुरेश गुंडे, प्रा.डॉ.शरद विहिरकर, जगदीश वांदिले, माया चाफले, ज्योती धार्मिक, वैशाली लांजेवार, मधुकर चाफले, डॉ.गिरीधर काचोळे, सचिन येवले आदी उपस्थित होते.

## रेल्वेच्या वेगवेगळ्या दोन अपघातात दोघांचा मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** शेगाव येथे दर्शन घेऊन रेल्वेने परतीचा प्रवास करीत असताना, सावंगी जवळील पुलाजवळ रेल्वे अपघात २८ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असल्याची घटना उघडकीस आली, अक्षय तिजारे (२८) असे मृतकाचे नाव आहेत.

समुद्रपूर तालुक्यातील मंगरूळ येथील अक्षय सुभाष तिजारे वय (२८) हा शेगाव येथे दर्शनासाठी गेला होता. परतीचा प्रवास रेल्वेने करीत असताना,सावंगी मेघे जवळील पुलाजवळ अक्षय हा रेल्वे मधून पडला आणि त्याचा मृत्यू झाला, याप्रकरणी सावंगी पोलीस ठाण्यात घटनेची नोंद घेण्यात आली आहे.

तर वरुड येथील समता नगर परिसरातील नरेश साधुजी जंजाळ वय (४५) हे मद्यधुंद अवस्थेत रेल्वे लाईन ओलांडून वरुड येथे मोहरम कार्यक्रम बघण्यासाठी जात असताना, वर्धेवरुन नागपूर कडे जाणाऱ्या रेल्वेने धडक दिली. घटनेची माहिती मृतकाचा भाऊ सतीश यांना दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.याप्रकरणी सेवाग्राम पोलीस ठाण्यात घटनेची नोंद घेण्यात आली आहे.

## परिस्थितीने घेतला बारावीच्या विद्यार्थिनीने गळफास

**वर्धा जनमाध्यम :** देवळी तालुक्यातील लोणसावळी येथील १७ वर्षीय विद्यार्थिनी ही वर्धेतील आदिवासी शासकीय वस्तीगृहात राहत होती.तिला बारावीच्या प्रवेशासाठी पैसे व कपड्याकरिता पैसे मागितले तेव्हा वडिलांनी पैशाची व्यवस्था करतो असे म्हटले, काय नाही तिला समजावून सांगितले की वस्तीगृहात तुझी ॲडमिशन आहेच पैसे आल्यानंतर आपण तुझ्या शाळेची ॲडमिशन आणि कपडे करू असे सांगून तिची समजूत काढत होते, पण ती ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हती, अखेर राहत्या घरी कोणी नसताना तिने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.

लोणसावळी येथील विद्यार्थिनी सोनिया वासुदेव उईके वय (१७) ही अकरावीचे शिक्षण घेण्यासाठी वर्धेतील न्यू इंग्लिश हायस्कूल येथे




कॉमर्स विभागात शिक्षण घेत होती, आणि आदिवासी शासकीय वस्तीगृहात राहत होती. वस्तीगृहातून ती आपल्या वडिलांच्या गावी गेली असता, तिने वडील वासुदेव उईके यांच्याकडे बारावीचे शिक्षण घेण्याचे सांगितले होते. बारावीच्या प्रवेशासाठी तिने वडिलांकडे पैसे मागितले असता, वडिलांची हालकीची परिस्थिती असल्याने तिच्या वडिलांनी पैशाची व्यवस्था करतो असे सांगितले, बारावीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेऊ असे मृतक सोनियाला सांगण्यात आले होते. बारावीचे शिक्षण अपूर्ण राहील या चिंचेत असलेल्या सोनियाने राहत्या घरी दुपारच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची धक्कादायक घटना पुलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडली.याप्रकरणी पुलगाव पोलीस ठाण्यात घटनेची नोंद घेण्यात आली आहे.

## सापांचे खेळ दाखवणाऱ्या आरोपीला आजपर्यंत वनकोठडी

**वर्धा जनमाध्यम :** गोपनीय माहितीच्या आधारे प्रादेशिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आजनसरा येथे धडक कारवाई करीत १३ साप बाळगून खेळ दाखवित असलेल्या चौघांना ताब्यात घेत बेड्या ठोकल्या. या प्रकरणातील चारही जणांना हिंगणघाट येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना आज ७ जुलैपर्यंत वनकोठडी ठोठावण्यात आली आहे.




हिंगणघाट तालुक्यातील आजनसरा येथे काही तरुणांकडे मोठ्या संख्येने साप असल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली.

त्यानंतर उपवनसंरक्षक हरवीर सिंह यांच्या मार्गदर्शनात वर्धा वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, जी. एस. सयाम, केशव माने, पारस बढदे, शिवाजी राठोड, अरुण गिते, प्रशांत कनेरी यांनी आजनसरा गाठले. तेथे वनविभागाच्या चमूने संकेत लखपती पाठक (२५) रा. लावा नागपूर, शशिकांत रमेश बागडे (३५) रा. सुयोटोला, गोंदिया, रुपेश दिलीप गुप्ता (२९) रा. कोहळे ले-आउट, नागपूर, स्वप्नील गजानन काळे (३०) रा. वाडी, नागपूर यांना ताब्यात घेत त्यांच्याजवळील साहित्याची पाहणी केली असता ३ कोब्रा, २ तस्कर, ३ धामण, २ अजगर, १ कुकरी, १ पानदिवड, कवड्या प्रजातीचा १ असे १३ साप आढळून आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी १३ साप व एम. एच. ३१ डी. के. ४८८४ क्रमांकाची कार आदी मुद्देमाल जप्त करून त्यांच्याविरुद्ध वनगुन्हा दाखल केला. या चौघांना हिंगणघाट येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने आज ७ जुलैपर्यंत वनकोठडी ठोठावली.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# कुपोषण आणि महाराष्ट्र

कोणत्याही समस्येकडे कानाडोळा केला, तर त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. जोपर्यंत समस्येचे आपणास त्रास जाणवत नाही, समस्या आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत येत नाही, समस्येमुळे आपली व्यक्तिगत हानी होत नाही, तोपर्यंत आपण जागे होत नाही. समस्या निवारणासाठी प्रयत्न केले जातात. समस्येच्या गांभीर्याबाबत टाहो फोडला जातो. हीच आजवर आपल्या देशातील प्रत्येकाची मानसिकता आहे. राज्यात कुपोषणाची आकडेवारी जाहीर होताच अनेकांची झोप उडाली आहे. त्याला निमित्ही तसेच घडले आहे. कुपोषणाची समस्या म्हटल्यावर प्रत्येकाच्या नजरेसमोर आजवर मेळघाट अथवा आदिवासी पाडे यायचे. अगदी गुगलवर कुपोषण म्हटल्यावर मेळघाट परिसरातीलच फोटो पाहावयास मिळतात. वेळीच कुपोषण समस्येवर तोडगा काढला असता, या समस्येचे गांभीर्य जाणून समस्येचे समूळ निवारण करण्यासाठी प्रयत्न केले असते, तर कदाचित आज या समस्येचा भस्मासूर फोफावणे शक्यच झाले नसते. राजकीय चर्चा, राजकीय वाद, राजकीय घडामोडी याशिवाय आपले देशातील, राज्यातील, स्थानिक स्वराज्य संस्थामधील समस्यांकडे आपले लक्ष वेधले जात नाही. कुपोषण समस्या आजही मेळघाटापुरती, आदिवासी पाड्यांपुरतीच सीमित राहिली असते, तर कोणी कुपोषणाबाबत फारशी चर्चाही केली नसती, पण आज कुपोषणाच्या समस्येने मेळघाटाचे दरवाजे ओलांडून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत शिरकाव केला आहे. ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही या आजाराने आपले अस्तित्व दाखविण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्राची राजधानी असणारी मुंबई नगरीदेखील कुपोषणाच्या विळख्यात अडकली आहे. राज्यात कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण हे मुंबईत असल्याचे कागदोपत्री उघडकीस आल्यावर अनेकांच्या झोपा उडाल्या आहेत. अर्थात कुपोषणाचा उद्रेक हे आरोग्य यंत्रणेचे अपयश आहे. प्रशासकीय यंत्रणांनी कुपोषणाचे गांभीर्य न जाणल्याने आज कुपोषणाच्या समस्येचा उद्रेक झालेला आहे. कुपोषणाच्या वाढत्या प्रमाणाची कबुली खुद्द विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्य सरकारकडून देण्यात आली आहे. राज्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके आढळली असून त्यापैकी ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषणाच्या श्रेणीत असून १ लाख ५१ हजार ६४३ बालके मध्यम कुपोषित श्रेणीत असल्याची धक्कादायक माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नांच्या लेखी उत्तरात दिली आहे. राज्यात सर्वाधिक २ हजार ७७८ तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात आढळून आल्याचे तटकरे यांनी उत्तरात नमूद केले आहे. नाशिक जिल्ह्यात ८ हजार ९४४ मध्यम कुपोषित, तर १ हजार ८५२ तीव्र कुपोषित बालके आढळून आली आहेत. धुळे जिल्ह्यात ६ हजार ३७७ मध्यम कुपोषित, तर १ हजार ७४१ बालके तीव्र कुपोषित आहेत. कुपोषणाची समस्या भारतासारख्या विकसनशील देशाला भूषणावह बाब नसून यावर आता केंद्र सरकार, त्या-त्या राज्य सरकारांना एकत्रितपणे गांभीर्याने विचार करावाच लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बालकांच्या कुपोषणाच्या गंभीर समस्येला देश तोंड देत आहे. देशाची भावी पिढी सशक्त, सुदृढ असणे देशाच्या पुढच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी लहान वयातच मुलांना चांगला सकस व पोषक आहार मिळणे आवश्यक आहे. मात्र गरिबीमुळे लाखो मुलांना आणि मातेलाही पोषक आहार मिळत नसल्याने जन्मतः कुपोषणाची शिकार ठरणाऱ्या बालकांचे प्रमाण मोठे आहे. याबाबतीत नुकतीच माहितीच्या अधिकाराखाली सरकारने दिलेली आकडेवारी धक्कादायक असून, देशात महाराष्ट्र कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात ३३ लाखांहून अधिक कुपोषित बालके असून, त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक मुले अतिकुपोषित आहेत. महाराष्ट्र, बिहार आणि गुजरात या तीन राज्यांमध्ये कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक असून, यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. करोना या जागतिक महामारीच्या संकटामुळे कुपोषणाची समस्या अधिक गंभीर झाली आहे. सर्व सामाजिक - आर्थिक निर्देशकांवर कोरोना साथीचा नकारात्मक परिणाम झाला आहे. या काळात शाळांमध्ये मिळणारे मध्यान्ह भोजन बंद झाल्याने अनेक गरीब कुटुंबातील बालकांमध्ये कुपोषण वाढले आहे. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलणे काळाची गरज आहे. कुपोषणामुळे कोणत्याही आजाराचा संसर्ग होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे बालकांमधील कुपोषणाची समस्या दूर करण्यासाठी गर्भारपणापासून उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या मातांनादेखील पोषक आहार मिळणे आवश्यक आहे. यासाठी सहा महिन्यांच्या मुलांना व्यवस्थित स्तनपान मिळेल आणि वयाच्या ५ व्या वर्षांपर्यंत त्यांना संतुलित पोषक आहार मिळेल याची सोय करणे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात गर्भधारणेच्या काळात व प्रसूती झाल्यावर मातेच्या पोषणासाठी कोणतेही ठोस धोरण नाही. अर्थात २००० पासून नवजात आणि लहान मुलांसाठी दुग्धपानाचे (आयवायसीएफ) काम सुरू आहे हे खरे; परंतु त्याला प्रोत्साहन देणे, उदाहरणार्थ पहिल्या सहा महिन्यांत विशेष स्तनपान आणि प्रभावी नर्सिंगची सुविधा उपलब्ध करणे, त्यानंतर स्तनपानाला पर्याय म्हणून बाळाला उपयुक्त हलका घनरूप आहार देणे यासंबंधीच्या लोकव्यवहारांचा अद्याप अभाव आहे. वस्तुतः सहा महिन्यांपेक्षा अधिक वय असलेल्या बाळाला किती, कोणता आणि कसा आहार द्यावा, हे बाळांची देखभाल करणाऱ्यांना बऱ्याचदा माहीतच नसते. एवढेच नव्हे, तर घन आहार सुरू केल्यानंतरसुद्धा स्तनपान सुरूच ठेवायला हवे. स्तनपानाविषयी अचूक माहिती नसल्याचा परिणाम म्हणून लहान मुलांमध्ये स्थूलता, पोषक घटकांची कमतरता आणि बिगरसंसर्गजन्य आजारांची शक्यता वाढते. पुरेसा आहार न मिळाल्याने मुलांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत माता-पिता अनभिज्ञ असतात. राजकीय घटनांना आता दिले जाणारे महत्त्व आता बंद करून लहान मुलांच्या पोषणाकडे गंभीरपणे लक्ष हे द्यावे लागेल. देशाची भावी पिढी असणारी बालके लहानपणीच कुपोषित असतील, तर देशाचे भविष्य काय असणार आहे? यावर सर्वांनी आताच एकत्रितपणे विचारमंथन करणे आवश्यक आहे. कुपोषित बालकांची समस्या केवळ गरिबांच्या घरातच नाही, तर आता श्रीमंतांच्याही घरात पाहावयास मिळत आहे. आहाराबाबत मार्गदर्शन आता महिलांना गर्भधारणा होण्यापूर्वीच होणे आवश्यक आहे. कुपोषणाची वाढती आकडेवारी ही कमी न झाल्यास पुढील वाटचाल भीतिदायी असणार आहे.

# चीनची नवी चाल

**एका बाजूला भारताशी उच्चस्तरीय संवादाचे संकेत, कैलास-मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याची भाषा, तर दुसरीकडे भारताची सामूहिक दहशतवादाविरोधातील घोषणा रोखण्यासाठी पाकिस्तानच्या खांद्याला खांदा देऊन उभा राहणे. चीनचा हा दुटप्पीपणा जाणीवपूर्वक आहे. त्यातच 'सार्क' सारख्या रुजलेल्या संघटनेला पर्यायी संघटना उभा करण्याची खेळी. चीनची ही नवी चाल भारतासाठी मोठे आव्हान आहे.**



जागतिक पातळीवर बदलत्या समीकरणांचा गांभीर्याने विचार केल्यास भारताच्या वेगवान विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्यासाठी एक सुनियोजित षड्यंत्र रचले जात आहे की काय, अशी शंका घेण्यास अनुकूल चित्र दिसते. एकीकडे अमेरिकेसारख्या भारताचा पारंपरिक मित्रदेशाचे राष्ट्राध्यक्ष भारताला 'टॅरिफ किंग' असे म्हणत काश्मीरसारख्या संवेदनशील विषयाचे राजकारण करताना दिसतात, पहलगाममधील हल्ल्यांचे कर्तेकरविते असणाऱ्या पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांसोबत मेजवानी आयोजित करतात, बेकायदेशीर भारतीयांना विमानाद्वारे भारतात पाठवतात, तर दुसरीकडे आपला शेजारशत्रू असणारा चीन पाकिस्तान, बांगला देश, नेपाळ, मालदीव, म्यानमार यांना आपल्या कह्यात घेऊन भारताला घेरण्याचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी वेगवान कारवाया करताना दिसतो. यादरम्यान अमेरिका-चीन यांच्यातील व्यापार करार पूर्ण होतो. या सर्व घडामोडींमधील नेपथ्य शंका घेण्यास पूरक आहे. तूर्त चीनने खेळलेल्या एका नव्या चालीमुळे भारताच्या चिंता वाढवल्या आहेत.

अलीकडेच शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीत चीनने आपला 'ऑल वेदर फ्रेंड' असणाऱ्या पाकिस्तानची पापे झाकण्यासाठी एक खोडसाळपणा केला. यंदाच्या परिषदेला एक महत्त्वाची पार्श्वभूमी होती ती म्हणजे, जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताने राबवलेले 'ऑपरेशन सिंदूर!' हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनांनी केला होता, हे स्पष्ट झाले आहे. धर्माची विचारणा करून कुटुंबीयांसमोर २६ जणांची अत्यंत अमानुष पद्धतीने हत्या करण्याचा हा प्रकार मानवतेला काळिमा फासणारा होता. असे असूनही यंदाच्या बैठकीनंतर सादर करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनामध्ये या घटनेचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळण्यात आला. भारताला धक्का देण्यासाठी चीन आणि पाकिस्तानने संगनमताने मिळून रचलेले हे षड्यंत्र होते; परंतु भारताने याबाबत ठाम भूमिका घेत या दोन्ही राष्ट्रांवर पलटवार केला आणि या अंतिम मसुद्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. परिणामी, या बैठकीची फलनिष्पत्ती काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. चीन एका बाजूला भारताशी उच्चस्तरीय संवादाचे संकेत देतो, कैलास-मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याची तयारी दर्शवतो, तर दुसऱ्या बाजूला सामूहिक दहशतवादविरोधी घोषणा रोखण्यास पाकिस्तानच्या बाजूने उभा राहतो, हा दुटप्पीपणा जाणीवपूर्वक आहे.

चीनने अलीकडे पृथ्वीवरील दुर्मीळ धातू, विशिष्ट खतं व सुरंग खोदणाऱ्या यंत्रांवर निर्यातबंदी आणली आहे. ही उत्पादने भारतीय उद्योग, शेती आणि पायाभूत क्षेत्रासाठी महत्त्वाची आहेत. या प्रतिबंधांचा उद्देश भारताला आर्थिकदृष्ट्या दबावात ठेवण्याचा आहे. भारताने एफडीआय नियंत्रण, चिनी अप्सवर बंदी किंवा थेट उड्डाण मर्यादा यासारखे निर्णय घेतले, तर त्याची किंमत मोजावी लागेल, हे यातून चीनला सूचित करायचे आहे.

भारताची चिंता वाढवण्याचे मुख्य कारण ठरले आहे ते म्हणजे, सार्कला पर्यायी संघटना उभी करण्याची चीनची नवी खेळी. चीन पाकिस्तानसोबत एक नवीन प्रादेशिक संघटना स्थापन करण्याच्या तयारीत आहे. अलीकडेच चीनच्या कुनमिंग येथे चीन-पाकिस्तान-बांगला देश या तीन भारतविरोधी देशांमध्ये यासंदर्भात एक महत्त्वाची बैठक पार पडली असून त्यानंतर या संघटनेच्या योजनेला गती मिळाली आहे. या संघटनेविषयीचे अधिकृत तपशील अद्याप गोपनीय ठेवण्यात आले असले, तरी पडद्यामागे काय शिजत आहे, याचा सुगावा लागला आहे. या प्रस्तावित संघटनेत भारतासह अनेक दक्षिण आणि मध्य आशियाई देशांना सहभागी करण्याचा प्रस्ताव आहे; पण चीन व पाकिस्तान या दोघांशी भारताचे तणावपूर्ण संबंध लक्षात घेता भारत या प्रस्तावित संघटनेचा भाग होणार नाही, हे चीनला पूर्णपणे माहीत आहे.

दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना म्हणजेच सार्क हा संघ आर्थिक सहकार्य, प्रादेशिक विकास आणि सामाजिक प्रगतीला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आला. यामध्ये भारत, बांगला देश, अफगाणिस्तान, भूतान, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका असे आठ देश सदस्य आहेत. सार्कची स्थापना १९८५ मध्ये बांगला देशच्या ढाका शहरात झाली होती आणि सचिवालय नेपाळच्या काठमांडूमध्ये आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावामुळे २०१४ नंतर सार्कची द्वैवार्षिक संमेलने स्थगित झाली असून, यामुळे या संघटनेचा प्रभाव कमी झाला आहे. खरे तर, २०१६ मध्ये सार्क शिखर संमेलन पाकिस्तानमध्ये होणार होते; पण त्याच वेळी उरी येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत भारताने पाकिस्तानला जबाबदार धरले आणि शिखर संमेलनात सहभागी होण्यास नकार दिला. तेव्हापासून सार्क निष्क्रियच आहे. चीनने या प्रादेशिक पोकळीचा फायदा घेत इतर देशांना एकत्र करण्यास सुरुवात केली आहे आणि आता तो आपल्या नेतृत्वाखाली एक नवीन संघटना तयार करण्याच्या विचारात आहे. या प्रस्तावित संघटनेच्या माध्यमातून चीनला सार्कचे औचित्यच संपवून टाकायचे आहे.

या नव्या प्रस्तावित गटामध्ये श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान यांच्या सहभागाची शक्यता असल्याचीही चर्चा आहे. यंदाच्या मे महिन्यात चीन-पाक-अफगाणिस्तान यांच्यातही एक त्रिपक्षीय बैठक झाली होती. यामध्ये चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरचा (र्ण्ईर्णि) विस्तार आणि तालिबानी वर्चस्व असलेल्या अफगाणिस्तानसह प्रादेशिक सहकार्य वाढवण्यावर भर दिला गेला होता.

चीनने आपल्या महत्त्वाकांक्षी बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह प्रकल्पामार्फत दक्षिण आशियामध्ये आपली उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढवली आहे. कुनमिंग येथील त्रिपक्षीय बैठक ही बांगला देशासारख्या छोट्या देशांची मानसिकता तपासण्यासाठी होती. नव्या संघटनेच्या घोषणेसाठी कोणतीही वेळ अद्याप निश्चित झालेली नसली, तरी वर्षाअखेरपर्यंत याचे एक प्रारूप तयार होऊ शकते. हे प्रारूप आगामी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीच्या आसपास सादर होण्याची शक्यता आहे. चीनने भारताला वगळून अशा प्रकारची संघटना जन्माला घातलीच, तर दक्षिण आशियातील प्रादेशिक विचारसरणीत मोठा बदल होईल. ही बाब भारतासाठी चिंतेची ठरू शकते. नेपाळ, श्रीलंका यासारखे अन्य दक्षिण आशियाई देश या नव्या संघटनेबाबत कशी प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. २६ जून रोजी बांगला देशचे परराष्ट्र सल्लागार मोहम्मद तौहीद हुसेन यांना १९ जून रोजी झालेल्या बांगलादेश-चीन-पाकिस्तान बैठकीबाबत विचारले असता त्यांनी स्पष्टपणे अशी कोणतीही नवीन आघाडी स्थापन झालेली नाही, असे म्हटले आहे. हे सांगताना त्यांनी भारतासोबत बांगला देशचे संबंध पुन्हा सुधारत आहेत, असेही म्हटले आहे; पण बांगला देशचे विद्यमान सर्वेसर्वा मोहम्मद युनुस यांचे चीन प्रेम पाहता आणि त्यांची अलीकडच्या काळातील विधाने पाहता या देशाच्या भूमिकेविषयी वेगळे सांगण्याची गरज नाही.

दक्षिण आशियामध्ये भारत ही परंपरागत महासत्ता मानली जाते. भौगोलिक आकारमानामुळे, लोकसंख्येमुळे, लष्करी क्षमतेमुळे आणि आर्थिक ताकदीमुळे संपूर्ण उपखंडात भारताचे एक नैसर्गिक नेतृत्व आहे; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये चीनने या पारंपरिक नेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मागील काही वर्षांमध्ये सार्कच्या मंचावरही भारताने आघाडी घेतली होती. सार्क देशांसाठी स्वतंत्र उपग्रहाची संकल्पना भारतानेच मांडली होती. कोव्हिड काळात सार्क देशांमधील लसीकरणाबाबतही भारताने घेतलेला पुढाकार उल्लेखनीय होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०२० मध्ये सार्कच्या पहिल्यावहिल्या व्हिडीओ परिषदेत पुढाकार घेतला आणि कोव्हिड-१९ आपत्कालीन निधीची कल्पना मांडली. भारताने त्यासाठी १० दशलक्ष डॉलर्सचे योगदान जाहीर केले. सार्क व्हिसा सवलत योजना पाकिस्तानला लाभदायक ठरली होती; पण २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ती योजना स्थगित केली; पण २०१४ नंतर संघटना म्हणून सार्क पूर्णपणे निष्क्रिय स्थितीत गेली आहे. याचा थेट फायदा चीन उचलणार असे दिसत आहे. चीन भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावावर नियंत्रण ठेवू इच्छितो. ग्लोबल साऊथमध्ये भारताचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी चीन ही नवी प्रादेशिक यंत्रणा तयार करत आहे. चीनचा बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह हा प्रकल्प जागतिक पातळीवर व्यापार मार्ग आणि सहकार्याच्या नावाखाली रणनीतिक नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न आहे. दक्षिण आशियातील ही नवी संघटना बीआरआयचा अविभाज्य भाग बनू शकते. या संघटनेत भारताच्या शेजारील देश सहभागी झाले, तर 'अ?क्ट फॉर ईस्ट' या भारताच्या धोरणाला तो मोठा शह असणार आहे. भारत बीआरआयचा विरोधक आहे; पण नवीन प्रादेशिक गट बीआरआयचे समर्थन करणारा बनला, तर भारताचा आवाज दुर्लक्षित केला जाऊ शकतो.

सार्क संघटनेचा घसरता आलेख लक्षात घेऊन भारताने अलीकडील काळात 'बिमस्टेक' या मंचाला प्रोत्साहन दिले आहे. कारण, यामध्ये सार्कसारखा पाकिस्तानचा अडथळा नाही. याखेरीज भारत हा 'क्वाड'सारख्या चीनविरोधी गटांचा सदस्य आहे. असे असले, तरी चीनच्या नेतृत्वाखाली एखादी प्रादेशिक संघटना दक्षिण आशियात आकाराला येणे, ही भारतासाठी धोक्याची घंटाच म्हणावी लागेल. याचे कारण, दक्षिण आशियातील बहुतांश देशांना चीनने आपल्या कर्ज विळख्यात ओढले आहे. पाकिस्तान, श्रीलंका यांसारख्या देशांना अनेक वर्षे फेडू शकणार नाहीत इतकी प्रचंड कर्जे देऊन चीनने या देशांचे सार्वभौमत्वच हिरावून घेतले आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित संघटना प्रत्यक्षात अवतरली आणि तिने भारतविरोधात एखादा ठराव संमत केला, तर त्याचे जागतिक पटलावर उमटणारे पडसाद भारताला अडचणीचे ठरू शकतात. मागील काळात कॅनडाच्या माजी पंतप्रधानांनी खलिस्तानी दहशतवाद्याच्या हत्येस थेट भारताच्या सुरक्षा सल्लागारांना जबाबदार धरण्याचे पातक केले होते. विशेष म्हणजे, त्यावेळी अमेरिकेनेही कॅनडाची पाठराखण केली होती. अशा प्रकारचे वादग्रस्त आणि कॉन्पिरसी थिअरीवर आधारित मुद्दे उपस्थित करून भारताची कोंडी करण्याचा डाव प्रस्तावित संघटनेच्या माध्यमातून खेळला गेल्यास तो भारताच्या प्रतिमेला तडा देणारा ठरू शकतो.

वास्तविक, चीनच्या या प्रयत्नांना शह देऊन दक्षिण आशियातील शांततेसाठी, आर्थिक विकासासाठी 'सार्क' संघटना पुनरुज्जीवित करणे आवश्यक आहे. सार्क संघटना यशस्वीपणे कार्यरत असती, तर दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र अस्तित्वात आले असते. त्यातून सध्या केवळ ५ टक्के असलेले प्रादेशिक व्यापाराचे प्रमाण वाढले असते. दक्षिण आशियात सुमारे दोन अब्ज लोकसंख्या असूनही द्विपक्षीय संघर्षामुळे प्रादेशिक समृद्धी नेहमीच रखडत राहिली. या भागातील सुमारे ५० टक्के लोक अद्यापही दारिद्र्यरेषेखाली राहत आहे. सार्कच्या निष्क्रियतेमुळे व्यापारी आणि नागरी समाजाद्वारे निर्माण होणाऱ्या परस्पर संबंधांना खीळ बसली आहे. परिणामी, अनेक उद्योग आता प्रादेशिक पातळीऐवजी जागतिक बाजारपेठांकडे वळत आहेत. विशेषतः लहान देशांना याचा मोठा फटका बसत आहे. सार्क डेव्हलपमेंट फंडच्या साहाय्याने सुरू करण्यात आलेल्या आरोग्य केंद्रांनी अनेक दुर्गम भागांमध्ये जीव वाचवले आहेत. दुष्काळाच्या काळात अन्न बँकांच्या माध्यमातून गरजूंना मदत करण्यात आली; पण हे प्रकल्प मर्यादितच राहिले. त्यांना राजकीय पाठिंबा मिळाला असता, तर या योजना प्रादेशिक लसीकरण मोहिमा किंवा आपत्ती व्यवस्थापन पथकांमध्ये बदलू शकल्या असत्या. सार्क पर्यटक व्हिसा योजना अनेकदा चर्चेत आली; पण आजवर ती प्रत्यक्षात आलीच नाही. दक्षिण आशियातील सर्व देशांच्या राजधानी थेट विमानसेवांनी जोडल्या गेल्या, तर पर्यटन, संवाद आणि सांस्कृतिक आदान-प्रदान याला मोठी चालना मिळू शकते. ऊर्जानिर्मिती, सामाजिक विकास, व्यापार व दळणवळण क्षेत्रातील अनेक करार परिषदेत पारित करूनही ते अंमलात आणले गेलेले नाहीत. सार्क हा केवळ एक संस्थात्मक मंच नाही, तर भौगोलिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून तयार झालेली एक नैसर्गिक संकल्पना आहे. या भागातील देश हे केवळ शेजारी नाहीत, तर हजारो वर्षांच्या संस्कृती, चालीरीती, अन्न संस्कृती, भाषा, उत्सव यामध्ये एकमेकांशी गुंतलेले आहेत. म्हणूनच सार्कला कोणताही बाह्य गट किंवा जागतिक मंच पर्याय ठरू शकत नाही, हेही तितकेच खरे आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा ठाकरे ब्रँड ....

मराठीच्या मुद्द्यावर आवाज उठवणारे पण गेल्या दोन दशकांपासून दुर गेलेले मनसेचे सर्वेसर्वा राज आणि ठाकरे शिवसेनेचे सुप्रीमो उद्धव ठाकरे हे दोन बंधु एकत्र कधी येणार ? याची महाराष्ट्रातील तमाम मराठीजनांना आस लागून राहिली होती पण हिंदी सक्ती विरोधात रान उठवणाऱ्या या दोन्हीं बंधूंना एकाच मंचावर 'याची देही याची डोळा' एकत्र पाहून आनंद गगनात मावेनासा झाला.वरळीच्या एनएससीआय डोममध्ये आवाज घुमला तो मराठीचाच आषाढी एकादशीच्या पार्श्वभुमीवर ठाकरे बंधूंनी मराठीचा झेंडा हाती घेत एकत्र येण्यावर जणू शिक्कामोर्तबच केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा जनतेकडून महाराष्ट्रात ठाकरे ब्रँडला पसंती मिळण्याची शक्यता राजकीय गोटातून वर्तविण्यात येते आहे. हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेतल्यानंतर हा विजयी मेळावा ५ जुलै रोजी घेण्यात आला. यावेळी तुडूंब गर्दी झाली होती. राज आणि उद्धव ठाकरे बंधू एकत्र येणार म्हटल्यावर संपूर्ण महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागून राहिले होते. या दोन बंधुंमुळे महाराष्ट्रात नव्या राजकीय समीकरणांची फेरमांडणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज राजकारणामध्ये वेगळा पायंडा पडला असताना ठाकरे बांधवांनी २० वर्षानंतर एकत्र येत नवा इतिहास रचला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण पसरले आहे. याचे परिवर्तन मतपेटीत कसे होईल यासाठी रात्रीचा दिवस करुन दोघांनी पुन्हा एकदा शिवसेनेला गतवैभव मिळवून देणे क्रमप्राप्त ठरते.

**राजू जाधव**

## गुरूचे महत्त्व

गुरु शिष्य परंपरा हे भारत हे वैशिष्ट्य आहे शिष्याच्या जीवनातील अंधकाराचा नाश करून त्याला ईश्वरापर्यंत मिळण्याचे कार्य सुरू करत असतात पृथ्वीवरचे ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरु असतात आणि गुरु हे ईश्वराचे निर्गुण रूप असतात. त्याचप्रमाणे शिष्याचे अज्ञान घालवून त्याची अध्यात्मिक प्रगती व्हावी यासाठी त्याला ते साधना सांगतात तसेच ती त्याच्याकडून करून घेतात आणि त्याला अनुभूती देतात त्यांना गुरु असे म्हणतात गुरु शिष्याच्या व्यवहारिक जीवनातील सुखाकडे लक्ष देत नाहीत कारण ते त्याच्या प्रारब्धानुसार असते गुरु फक्त शिष्याची अध्यात्मिक उन्नती कशी होईल एवढेच पाहतात ईश्वर निर्गुण असल्याने तो प्रत्यक्षपणे आपल्याशी बोलू शकत नाही यासाठीच तो आपली गुरूंची गाठ घालून देतो आपल्यामध्ये गुरुप्राप्ती व्हावी अशी तीव्र तळमळ असेल तर त्याचा गुणामुळे सुद्धा आपल्याला गुरु प्राप्ती होते आणि आपल्यावर गुरूंची कृपा होते असे गुरूंचे महत्त्व आहे.

**संगिता भोसले**

# अन्नधान्याचा वापर मद्य निर्मितीसाठी योग्य?

अलीकडेच महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र 'मेड लिकर' या नव्या मद्य प्रकाराला मान्यता दिली. अन्नधान्यापासून त्याची निर्मिती होणार असल्याने यातून मिळणाऱ्या कररूपाने सरकारी तिजोरी भरू शकेल असे म्हटले आहे. पण यामुळे अनेक नवे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता राहू शकते. दारूमुळे सामाजिक समस्या आणखीनच गंभीर होऊन अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होऊन राखरांगोळी होऊ शकते. तरुण पिढी देशोधडीला लागेल. विकसित भारतामध्ये महाराष्ट्रात समाजकंटकांचा उपद्रव वाढू शकतो. झिंगलेल्या लोकांमुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. विकासाच्या नावाखाली विनाश ओढवून घेण्याचा हा निर्णय म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी असे म्हणण्याची वेळ आली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील लाखो महिलांना दरमहा आर्थिक मदत मिळू लागली आहे. मात्र राज्यात दरवर्षी ४५ हजार कोटी रुपये इतका आर्थिक भार सरकारी तिजोरीवर पडत आहे. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात सरकारची वित्तीय तूट ९५ हजार ५०० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आणि ही तूट भरून काढण्यासाठी सरकारला उत्पन्नाचे नवे स्तोत्र शोधावे लागत आहेत. आणि यातूनच अन्नधान्यापासून मद्य निर्मितीस प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्यातील महायुती सरकारने घेतला. मद्य विक्रीतून सरकारच्या तिजोरीत प्रतिवर्षी उत्पादन शुल्क व विक्री कर मिळून जवळपास दोन हजार सातशे कोटी रुपये जमा होऊ शकतात, असा सरकारचा दावा आहे. पण या महसुलीमुळे शेतकरी, महिला आणि गरीब जनता देशोधडीला लागू शकते.

### माझेही मत

राज्यात गेल्या काही वर्षांपासून अनेक भागात आजही कुपोषण, अन्नधान्याचा अपुरा पुरवठा, सरकारी गोदामातील धान्याचा मोठ्या प्रमाणात होणारा अपव्यय हे प्रश्न गंभीररीत्या निर्माण झाले आहेत. देशातील गरीब कुटुंबांना आजही एकवेळचे जेवण मिळत नाही आहे. ऐंशी कोटी जनतेला केंद्र सरकारकडून मोफत धान्य मिळत असले तरी खऱ्या गरजूंपर्यंत ही खरेच पोहोचते काय हा खरा प्रश्न आहे. अन्नधान्याचा वापर मद्य निर्मितीसाठी करणे हे सामाजिकदृष्ट्या पूर्णतः धोकादायक आहे. राज्यातील तत्कालीन विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना अन्नधान्यापासून मद्यार्क निर्मितीसाठी परवानगी देण्यात आली होती. आणि त्याला राज्यभरातून मोठा विरोध झाला होता.

मद्य नव्हे तर भूक महत्वाची अशा प्रतिक्रिया त्यावेळी उमटल्या होत्या. जनक्षोमामुळे सरकारला नाईलाजाने आपल्याच निर्णयाबाबत पुनर्विचार करावा लागला होता. याबाबत न्यायालयात अनेक याचिकाही दाखल झाल्या होत्या. आणि हा इतिहास असताना राज्य सरकारने अन्नधान्यापासून मद्दार्क निर्मितीचा निर्णय घेणे योग्य ठरत नाही. देशात उत्तर प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा आणि कर्नाटक या अन्नधान्यापासून मद्यार्क निर्मिती होते. परंतु पुरोगामी महाराष्ट्र म्हणवून घेणाऱ्या आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राज्य कारभार करणाऱ्या महायुतीतील नेत्यांना अन्नधान्यापासून मद्य निर्मितीचा निर्णय घेणे म्हणजे आपल्याच विचारांना हरताळ फासण्यासारखे आहे. अन्नसुरक्षाला धोका निर्माण करणारा, तरुणांना व्यसनाच्या आहारी लोटणारा हा निर्णय महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारा ठरत नाही.

**मधुकर चुटे,**
नागपूर
मो.९४२०५६६४०४

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

या वर्षासाठी ९ हजार ३०० कोटींचा ऋण आराखडा, बँकांनी आर्थिक साक्षरता शिबिर राबविण्याचे निर्देश

# जिल्हाधिका-यांच्याहस्ते वार्षिक ऋण योजना पुस्तिकेचे विमोचन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या विशेष आढावा बैठकीत जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते वार्षिक ऋण योजना पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. सन २०२५-२६ या वर्षासाठी ९ हजार ३०० कोटीचा ऋण आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या आर्थिक साक्षरता शिबिरामध्ये जास्तीत जास्त नागरिकांना सेवा देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

यावेळी भारतीय रिजर्व बँकेचे मॅनेजर पियुष अग्रवाल, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक ज्ञानेश्वर टापरे, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी अतुल इंगळे, सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड व बँकाचे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा समन्वयक उपस्थित होते. जिल्हा अग्रणी बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता तयार केलेल्या ९ हजार ३०० कोटींच्या ऋण आराखड्यात प्राधान्य क्षेत्रात ६ हजार २०० कोटींचे वाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. गैर प्राधान्य क्षेत्रासाठी ३ हजार १०० कोटींच्या कर्ज वाटपाचा समावेश आहे. आराखड्याप्रमाणे बँकांना वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्याप्रमाणे कर्जवाटपाच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार संपूर्ण भारतभर १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान विशेष आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा अग्रणी बँक कार्यालयाद्वारे ग्रामपंचायत निहाय बँक शाखेद्वारा घेण्यात येणाऱ्या आर्थिक साक्षरता शिबिराचे नियोजन करण्यात आलेले असून जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँक, खाजगी बँक, ग्रामीण बँक व जिल्हा मध्यवर्ती बँक या अभियानात सहभागी आहे. या दरम्यान बँकांनी नागरिकांना जास्तीत जास्त आर्थिक सेवा उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. या शिबिराद्वारा अटल पेंशन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, सुकन्या योजना व पीपीएफ खाते याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. खातेदारास सामाजिक सुरक्षा योजनेमध्ये सहभागी होण्याकरीता नोंदणी करता येणार आहे.

## आत्महत्याग्रस्त कुटुंबांना कृषी निविष्ठा

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यातील ८८ आत्महत्याग्रस्त कुटुंबांना विनामूल्य कृषी निविष्ठा व बियाणे देण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात २ कुटुंबांना कृषी निविष्ठा व बियाण्यांची किट वितरीत करण्यात आली.

## ट्रॅक्टरच्या ट्रॉली खाली दबून यूवकाचा मृत्यू



बाभूळगाव - मुरूम भरलेली ट्रॉली खाली करीत असतांना ट्रॉली खाली दबून यूवकाचा मृत्यू झाल्याची घटना दि.4 जुलै रोजी खडकसावंगा येथे घडली. निशु उर्फ टिकमचंद रामचंद्र कामडी 20 वर्ष रा.खडकसावंगा असे मृतक युवकाचे नाव आहे. मृतक निशु याने एक महिन्या पूर्वी ट्रॅक्टर घेतला व या ट्रॅक्टरने मुरूम टाकण्याचे काम करीत होता. दिनांक 4 जुलै रोजी दुपारी ट्रॅक्टर ने मुरूम घेऊन गावातील जगदीश कुरडकर यांच्या घरी भिंतीच्या बाजूला ट्रॅक्टरची हायड्रॉलिक लाऊन मुरूम खाली करीत असतांना मृतक हा भिंतीच्या बाजूला उभा होता मटेरियल आडवे तिडवे झाल्यामुळे ट्रॉली उभा असलेले मृतकाच्या अंगावर ट्रॉली उलटली त्यात तो कंबरे पर्यंत दबला गेला लगेच गावातील नागरिकांनी दोराच्या साह्याने थोडी ट्रॉली उचलून मृतकास बाहेर काढण्यात आले. यात त्याच्या कंबरेला व त्याखालील नाजूक अवयव यांना मार लागल्याने त्याला यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले उपचारा दरम्यान दि.5 रोजी सकाळी रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला.

# पोलीस ठाणे पुसद (शहर) कडुन गोवंश मांस वाहतुक करणाऱ्यांवर मोठी कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - ६ जुलै रोजी पोलीस स्टेशन पुसद (शहर) चे ठाणेदार पो.नि. सेवानंद वानखडे हे त्यांचे पोलीस स्टाफ पो.हे. कॉ. संतोष आढाव, ब.नं. २१९९, पो.हे. कॉ. अभिमन्यु चव्हाण, ब.नं.४९७. पो.हे.कॉ. मंदाकीनी भगत, ब.नं.७५८, पो.हे.कॉ. मनोज कदम, ब.नं. १४६३, पो.ना. दिनेश सोळंके, ब.नं. २२८५, पो.कॉ. आकाश बाभुळकर, ब.नं.२०३८ यांचे सह आषाढी बंदोबस्त निमीत्ताने शहरात पेट्रोलींग करीत असतांना, अंदाजे ०८.३० वाजता चे सुमारास त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, एक ईसम हा त्याचे ऑटो क्रमांक MH-२६-TC-०४१६ चालक सैय्यद सालार सैय्यद रज्जाक, वय-५६ वर्षे, रा. गढीवार्ड पुसद हा त्याचे ऑटोमध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले गोवंस मांस वाहतुक करुन घेवुन जाणार आहे. वरुन सदर ऑटो व चालकास ऑटोच्या मधल्या शिटच्या गाल्यामध्ये नायलॉन पोत्याची फारीमध्ये गुंडाळुन मांस झाकुन ठेवुन वाहतुक करतांना पकडले.

सदरचे गोवंस मांस हे मुहम्मद अतिक मुहम्मद अकील कुरेशी, वय अं-३० वर्षे, रा. उर्दू स्कुल नेहरुन वार्ड पुसद याचे सांगणेवरुन लोहार लाईन पुसद येथे घेवुन जात असल्याचे ऑटोचालकाने सांगीतले. पंचासमक्ष मुद्देमालासह आरोपीस ताब्यात घेवुन पो.स्टे. पुसद (शहर) येथे आणले व सुशिल शंकर चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी, लघु पशु चिकित्सालय पुसद मांसाची तपासणी केली असता सदर मांस हे गोवंशाचे असल्याचे प्रथमदर्शनी सांगीतले व सदर मासांचे सॅम्पल घेण्यात आले आहे. आरोपीचा ऑटो बजाज कंपनीचा किंमत अंदाजे १,५०,०००/- रुपये, ऑटोमधील गोवंश मांस वजन अंदाजे १२० कि.ग्रॅ. कि.अं. २४,०००/- रुपये, एक ईलेक्ट्रॉनीक वजन काटा किंमत अंदाजे १,५०० रुपये, एक लोखंडी सुरा किंमत अंदाजे ००.०० रुपये, ऑटो चालक याचा मोबाईल कि.अं.७,०००/- रुपये, असा एकूण १,८२,५००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे व आरोपी विरुध्द अप.क्र. ४१६/२०२५, कलम-५,५ (क),९,९ (अ) महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम-१९७६ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, हनुमंत गायकवाड, SDPO पुसद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे पुसद (शहर) चे ठाणेदार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांचे नेतृत्वात त्यांचे अधिनस्त पोलीस पथकाने केली असुन गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. प्रेमकुमार केदार हे करीत आहेत.

# राळेगाव शासकीय गोडाऊनला आग

## १ हजार ४९१ क्विंटल ज्वारी जळून खाक



**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव : आज ६ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास राळेगाव येथील शासकीय गोडाऊनला अचानक आग लागून एकच खळबळ उडाली. या भीषण आगीत शासनाने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेली सुमारे १४९१ क्विंटल ज्वारी जळून खाक झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज प्रशासनाने वर्तविला असून, रविवार असल्यामुळे गोडाऊनमधील कामकाज पूर्णपणे बंद होते. त्यामुळे मानवी हानी टळली असली तरी अन्नधान्याचे मोठे नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच राळेगाव अग्निशामक दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. परंतु आग आटोक्यात न आल्याने कळंब आणि यवतमाळ येथूनही अग्निशामक गाड्या पाचारण करण्यात आल्या. तिन्ही गाड्यांच्या साह्याने आग नियंत्रणात आणण्यात यश आले. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी (SDO), तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. सध्या गोडाऊन परिसर बंद करून पंचनामा सुरू असून, नुकसानाचे नेमके मूल्यमापन करण्याचे काम प्रशासनाच्या पथकाकडून सुरू आहे. घटनेचा सखोल तपास करण्यात येत असून शॉर्टसर्किटची शक्यता असल्याने विज वितरण विभागाकडूनही चौकशी सुरू आहे. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे धान्य जळून गेल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी यासाठी स्थानिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

# शेजाऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला करणाऱ्या आरोपीस जन्मठेप

## ११ जणांची साक्ष निर्णायक ;पुसद अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील रोहडा येथील आरोपी संतोष किसन कानडे याने त्याचा शेजारी मारोती पोपळघट यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात आरोपीस भा.दं. वि.चे कलम ३०७नुसार जन्मठेप व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. जे. रामगडिया यांनी सुनावली.

मारोती पोपळघट यांच्या सोबत घरासमोरील नळाच्या कारणावरून कानडे यांचा सतत वाद होत होता. ११ नोव्हेंबर २०१४ रोजी या दोन शेजाऱ्यांत नळाचे पाणी भरण्यावरून वाद झाला. त्या वादातून आरोपी कानडे हा चटणी मिश्रीत पाण्याचा डब्बा व कुऱ्हाड घेऊन पोपळघट यांच्या घरासमोर आला व चटणी मिश्रीत पाणी फेकून हातातील कुऱ्हाडीने त्यांच्या मानेवर, तसेच उजव्या बाजूला वार केला.

पोपळघट हे खाली पडल्यानंतरही आरोपीने त्यांच्यावर दोन ते तीन वेळा वार केले. यात पोपळघट हे बेशुद्ध होऊन खाली कोसळले. त्यानंतर आरोपीने कुऱ्हाड घटनास्थळी टाकून पळ काढला. जखमीचा मुंबई येथे शस्त्रक्रियेनंतर जीव वाचला, परंतु सदर हल्ल्यामुळे पोपळघट यांच्या चेहऱ्यास कायमस्वरूपी अपंगत्व आले.

### न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवालही ठरला महत्त्वाचा

सरकार पक्षातर्फे फिर्यादी, जखमीचा पुतण्या प्रल्हाद, मारोती पोपळघट, वैद्यकीय अधिकारी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, तसेच न्यायवैद्यकीय पुराव्याच्या अनुषंगाने साक्ष नोंदविण्यात आली. सदर प्रकरणामध्ये जप्त साहित्यांचे परीक्षण त्यामध्ये आरोपीच्या पॅन्टवर, शस्त्रावर जखमी यांच्या रक्ताचा नमुना आढळल्याचा अहवाल न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेमार्फत दाखल करण्यात आला. तो अहवाल तसेच जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता महत्त्वपूर्ण ठरला.

### खंडाळा ठाण्यात गुन्हा

खंडाळा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भा.द.वि.चे कलम ३०७ व ५०६ नुसार गुन्हा दाखल झाला. पीएसआय देवराव राठोड यांनी तपास करून दोषारोपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी संतोष कानडे याला जन्मठेप सुनावली. शासनाची बाजू सरकारी वकील ॲड. मनोज काळेश्वरकर यांनी मांडली, तर जगदीश पवार यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम पाहिले.

# वेचक

## भारत आदर्श ग्राम स्वराज अभियानांतर्गत विविध गावांत वृक्षारोपण



यवतमाळ - शिवणी येथील पैरा कमांडो योगेश्वर राठोड (सेवानिवृत्त, भारतीय सेना) यांच्या संकल्पनेतून 'भारत आदर्श ग्राम स्वराज अभियान'च्या माध्यमातून आई व मातृभूमीसाठी एक झाड लावण्याची अभिनव मोहिम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शिवणी, जरंगगाव, जरूर, मोवाडा (लहान), कोपरा, राजुरवाडी, मोहाडा (मोठा), आंबडी या गावांमध्ये मोठ्या उत्साहात वृक्षारोपणाचे कार्यक्रम पार पडले. या उपक्रमात ग्रामस्थ, महिला, युवक-युवती, शाळकरी विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देत प्रत्येक गावात वृक्षारोपण करून, आई व मातृभूमीसाठी आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून झाड लावण्यात आले. पैरा कमांडो योगेश्वर राठोड यांनी यावेळी सांगितले की, "वृक्षारोपण हे भविष्यासाठी सर्वोत्तम गुंतवणूक आहे. यामुळे येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण तयार होणार आहे. ही मोहीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून पुढील काळातही ही चळवळ गावागावांत रुजवली जाणार आहे." गावकऱ्यांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत प्रत्येकाने किमान एक झाड लावण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे परिसराचे हरित क्षेत्र वाढणार असून, पर्यावरण संवर्धनाबरोबरच पाणलोट क्षेत्राचा विकास, मृदा संरक्षण आणि प्रदूषण कमी होण्यास हातभार लागणार आहे.

## शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अँड निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

यवतमाळ - वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अँड निलेश हेलोंडे पाटील जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. मंगळवार दि.८ जुलै रोजी दुपारी १ वाजता विश्रामगृह नेर येथे आगमन व तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवडीबाबत चर्चा व राखीव. दुपारी १.४५ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. त्यानंतर तालुक्यातील प्रस्तावित चारा लागवड ठिकाणास भेट. दुपारी ३.३० वाजता विश्रामगृह बाभूळगाव येथे आगमन व तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवडीबाबत चर्चा व राखीव. सायंकाळी ४ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. त्यानंतर तालुक्यातील प्रस्तावित चारा लागवड ठिकाणास भेट. सायंकाळी ६ वाजता काटोलकडे प्रयाण करतील.

## ऑटोच्या धडकेत गंभीर जखमी वृद्धाचा मृत्यू

दिग्रस : पायदळ जात असलेल्या एका वृद्धाला भरघाव ऑटोचालकाने जोरदार धडक दिली. या अपघातात जखमी वृध्दाचा उपचारादरम्यान रूग्णालयात मृत्यू झाला. ही घटना १५ जुन रोजी शहरातील लोहारा येथील मार्केटजवळ घडली. मोहम्मद इसहाक शेख हसन बालापुरे (८८) रा. सुभाष नगर असे अपघातातील मृतकाचे नाव आहे. ते कामावरून पायदळघरी येत होते. त्याच दरम्यान एका ऑटोचालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेने वृध्द खाली कोसळून गंभीर जखमी झाला. घटनेनंतर नातेवाईकांनी त्यांना सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.

## जुन्या वादावरून थापडबुक्क्यांनी मारहाण

यवतमाळ : जुन्या पैशाच्या वादावरून शिवीगाळ करीत एकाला थापडबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हेतर संबंधीताच्या भावाला चाकुने मारून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना ३ जुलै रोजी वणी येथील साई मंदिर परीसरात घडली. कुणाल रमेश लोहकरे (३२) रा. तलावफैल वणी असे मारहाण झालेल्या इसमाचे नाव आहे.

## शेतकऱ्याची आत्महत्या

मारेगाव : एका शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना ५ जुलै रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास तालुक्यातील कोलगाव येथे उघडकीस आली. प्रमोद उर्फ जगन रुद्राजी धोंगडे (४५) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे.

# वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी 'वृत्तपत्र विक्रेता भवन' उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ : आ. बाळासाहेब मांगुळकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - आज ६ जुलैला दु. १ वाजता यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेद्वारा वृत्तपत्र विक्रेता सदस्यांची पाल्य व वृत्तपत्र वितरण करून १० वी १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आ. बाळासाहेब मांगुळकर यांचा प्रथम वृत्तपत्र विक्रेता संघातर्फे सत्कार करण्यात आले. त्यानंतर १० वी १२ वी विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर व त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दहावी बारावी विद्यार्थ्यांनी भरपूर मेहनत करावी आणि प्रचंड यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या. तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी संस्थेने जागेची पाहणी करून वृत्तपत्र विक्रेता भवन बांधावे याकरिता आपण आमदारनिधीमधून निधी उपलब्ध करून देऊ असे सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शहर काँग्रेस पक्ष अध्यक्ष प्रा. बबलू देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक शिंदे, उपाध्यक्ष राजू हनवते, म.रा. उपाध्यक्ष संतोष शिरभाते मंचावर उपस्थित होते. यावेळी १० वीचे ११ विद्यार्थी तर १२ वीचे १५ विद्यार्थ्यांना समाजसेवक अमन भाई यांच्याकडून प्रत्येक विद्यार्थ्यांना ६ नग रजिस्टर देण्यात आले. तर शार्दुल ठाकूरकडून पेन पेन्सिल देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत स्कूल बॅग देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी किरण कोरडे, श्रीराम खत्री, राजु भलावी, मदन केळापुरे, सचिन कदम, प्रवीण आगलावे, किशोर भेदरकर, सुनील बोरकर, तुषार गुजलवार, परीश्रम घेतले. आभार किशोर भेदरकर यांनी मानले. यावेळी कमलनयन कोठारी, श्रीपाद तोटे.राजु काळे, संजय गुजलवार मोठ्या प्रमाणात सदस्यांची उपस्थिती होती.

# मिट्टी मे हात दिल वतन के साथ

## चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनचा एक लाख वृक्षरोपणाचे लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या कवितेच्या ओळीप्रमाणे चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन,तथा जमाते इस्लामे हिंद तर्फे ही संपूर्ण देशभर एक पर्यावरण पूरक वृक्षरोपण अभियान सुरू केले आहे त्याच अभियानाच्या धरतीवर दिनांक ६ जुलै रोजी पुसद येथे अक्सा मजीद वसंत नगर येथे लहान मुलींनी आगळीवेगळी पत्रकार परिषद घेऊन या अभियानाचे महत्त्व व माहिती सांगितली या अभियानाची सुरुवात मिट्टी मे हात दिल वतन के साथ या नावाने देशभर एक लाख झाडे लावण्याचा मानस केला आहे आणि पुसद तालुक्यात ५०० (पाचशे) झाडे लावण्याचा पक्का निर्धार या चिमुकल्या मुलींनी केला आहे आणि त्या झाडाचे संगोपन करणार असून त्या झाडांना सुद्धा स्वतःचे आपले नाव देऊन त्यावर जीवापाड प्रेम करून त्यांना मोठे करतील आणि त्यांच्यावर कविता आणि चित्रे सुद्धा रेखाटनार आहेत हे अभियान २५ जून ते २६ जुलै दरम्यान चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन राबवणार आहे या अभियानातून लहान मुलानमध्ये निसर्ग प्रेम व निसर्गाप्रती जबाबदारी सेवाभाव निर्माण करणे हा उद्देश आहे वृक्षारोपण हे एक देश सेवेचा भाग म्हणेल व देशाची सृष्टी हिरवं स्वप्न पूर्ण करेल ही झाडे शाळा, मंदिर, मस्जित, सोसायटी तसेच घरासमोर लावून सर्वत्र हिरवे वातावरण निर्माण होईल या पत्रकार परिषदेत माहिती देतांना लहानश्या सय्यद फातिमा सय्यद वाजिद हुसेन या लहान मुलींनी या अभियानाचे महत्त्व सांगताना स्पष्ट केले. झाडे लावणे ही काळाची गरज आहे आणि झाडे का लावणे गरजेचे आहे व ही मोहीम राबविणे यासाठी महत्त्वाचे आहे की पृथ्वी, जमीन तापत आहे यामुळे गर्मी वाढत चालली आहे आणि झाडाची संख्या कमी होत आहे आणि हवेची गुणवत्ता खालावत आहे त्यामुळे झाडे लावणे महत्त्वाचे आहे या परिस्थितीत लहान मुलं महत्त्वाची भूमिका बजावू शकतात जेव्हा एखादे मूले झाड लावतील आणि त्यांची काळजी घेतील तेव्हा ते केवळ पृथ्वीचे नाही तर स्वतःच्या भविष्यासाठी देखील एक सकारात्मक पाऊल उचलत असल्याचे यावेळी सांगितले या पत्रकार परिषदेला चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनच्या सदस्या शेख हमजा शेख मन्सूर, मुस्तफा अहमद मोहसीन अहमद, रूणशा साहीर जहरोद्दीन खतिम, मुंन्झा फातिमा रफत, फातिमा प्रवेज खान, आतीया परवीन आयुब अफसर,जिक्रा खान फिरोज खान, आयेशा हातिम रियाज हाईक सोरेन अब्दुल ख़ालिक खान,यावेळी उपस्थित होते.

# आजपासून शेतक-यांच्या हक्कासाठी '७/१२ कोरा यात्रा' : बच्चु कडू

## शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा लढा, जनआंदोलनाला सुरुवात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी बच्चु कडू यांच्या नेतृत्वाखाली '७/१२ कोरा कोरा यात्रा' उद्या ७ जुलैपासून पापळ (जि. अमरावती) येथून सुरू होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी आणि संपूर्ण कर्जमुक्तीसाठी जात, धर्म, पक्षीय भेद विसरून या लढ्याला पाठिंबा देण्याचे आवाहन बच्चु कडू यांनी केले आहे.

मागील तीन महिन्यांत महाराष्ट्रात तब्बल ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून यामध्ये सर्वाधिक प्रमाण यवतमाळ जिल्ह्यात आहे. शेतकऱ्यांची ही दैना थांबवण्यासाठी आम्ही केवळ शेतकरी म्हणून एकत्र येणार आहोत, पक्षाचा झेंडा न वापरता भूमिपुत्र म्हणून संघर्ष करणार असल्याचे बच्चु कडू यांनी स्पष्ट केले. या यात्रेला देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगाव पापळ येथून सुरुवात होईल. पापळ, उंबरडा बाजार, दारव्हा, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे पार करत १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे या यात्रेची सांगता होणार आहे. चिलगव्हाण हे दिवंगत नेते स्व. साहेबराव करपे यांच्या रणभूमीचे ठिकाण आहे. इथूनच कोणत्याही शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ येऊ नये यासाठी लढण्याचा निर्धार स्व. साहेबराव करपे यांना नमन करून करणार आहोत. 'भाजी तुमची, भाकर आमची' या घोषवाक्याखाली शेतकरी संघटनांनी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. गावागावात शेतकरी ७/१२ उतारे बच्चु भाऊंकडे सुपूर्त करणार असून पाठिंब्याचे प्रतिज्ञापत्र देण्यात येणार आहे. यात्रा ८ दिवसांची असून एकूण १३८ किलोमीटरचा प्रवास यात केला जाणार आहे. दरम्यान गावागावात शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेण्यात येतील आणि एकात्मतेचा निर्धार करण्यात येणार आहे. बच्चु कडू म्हणाले, "शेतकऱ्याला कोणतीही भीक नको, फक्त त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा. मातीत पैसा ओतून जो शेतमाल शेतकरी पिकवतो त्याला जर किमान बाजार भाव भेटला नाही.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमालाचे नुकसान झाले तर मात्र त्याने कुणाकडे मदतीची रचना करावी. त्यामुळे शेतकरी कुणाकडे मदतीची हाक मारणार. राज्याचे मुख्यमंत्री यांना विठुरायाकडून कल द्यावा. विठ्ठलाच्या दारात भक्ताला जात पात धर्म रंग नसतो तसा शेतकऱ्यांच्या कपाळावरही फक्त शेतकरीच लिहिलेले असतं तेव्हा सरकारने राजकारण बाजूला ठेऊन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ठोस निर्णय घ्यावा." शेतकरी शेतकरीच असतो, त्याला धर्म, जात, पक्ष नसतो, हे या यात्रेतून दाखवून द्यायची वेळ आली आहे.

# वाढत्या शहरीकरणामुळे वृक्ष लागवड चळवळ बनावी, पोलीस अधिक्षक कुमार चिंता

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : शहरीकरण झपाट्याने वाढत आहे, विविध कारणांमुळे वृक्षतोड देखील वाढली आहे मात्र त्यातुलनेत वृक्ष लागवड मात्र कमी असल्याने प्रत्येकाने एक नव्हे तर अनेक वृक्ष लावावी, किंबहुना वृक्ष लागवड ही एक चळवळ व्हावी असे मत जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी व्यक्त केले.

श्रमिक पत्रकार संघाकडून आषाढी एकादशी चे औचित्य साधून निळोणा येथील वाघाई देवस्थान परिसरात वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला सामाजिक वनीकरण चे वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर मडावी, वाघाई देवस्थानचे अध्यक्ष श्यामसुंदर मिश्रा, सचिव राजू डंभारे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, सचिव अमोल ढोणे यांची उपस्थिती होती. श्रमिक पत्रकार संघाच्या वृक्ष लागवड उपक्रमाचे कौतुक करताना कुमार चिंता म्हणाले की विविध संस्था संघटनांनी देखील वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेतला पाहिजे, पावसाळ्याच्या या दिवसात केलेली वृक्ष लागवड उपयोगी ठरेल, येणाऱ्या पिढीसाठी वृक्ष लागवड ही गरज आहे. त्यामुळे लावलेली वृक्ष ही जगवली देखील पाहिजे अशी सूचना त्यांनी केली. यावेळी पत्रकारांनी मोठ्या संख्येने वृक्षारोपण केले. याप्रसंगी वाघाई देवस्थानच्या विश्वस्तांनी पत्रकारांना सन्मानित केले. कार्यक्रमाचे संचलन रुपेश उत्तरवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रकल्प प्रमुख रवी राऊत यांनी केले. श्रमिक पत्रकार संघटनेचे सर्व पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रमिक पत्रकार संघाकडून वाघाई मंदिर परिसरात वृक्ष लागवड



## पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये
# आषाढी एकादशी निमित्त हरिनामाचा गजर...

**अमरावती/का.प्र.** पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावती येथे आषाढी एकादशी निमित्ताने केजी वन, केजी टूच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांकरिता हुबेहूब वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले. दिंडीची सुरवात विठ्ठल रुक्मिणी व संत गजानन महाराज यांचे पूजन करुन करण्यात आले. शाळेच्या केजी वन, केजी टूच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकऱ्यांची वेशभूषा धारण करत टाळ, मृदुंग, विना वाजवत हरिनामाचा गजर करत दिंडीमध्ये आनंदाने सहभाग घेतला.

या दिंडीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीचे वेशभूषा धारण करून शालेय परिसरात पंढरपूर दर्शन घडविले हे मुख्य आकर्षण होते. आषाढी एकादशी निमित्त संत, परंपरा व भारतीय संस्कृतीची जोपासना व्हावी विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाचे महत्व जाणवे या करिता या दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या वारकरी दिंडी सोहळ्याकरिता प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्य सोनल निस्ताने, प्री प्रायमरी इन्चार्ज निलिमा केने उपस्थित होते.

## चिमुकल्यांनी घडविले पंढरपूरचे दर्शन

# आठवडी बाजार भरत आहे चिखलात
## भाजीपाला विकायचा कसा; विक्रेत्यांचा नगर परिषद प्रशासनाला सवाल

**अचलपूर/वार्ताहर** शहरातील चौधरी मैदान येथे अनेक भाजीपाला विक्रेत्यांचे दुकान लागतात .रविवारी आठवडी बाजार म्हणून चौधरी मैदान येथे लागणाऱ्या विविध दुकानात ग्राहकांची खरेदी साठी मोठी गर्दी असते.
पण अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे चौधरी मैदान परिसरात जागोजागी चिखल , पाण्याचे डबके असल्याने येणाऱ्या ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुख्य रस्त्यावरच पाण्याचे डबके,चिखल असल्याने दुचाकी वाहन घेऊन येणाऱ्या नागरिकांना वाहन सुद्धा येथून चालविता येत नाही .यामुळे भाजीपाला दुकानदाराकडे खरेदी साठी आलेल्या नागरिकांनी वाहने उभी करायची कुठे? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

आज आमच्या प्रतिनिधीने या भागाची पाहणी केली असता,अनेक दुकानदार चक्क चिखलातच आपली भाजीपाला दुकाने लावलेले दिसल.

यामुळे अचलपूर नगर परिषद प्रशासनाने तत्काळ या मुख्य रस्त्यावर मुरूम टाकून देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.





## संक्षिप्त

### सनातन संस्थेच्यावतीने गुरुपौर्णिमा महोत्सव

**अमरावती-** दरवर्षीप्रमाणे यंदाही सनातन संस्थेच्यावतीने अमरावतीमध्ये गुरुपौर्णिमा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव यंदा १० जुलै २०२५ रोजी अंबा मंगलम कार्यालय, सातुर्णा बसस्टॉपच्या पूर्वेला, बडनेरा रोड, अमरावती येथे संपन्न होणार आहे.या निमित्ताने शहरातील चौका-चौकांत फ्लेक्स आणि भित्तीपत्रके, तसेच घरोघरी हस्तपत्रके वितरित करून समाजामध्ये व्यापक प्रसार करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये गुरुपौर्णिमेबाबत उत्सुकता वाढवण्यासाठी आणि त्यांना गुरुतत्त्वाशी जोडण्यासाठी हे प्रयत्न करण्यात येत आहेत.सध्याच्या काळात देश आतंकवाद, नक्षलवाद, 'लव्ह जिहाद','लँड जिहाद', धर्मांतर, गोहत्या अशा अनेक समस्या भोगत आहे. ही परिस्थिती पालटण्यासाठी प्रत्येक नागरिकाने राष्ट्र व धर्म यांच्याप्रती आपले कर्तव्य ओळखून कृतीशील होणे आवश्यक आहे.याच हेतूने सनातन संस्था हा महोत्सव 'हिंदु राष्ट्र स्थापनेसाठी संकल्पदिन' म्हणून साजरा करत असून, गुरूंना साक्षी ठेवून सामाजिक, धार्मिक व राष्ट्रहितासाठी प्रेरणा मिळावी, असा उद्देश यामागे आहे.गुरुतत्त्वाचा आशीर्वाद, तसेच राष्ट्र व धर्मासाठी कार्य करण्याचे पुण्य यामुळे लाभेल, असा दृढ विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### बुधवारी कर्मचारी यांचे हल्लाबोल आंदोलन

**अमरावती-** समन्वय समितीच्या सर्व घटक संघटनांची तातडीची आभासी सभा संपन्न झाली. प्रलंबित मागण्यांबाबत कर्मचारी-शिक्षकांमध्ये कमालीचा असंतोष धुमसत आहे. शासनाचे मात्र त्या संदर्भात उदासीन धोरण दिसून येत आहे. अशा परिस्थितीत या संदर्भातील संतप्त भावना व्यक्त करण्यासाठी, तीव्र संघटनात्मक कृती करण्याची आवश्यकता उपरोक्त आभासी सभेत व्यक्त करण्यात आली.बुधवार ९ जुलै रोजी देशातील प्रधान ११ कामगार संघटनांच्या वतीने देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. या आंदोलनाची घोषणा सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर, नगर परिषद-नगर पंचायत कर्मचारी समन्वय समिती, महाराष्ट्र यांनी दिली आहे.या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा पाठींबा असुन या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होणार आहे.अशी माहीती शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,शिक्षक नेते उदय शिंदे यांनी दिली आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

### कृषी दिनानिमित वृक्षारोपण

**तिवसा-** स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा येथील सातव्या सत्राच्या कृषी दुतानी ग्रामपंचायत कार्यालय मोझरी येथे महाराष्ट्र कृषा दिवस उत्साहात साजरा केला .या कार्यक्रमाला गावातील सरपंच सुरेंद्र भिवागडे तसेच उपसरपंच प्रशांत प्रधान ,ग्रामसेवक सुरेंद्र झोलेकर तसेच इतर शेतकरी बांधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून लाभलेले महाविद्यालयातील प्राचार्य अरुण डहाके, तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. सावंत राठी,विषय तज्ञ मनोज लुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे कृषीदूत समीर जिभकाटे, तुषार रेवतकर या विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्यास उजाळा दिला व झिरो बजेट फॉर्मिंग बद्दल माहिती तसेच सेंद्रिय शेतीविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली.पूर्वा ठवकर हिने कृषिगितामधुन शेतकऱ्यांचे महत्व सांगितले. संचालन वैष्णवी बेहरे तर प्राची नांदेकर हिने आभार मानले.



### नलिनी माहुलकर यांचे निधन

**अमरावती-** साईनगर परिसरातील पीकेव्ही कॉलनी येथील रहिवासी शरद माहुलकर यांच्या पत्नी नलिनी शरद माहुलकर यांचे अल्पशा आजाराने आज (६ जुलै) रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, स्नुषा, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर येथील हिंदू स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.



### कैलास नवखरे

**अंजनगाव बारी-** येथील कैलास एकनाथराव नवखरे (४२) वर्षे यांचे (ह.मु.पुण) येथे अल्प आजाराने. ६ जुलै सकाळी १० वाजता येथे निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी,एक मुलगा असा बराचसा आप्त परिवार आहे.

# जिवीतहानी झाल्यास जबाबदारी कोण घेणार?

**चांदूर रेल्वे/वार्ताहर** शहरातील मेहेरबाबा नगर, को-ऑपरेटीव्ह बँक कॉलनी, नेहा कॉलनी येथे गेल्या तीन वर्षांपासून रस्ते अतिशय खराब असून उघड्या नालीपासून सुद्धा नागरिक त्रस्त झाले आहे. याबाबत प्रशासन, लोकप्रतिनिधी, नेतेमंडळी यांना वारंवार विनंती, तक्रार करूनही कोणीही दखल घेत नसल्यामुळे अखेर या परिसरातील महिला नगर परिषद कार्यालयावर धडकल्या. लहान मुलांची जिवीतहानी झाल्यास तुम्ही जबाबदारी घेणार का ? असा प्रश्न संतप्त महिलांनी न.प. अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केला.



## सरपंचांसह महिलांनी दिले निवेदन

यावेळी न.प. मुख्याधिकारी कार्यालयात हजर नव्हते. मेहेरबाबा नगर, को-ऑपरेटीव्ह बँक कॉलनी, नेहा कॉलनी या परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असुन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. पावसाळ्याच्या दिवसात तर काही रस्त्यांवरून चालणेही कठीन झाले आहे. तसेच या परिसरातील उघड्या नालीमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. नालीत विषारी सापांचे प्रमाण वाढले असून यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. याशिवाय या परिसरातील विद्युत खांबावरील लाईट सुद्धा बंद आहे. भविष्यात या समस्यांमुळे जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तक्रारीची त्वरीत दखल घेऊन या परिसरातील नाली अंडरग्राउंड करण्यात यावी, पक्के रस्ते बांधण्यात यावे व खांबावरील लाईट चालू करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील महिलांनी केली आहे. अन्यथा लहान मुलांना काही जीवितहानी झाल्यास याची जबाबदारी प्रशासनाची राहील असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी जयश्री जाधव, अश्विनी गाठे, अनिता राठोड, वंदना राऊत, अलका पूंड, अर्चना वाढोणकर, ललिता मंडलिक, विजया देऊळकर, तृप्ती ठाकरे, आरती टेकाडे, अर्चना टेकाडे, शिल्पा इंगोले, सोनाली गजभिये, स्मिता रंगारी, अनुराधा येंडे, सौ. घड्डीनकर, भावना चौधरी, कुसुम भरडे, प्रिति काकडे, काजल देशमुख, दिव्या देऊळकर, मंजुषा तांडेकर, अरुणा तांडेकर, वैशाली तांडेकर, शेख नाजेमा, कहेकशाँ शेख, प्रीती गोरडे, ललिता नानवटकर, जया फसाटे, प्रिया अलोणे, शीला घोडेस्वार, सुलभा अरमळ, शालिनी, शुभांगी वानखडे यांसह अनेक महिलांची उपस्थिती होती.

# कामगारांचा राष्ट्रीय संप व भारत बंद ९ रोजी
## संयुक्त कामगार कृती संघटना काढणार विशाल जनमोर्चा पत्रकार परिषद मध्ये माहिती

**अमरावती/का.प्र.** सेंट्रल ट्रेड युनियन, संयुक्त किसान मोर्चा यांच्या संयुक्त पुढाकारात किसान कामगार मधु संघटना सरकारचे जनविरोधी धोरणाविरोधात देश पातळीवर एकवटल्या आहे. कामगार संघटनेच्या नेतृत्वात संघटित व असंघटित कामगार यांचा समावेश आहे. कामगारांच्या मागण्यांसाठी ९ जुलै रोजी राष्ट्रीय संप आणि ग्रामीण बंद पुकारण्यात आलेला आहे. या अंतर्गत कामगार कृती संघटना व संयुक्त किसान मोर्चा द्वारा ९ जुलै रोजी दुपारी १ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा



काढण्यात येणार असल्याची माहिती आज शनिवार ५ जुलै रोजी झालेल्या एका पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली.

संयुक्त किसान मोर्चातील किसान मधु संघटनाचे पुढाकारात शेतकरी कर्जमुक्ती व एम एस पी कायद्यासाठी ग्रामीण भारत बंद करण्यात येणार आहे.त्या व्यतिरिक्त चार श्रमिक संहिता रद्द करा, महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक मागे घ्या, सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, मनपा, नगरपालिका व खाजगी उद्योग समूहातील खाजगीकरण बंद करून समान कामाला समान वेतन प्रदान करा. सर्व कामगारांना २६००० किमान वेतन व दहा हजार रुपये पेन्शन लागू करा. हमी योजना सुरू करा. स्मार्ट मीटर योजना रद्द करा. शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा. नवीन शिक्षण धोरण मागे घ्या. शिक्षणाचे बाजारीकरण केंद्रीकरण बंद करा. शिक्षण आरोग्य यावर बजेटमध्ये पुरेसा निधी खर्च करा. मागासवर्गीयांचा बॅकलॉग ताबडतोब भरा. महागाईवर रोख लावा इतर मागण्यांसाठी हा संप पुकारलेला आहे. या आंदोलनात प्रामुख्याने आयटक, सिटू, असंघटित कामगार संघटना, राज्य किसान सभा, शेत मजदूर युनियन, लाल बावटा युनियन, मराठा सेवा संघ, आप किसान आघाडी, नवजागरण मनिशी व क्रांतिकारी स्मरण समिती इत्यादी कर्मचारी सहभागी होणार आहे. पत्रकार परिषद मध्ये राज्य सरकारी संघटनेचे सरचिटणीस डी एस पवार, आयटीआय अध्यक्ष जे.एम कोठारी, सिटूचे सुभाष पांडे, अशोक सोनारकर, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, नीलकंठ ढोके आदी उपस्थित होते.



आषाढी एकादशीनिमित्त शहरातील विलायतपुरा येथील प्राचीन विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी होती.मंदिराच्या परिसरात रितेश राखोंडे व दुर्गेश बर्वे यांनी आषाढी एकादशी निमित्त विठुरायाची काढलेली रांगोळी भक्तांसाठी आकर्षानाचे केंद्र ठरली.
**(छाया- हरिष पुरोहित,अचलपूर)**

### अक्षर मानवचे आगळेवेगळे 'माणूस संमेलन'

**अमरावती-** मानवी समाजाची सर्व व्यवस्था बदलली पाहिजे.जात, धर्म, पंथ, या पलीकडे जाऊन केवळ 'माणूस' म्हणून सजगपणे प्रामाणिकपणे जगणे हीच अक्षर मानवची भुमिका आहे. या साठी अक्षर मानव राज्य भरात वेगवेगळे उपक्रम घेत राहते असेच वर्षातुन फक्त एकदा होणारे अक्षर मानवचे सम्मेलन म्हणजे माणूस 'संमेलन' होय. हे संमेलन २५, २६, २७ जुलै २०२५ रोजी हडशी, मावळ, जिल्हा पुणे येथे होईल. संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या चाळीसगाव येथे झालेल्या मुख्य बैठकीत हे संमेलन ठरलं अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे अक्षर मानवचे राज्य कार्यवाह आझाद खान यांनी अमरावती मध्ये ही माहिती दिली.अमरावती वासियांनी या संमेलनात सहभागी होण्यासाठी आपले नाव लवकरात लवकर नोंदवावे नावनोंदणीची मुदत १५ जुलै २०२५. आहे. नावनोदणी साठी संपर्क ९७६६०९६९०६ या मोबाईल क्रमांकावर आपले नाव नोंदवावे मुदती नंतर आपले नावं स्वीकारली जाणार नाहीत.

# भातकुली तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतींसाठी सरपंच आरक्षण सोडत आज

**टाकरखेडा संभू/वार्ताहर** भातकुली तालुक्यातील एकूण ४८ ग्रामपंचायतींसाठी मार्च २०२५ ते मार्च २०३० या कालावधीतील सार्वत्रिक निवडणुकांकरिता सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आरक्षण सोडत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, भातकुली (भातकुली जैन) येथे हा कार्यक्रम होणार



असून, यावेळी मा. उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढण्यात येणार आहे.

सदर आरक्षण प्रक्रिया अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग (ना.मा.प्र.व.), तसेच सर्वसाधारण प्रवर्गासाठी निर्धारित असलेल्या आरक्षण नियमानुसार पार पडणार आहे. यापूर्वी संदर्भ क्र. २ अन्वये ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या जागांचे आरक्षण घोषित करण्यात आले होते. मात्र, सुधारित निर्देश प्राप्त झाल्यानंतर त्या जागांमध्ये बदल करून नव्याने आरक्षण निश्चित करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर सोमवारी सात जुलै रोजी आरक्षण सोडत नव्याने काढली जाणार आहे त्यामुळे गाव पुढाऱ्यांचे या आरक्षणाकडे आता लक्ष लागले आहे या आरक्षण सोडतील गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य संबंधित नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार अजितकुमार येळे यांनी केले.

# जिल्ह्यात मंगळवारी महावितरणचा पहिला 'ऊर्जामित्र दिन'
## वीज ग्राहकांच्या तक्रारीचे होणार निराकरण

**अमरावती/का.प्र.** वीज सेवेशी संबंधित ग्राहकांच्या विविध तक्रारी ऐकून घेत त्या तक्रारी सोडविण्यासोबत वीज सेवा अधिक पारदर्शक, उत्तरदायी व लोकाभिमुख करण्यासाठी महावितरणचा पहिला 'ऊर्जामित्र दिन' मंगळवार ८ जुलै २०२५ ला पार पडणार आहे. त्यामुळे वीज ग्राहकांच्या सोयीच्या दृष्टिने उपविभाग निहाय आयोजित या 'ऊर्जामित्र दिनात' जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी सहभागी होण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक




साळुंके यांनी केले आहे.

लोकशाही दिनाच्या धर्तीवर आयोजित महावितरणचे 'ऊर्जामित्र दिन' प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी महावितरणच्या सर्व उपविभागांमध्ये उपकार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला जाणार आहे. या दिवशी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा थेट ग्राहकांशी संवाद होईल, वीज पुरवठ्याशी संबंधित ग्राहकांच्या तक्रारी, सूचना, अपेक्षा आणि अभिप्राय स्विकारल्या जाईल आणि ते निवारण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. ऊर्जामित्र दिनामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद अधिक खुला व विश्वासार्ह होईल, तसेच सेवा सुधारण्यास हातभार लागेल.

# वृक्षारोपण व वृक्ष वाटप कार्यक्रम

**चांदूररेल्वे/वार्ताहर** जिल्हा परिषद (मा. शा.) शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ७ जुलै रोजी भव्य वृक्षारोपण व वृक्ष वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. शासकीय सेवेतील अधिकारी तसेच देवराई फाउंडेशन अमरावती जिल्हा प्रभारी डॉ राजेश शेरेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार असल्याची माहिती पत्रकार संघ अध्यक्ष प्रवीण शर्मा व मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी दिली आहे.देवराई फाउंडेशन पुणे द्वारा संचालित अमरावती जिल्हा शाखेतर्फे संपूर्ण जिल्ह्यात १२ हजार वृक्ष वाटप करण्यात आले असून चांदूररेल्वे मराठी पत्रकार संघ व जिल्हा परिषद (मा. शा.) शाळा व कनिष्ठ महाविद्यालय च्या वतीने जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात आमंत्रित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून शाळेतील विद्यार्थ्यांना वृक्ष वाटपा करण्यात येईल. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे,तहसीलदार पुजा माटोडे, देवराई फाउंडेशन जिल्हा प्रभारी डॉ राजेश शेरेकर,गटविकास अधिकारी तेजश्री आवळे, मुख्याधिकारी डॉ विकास खंडारे, ठाणेदार अजय आकरे उपस्थित राहणार आहे.

# म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावत आहे...



राज्यात मनसे, उबाठा द्वारा हिंदी विरोधी आंदोलनाने आता हिंसाचाराची जागा घेतली असून मुंबई येथील मीरा भाईंदर उपनगरात एका अमराठी व्यावसायिकाला मराठी भाषा येत नसल्या कारणांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी थेट मारपीट केली आहे. असल्या चुटपुट घटना मुंबईत सातत्याने मनसे द्वारा घडवत चालल्या आहेत. एकमेकांचे विचार किंवा भावना व्यक्त करायला काहीतरी माध्यम लागते ते माध्यम म्हणजे भाषा आहे. ती संस्कृतीचा आणि समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहे. भाषेमुळे लोक एकमेकांशी जोडले जातात आणि त्यांच्या भावना, कल्पना आणि अनुभव व्यक्त करू शकतात.

एकेकाळी मुंबईत शिवसेना उबाठा मराठी माणसाच्या विचारांनी स्थापन झाली होती. नंतर हिंदुत्ववादी झाली. आता शिवसेनेची तिसरी पिढी सर्वधर्म समभाव विचाराकडे झुकलेली आहे. त्यामुळे भाषा वादावरून हिंदूंना आज लक्ष्य करीत आपले प्रादेशिक राजकारण खेळत आहेत.सत्तारूढ महायुती सरकारने ही मनसे आणि उबाठाची भाषेवरून होणारी गुंडागर्दी मोडून काढली नाही तर उद्या आपली मराठी मुले, मुली जे परप्रांतात विविध कारणासाठी जातात त्यांच्या बाबत हिच समस्या भविष्यात त्या त्या राज्यात तेथे उद्भवू शकते. काही दिवसांपूर्वी कर्नाटकात भाषा विवादाने पाहता पाहता असेच उग्र रुप धारण केल्यानंतर तेथील उद्योग इतर राज्यात स्थलांतरित होत आहे कारण तेथील कर्मचारी जर आज सुरक्षित नसतील तर उद्योगपती कसे कामकाज करतील.

राज्याच्या एका माजी स्वर्गीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या सरकारच्या कार्यकाळात पक्षांतर्गत राजकारणासाठी मुंबईत शिवसेना वाढण्यास पाठबळ दिले होते. तिच चूक आज मनसे सारख्या भाषिक प्रांतवादी विरोधी पक्षाला पाठबळ देण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकीय कारणासाठी बजावू नये. अन्यथा त्याची सर्वात मोठी राजकीय घोड चूक ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे अजुन वय असून त्यांना देशातील राजकारणातला मोठा टप्पा गाठायचा आहे.

मराठीत एक म्हण आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावत आहे. याचा अर्थ एखादी घटना अनपेक्षितपणे घडली इथपर्यंत ठीक आहे, पण ती घटना वारंवार घडत असेल तर वेळीच त्या विरुद्ध पाऊल उचलणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची भरपाई करणे खूपच कठिण असते. आज मनसे, उबाठा हे दोन्हीं पक्ष ज्या पद्धतीचे राजकारण आपल्या अस्तित्वासाठी राज्यात करीत आहे. त्यांना राज्यातील तथाकथित डाव्या विचारसरणीचे कलावंत, साहित्यिक, मराठी वृत्त वाहिन्यां भाषिक वादाला खत पाणी घालत त्यांच्या अस्तित्वासाठी साथ देत आहे. याद्वारा राज्यात अनागोंदी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. ती बाब राज्याच्या दृष्टीनी अत्यंत चिंताजनक आहे. मागील दहा वर्षात देशाने आर्थिक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे, ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने प्रगतीच्या ह्या प्रवासात संपूर्ण देशाची नजर महाराष्ट्रावर आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्याला धाडसी आणि निर्णायक कृतींची आवश्यकता आहे. ह्यासाठी आपल्याला केवळ छोट्या-छोट्या सुधारणा करण्यापलीकडे जायला लागेल व एकसंध प्रयत्न करावे लागतील या सोबत राज्यात पोषक वातावरण लागेल. महाराष्ट्र सारख्या देशातील प्रगत राज्याला अस्थिर स्थिती प्रांत आणि भाषावादामुळे होणारी परवडणारी नाही. या आंदोलनांना भीक न घालता सरकारने वेळीच आवर घातला पाहिजे. अन्यथा देशाला खूप मोठी किंमत यासाठी मोजावी लागेल.

**अविनाश देशपांडे**

# मराठी मुद्द्यावर उद्धव आणि राज यांची हातमिळवणी

महाराष्ट्राच्या राजकारणात एकेकाळी कट्टर प्रतिस्पर्धी असलेले राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे पुन्हा एकदा एकाच मंचावर एकत्र आले आहेत आणि हे कोणत्याही राजकीय युतीसाठी नाही...हे कोणत्याही राजकीय आघाडीसाठी नाही.. तर मराठी भाषा आणि संस्कृतीवर हिंदी लादण्याच्या विरोधात मराठीच्या ऐक्यासाठी..५ जुलै रोजी मुंबईतील वरळी येथील एनएससीआय डोम येथे 'मराठी विजय दिवस' रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये ठाकरे बंधू दोन दशकांनंतर एकत्र आले या ऐक्यानंतर २० वर्षांचे राजकीय अंतर आता संपेल का? हा प्रश्न आता सर्वांना पडला आहे.

फडणवीस सरकारने तीन भाषा धोरणाचा निर्णय उलटवल्याचा विजय म्हणून ही रॅली आयोजित करण्यात आली.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्याकडून पहिल्यांदाच रॅलीचे आयोजन करण्यात आले.या विजय रॅलीची **विशेष:ता** म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षांचे चिन्ह,झेंडा या रॅलीत नव्हता. फक्त महाराष्ट्र राज्याचे चित्र होते.'मराठीचा आवाज' (मराठीचा आवाज) या थीमवर आधारित ही रॅली जवळजवळ दोन दशकांच्या प्रतिस्पर्धेनंतर एक दुर्मिळ सार्वजनिक पुनर्मिलन दर्शवते.या खास प्रसंगी, दोघेही मुंबईतील एका कार्यक्रमात एकत्र दिसले.

या कार्यक्रमादरम्यान, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या चाहत्यांना संबोधित केले.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, बाळासाहेब म्हणाले होते की सत्ता येते आणि जाते. मला वाटते की काही लोकांनी आमचा वापर केला आणि आम्हाला हाकलून लावले. ज्यांनी हे केले त्यांनी मराठी लोकांना एकमेकांशी भांडायला लावले. आमची ताकद आमची एकता आहे. मराठींना दिल्लीचे गुलाम बनवण्याचा प्रयत्न झाला आहे. हिंदी-हिंदुस्तान हा मार्ग नाही.मराठी भाषेवर एकता दाखवल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे आभार मानतो.

उद्धव ठाकरे यांच्या आधी राज ठाकरे यांनीही कार्यक्रमाला संबोधित केले.त्यांनी प्रश्न केला की त्रिभाषा सूत्र कुठून आले? ते फक्त केंद्र सरकारकडूनच आले आहे. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात सर्व काही इंग्रजीत आहे, इतर कोणत्याही राज्यात असे नाही. ते फक्त महाराष्ट्रातच का आहे? जेव्हा महाराष्ट्र जागा होतो तेव्हा जग पाहते. मराठा राजवट हिंदी भाषेपेक्षा जुनी आहे. माझे वडील आणि बाळासाहेबही इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकले. तुम्ही कधी त्यांच्या मराठी किंवा महाराष्ट्रावरील प्रेमावर प्रश्न विचारला आहे का?

राज ठाकरे म्हणाले की, जेव्हा आमची मुले इंग्रजी माध्यमात जातात तेव्हा आमच्या मराठीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. जर लालकृष्ण अडवाणी यांनी मिशनरी शाळेत शिक्षण घेतले असेल तर त्यांच्या हिंदुत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले पाहिजे का? आम्ही हिंदी लादणे सहन करणार नाही. त्यांना फक्त मुंबई महाराष्ट्रापासून वेगळे करायची आहे, हा त्यांचा अजेंडा आहे. ते मुद्दा दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत.



या घडामोडीमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकांपूर्वी, विशेषतः प्रतिष्ठित बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीपूर्वी शिवसेना (यूबीटी) आणि मनसे यांच्यात संभाव्य युती होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.कुटुंब पुनर्मिलनाचा मराठी मतांवर परिणाम होऊ शकतो.ठाकरे कुटुंबाने एकत्र प्रचार केल्याचा दृश्य आणि भावनिक परिणाम मराठी मतांवर परिणाम करू शकतो, ज्यामुळे मुंबईची राजकीय घडामोडी बदलण्याची शक्यता आहे.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल,**
**वर्धा**
**मो.९५६१५९४३०६**

# मराठी भाषेच्या मुद्यांचे महत्त्व

राज्यातील मनसे आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांनी मुंबईत मराठीच्या मुद्द्यावरून विजयी मेळावा आयोजित केला. या विजयी मेळाव्यानंतर दोनही पक्षांची जबाबदारी वाढली आहे ती एकत्रितपणे लढून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आणि त्यामागोमाग येणाऱ्या निवडणुकांना सामोरे जाण्याची. मेळावा मुंबईत आयोजित केला असल्याने मुंबईबाहेरील लोक मराठीच्या मुद्द्यावरून किती एकत्र येऊ शकतात याची चाचपणी करण्याची गरज आहे असे वाटते.

मुंबई, ठाणे, पुणे यापलीकडे या दोनही पक्षांना प्रत्येक जिल्ह्या जिल्ह्यांतून आपापल्या पक्षांच्या वाढीसाठी अधिक मेहनत, जनसंपर्क साधण्याची गरज आहे.

आज मराठी मुद्द्यावरून खेडी, ग्रामीण भागातील शेतकरी बांधव आणि शेतकी उत्पादने घेणाऱ्या इतर मराठी भाषिकांना मराठी भाषेवरून लोकांना प्रत्यक्ष स्थानिक व्यवहारांत विशेष अडचणी येत असाव्यात असे वाटत नाही.

अन्य राजकीय पक्षांनी राज्यात बहुतेक जिल्ह्यांतून आपापली मते जोखली आहेत. त्या मतांना आपल्या पक्षांकडे वळविण्याची महत्त्वाची कामगिरी पार पडताना जनसंपर्क हे प्रभावी माध्यम ठरणार आहे त्यासाठी जिल्ह्यांची, मतदारांची माहिती असणे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच परिचित नेते व मराठीचा मुद्दा प्रभावी मांडण्यासाठी आवश्यक ते वक्तृत्व असणारे वक्ते, नेते यांची नेमणूक केली जाण्याची गरज आहे. ठराविक काळानंतर या दोन्ही पक्षांच्या प्रभावाचा अभ्यास राज्यपातळीवरील ज्येष्ठ पक्षनेत्यांनी करून त्यात भर घालण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

अन्यथा मेळाव्याचे जे काही उद्देश होते ते मुंबईपुरते मर्यादित राहतील. म्हणूनच मुंबईसारख्या शहरात होऊ शकणाऱ्या भाषावादाचे अनुभव आणि अडचणी ग्रामीण भागातील लोकांना अनुभवावे लागत नसल्यास पक्षवाढ आणि मराठी भाषेचे गांभीर्य तेथपर्यंत पोहोचविण्याचे परिश्रम घेण्याची जबाबदारी, गरज पक्षांनी ओळखलेली बरी.

**स्नेहा राज**

## गुरूजी वारे

मयुर चौधरीचा लेख वाचा सारे,
समजून घ्या आपले गुरूजी वारे,

विद्यार्थ्यांच सोनं करावं की माती,
समजलं सारं आहे शिक्षका हाती,
काम पाहून पालक धावतात सारे,
समजून घ्या आपले गुरूजी वारे,

कसी होती हो शाळा वाबळेवाडी
वारे गुरूजीने पायली शाळानाडी
गेले मुलं घेऊन पालक आले सारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे,

राजकीय परीस्थिती जरा बेतली
गावकऱ्यांनी हो ग्रामसभा घेतली
गुरूजीसाठी लोकं एक ठाई सारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे

आमसभा गावात वारेसाठी झाली
आमदारा गावबंदी लोकांना केली
अधिकारी विचारात पडलेत सारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे

बदली त्यांची हो जालिंदरनगर
शाळा होती बंद पडण्या मार्गावर
पटसंख्या पांच नोती खिडकी दारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे

तिथेही वारेन सारी कमाल केली
पटसंख्या हो एकसेतिस वर नेली
सहभागी होऊ लागले गावं सारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे

वारे गुरूजी पॅटर्न सारे राबवाना
कर्तव्य आपलं जनादाखवताना
बंद होईल संस्थानीक संस्था दारे
समजून घ्या आपले गुरूजी वारे

**मुरलीधर डहाणे नाना**
सावित्रीबाई फुले
जिल्हा परिषद शाळा वाचवा
अभियान, अमरावती

# 'डेटा लीक'चा वाढता धोका

काळानुसार सायबर गुन्हेगारांनी हॅकिंग आणि चोरी करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणला आहे. त्यामुळे या हल्ल्यापासून कोणीही वाचू शकत नाही, असे म्हटले जात आहे. मग एखाद्याने चूक केलेली असो किंवा नसो. एवढेच नाही तर या सायबर गुन्हेगारांनी पोलिसांना देखील सोडलेले नाही. खात्यातून पैसे गायब करण्यासोबतच संवेदनशील माहिती चोरण्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या सायबर गुन्हेगारांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी सजगता हवीच, त्याचवेळी ऑनलाईन असताना पुरेशा सुरक्षा साधनांचाही वापर करायला हवा.सायबर गुन्हेगारांनी जुनागड सायबर क्राईम पोलिसांचे ई-मेल आयडी हॅक करून बँकेतील गोठविलेली रक्कम खुली करण्याचा प्रयत्न केला. मात्र सायबर गुन्हेगारांचा हा डाव फसला. कारण जेव्हा ई-मेलच्या विषयाची (सब्जेट) जागा ही रिकामी दिसली तेव्हा बँकेला शंका आली आणि त्यांनी तातडीने पोलिसांना सूचित केले. सुदैवाने एका किरकोळ चुकीने गुन्हेगार पकडले गेले. मात्र असे अनेक गुन्हे सायबर गुन्हेगारांनी घडवून आणले आणि अजून त्या प्रकरणातील गुन्हेगारांचा थांगपत्ता लागलेला नाही. आणखी एक उदाहरण सांगता येईल. नोएडा येथे एका बनावट ई-मेल आयडीमार्फत एका रुग्णालयातील कर्मचाऱ्याने दिल्ली महानगरपालिकेकडून कॅशलेस उपचारासाठी मिळालेले ७४.९० लाख रुपये रुग्णालयाच्या खात्यात टाकण्याऐवजी स्वत:च्या खात्यात जमा केले. हे प्रकरण अद्याप सायबर पोलिसांकडे असून ते तपास करत आहेत. ही दोन प्रकरणे तर केवळ नाममात्र उदाहरणे आहेत. मात्र जर कोट्यवधी खात्यांचे पासवर्ड हॅक केले तर मग काय स्थिती होईल, याचा तुम्ही विचारही करू शकणार नाही. हे वाचून कदाचित आपला पासवर्ड चोरीला तर गेलेला नसेल, अशी शंका मनात आल्याशिवाय राहणार नाही.याप्रमाणे एक मोठे डेटा लीक प्रकरण नुकतेच आले आहे. यात सुमारे १६०० कोटी पासवर्ड लीक होण्याचा मुद्दा सांगितला जात आहे आणि हा इतिहासातील सर्वात मोठा डेटा लीक असल्याचे म्हटले आहे. सायबर न्यूज आणि फोर्ब्सच्या बातमीनुसार, या लीकमुळे आता लाखो यूजर्सच्या पासवर्डवर टांगती तलवार आहे. या पासवर्डच्या मदतीने सायबर गुन्हेगार वापरकर्त्यांची खासगी माहिती, फोटो, व्हिडीओ आणि अन्य माहिती चोरू शकतात. म्हणजे एकार्थाने फिशिंग स्कॅम, डेटा चोरी आणि अकाऊंटस् हॅकिंगचा धोका राहू शकतो. या डेटाच्या मदतीने सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. संशोधकांनी चोरीस गेलेला डेटाबेस तपासला असून त्याच्या ३० डेटासेटची तपासणी केली. सुमारे ३५० कोटी रेकॉर्ड सापडले असून यात कॉर्पोरेट, डेव्हलपर प्लॅटफॉर्म, व्हीपीएन लॉगिन आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या युजरच्या क्रेडेंशियलचा समावेश आहे. हा डेटा २०२५ च्या प्रारंभीपासून ते आतापर्यंतचा आहे. संशोधकांच्या मते, ऑनलाईन लीक झालेला डेटा हा अत्यंत महत्त्वाचा आहे. सिक्युरिटी रिसर्चच्या मते, हा इंटरनेटवरचा जुना डेटा नसून बहुतांश नवा डेटा आहे.हा डेटा मालवेअरच्या माध्यमातून गोळा करण्यात आला आहे. हा मालवेअर प्रोग्रॅम लोकांचा डेटा गुपचूप चोरतो. चोरीच्या या डेटामध्ये यूजरनेम आणि पासवर्डचा समावेश असतो. मालवेअर प्रोग्रॅम हे यूजर्सचा डेटा फोनवरून चोरून हॅकरला पाठवितात. हॅकर हा डेटा थेटपणे वापरू शकतात किंवा त्यांना डार्क वेब फोरमवर विकू शकतात. एका रचनेत (फॉर्मेट) ही चोरलेली माहिती संकलित केली असून यात वेबसाइट लिंक, यूजरनेम आणि पासवर्डचा उल्लेख आहे. या कारणामुळेच सायबर गुन्हेगारांसाठी त्याचा वापर करणे सोयीचे जाते.




# आषाढ माया....

आषाढ मास लागून नुकताच एक आठवडा झाला होता. नभातील कृष्णमेघांमधून रिमझिम पावसाच्या सरी दररोज धरतीवर पडणे सुरू होते. काळ्या मातीतून हिरव्या गवती वनस्पती तरारुन उठल्या आणि कडूनिंब,आंबा, इ. वृक्षराजीही हिरव्या हिरव्या पानांनी भरभरून आली होती. इतकेच नव्हेतर हिरव्या गर्द बाभळीही पिवळ्या-गुलाबी-पांढ-या फुलांनी नव्या नववधु सारख्या नटल्या होत्या.. या काळात घरट्यातील बहुतेक पाखरांची पिल्ले दिवसेंदिवस मोठमोठी होवू लागतात. त्यामुळे त्यांना अन्न भरवतात भरवता मायबापाची दमछाक झाली असते. एकंदरीत कुटुंब वात्सल्याची भावना चरट्या घरट्यातत दिसून येते. अशाच एका फुलारलेल्या हिरव्या बाभळीवर मात्र सुगरण नर पक्ष्याची लगबग माझ्या नजरेत भरुन आली. तो चि चि आवाज करत गवताच्या हिरव्या पात्यापात्याचं घरटे बनविण्यात मग्न झाला होता. बाजूलाच दुस-या एका बाभळीवर दुसरा सुगरण नरही आपले घरटे बनवत होता. जेव्हा हा सुगरण नर घरट्यासाठी गवताचं पातं आणायला जायचा तेव्हा संधी साधून पहिला सुगरण नंर त्यांच्या घरट्याचे पाते काढून चोचीत आणून आपल्या घरट्याला लावायचा. एकदा ही बाब दुस-या नराच्या लक्षात आली आणि दोघांची त्यांच्या भाषेत जोरात बाचाबाची झाली. पहिला नंर आपल्या घरट्याकडे परतला व आपल्या घरट्यासाठी गवताचं पातं आणण्यासाठी जमिनीवरच्या गवताकडे वारंवार जावून गवत आणून आपलं घरटं विणू लागला.




साधारणतः एक आठवड्याचे हे घरटे केवळ हितभर झाले होते. घरटं पूर्ण व्हायला जवळपास सहा आठवडे लागतात. त्यानंतर सुगरण मादी येवून घरटं योग्य झालं की नाही हे तपासते. ते जर चांगलं झालं असेल तर योग्य ते संकेत ती नराला देते. दोघांचेही मिलन होते. मादी अंडे देणे, उबवणे , पिल्लांच्या पंखात बळ येईपर्यंत अन्न भरवणे , संगोपन, संरक्षण करणे हे स्वतःच करते. सुगरण नर मात्र दुसरं घरटं बनवून दुस-या मादीच्या शोधात लागतो. बरेच वेळा तो यशस्वी होतो. आपल्यातील जनुकांचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा हा निसर्ग हेतु यामागे असतो. सजीवसृष्टीत तसा तो प्रत्येक नराचाही असतो. इवल्यास्या मुठभर आकाराच्या सुगरण नराची कारागिरी मात्र बुद्धीवान आणि आधुनिक समजणा-या मानवास अचंबित करणारी असते. सुगरण नर पक्षी हा स्थापत्य अभियंत्याचा निर्माता म्हंटला पाहिजे. हातभर लांबीचं घरटं आणि त्याची कारागिरी हे एक रहस्यच आहे. घरटं हवेने जास्त हलू नये म्हणून आतून एका बाजूने माती सुध्दा ते लावतात. सुरक्षेच्या दृष्टीने पुरेपूर काळजी घेण्यात येते. कोणत्या शाळेत सुगरण नरांनी हे शिक्षण घेतले असावे? मला ४ दशकांपासून पाखरांचे वेड लागायला हा सुंदर असा सुगरण पक्षीच प्रेरणादायी आहे. काल भटकंती आणि पक्षी निरीक्षणासाठी दुपारीच कीडा वळवळला. कॅमेरा गळ्यात लटकलेला. दुचाकी काढली आणि आषाढ छायेतील पाखरमाया निरिक्षणासाठी अमरावती पासून अवघ्या सात किलोमीटरवर असलेल्या बोर धरणाकडे माहेरओढीने माझी पावलं वळली. आज आषाढी एकादशी. देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासठी पायी वारी करतात. माझी पावलं मात्र वेळोवेळी जंगलाकडे, जंगलातील तळ्यांकडे कीडे किटकं, प्राणी, पक्षी इ.च्या दर्शनासाठी वळत असतात. कारण चराचरात देवाचं अस्तित्व आहे. आषाढ माया हे त्याचंच देणं .



**प्र.सु.हिरुरकर**
**मो. ९८२२६३९७९८**

# ४११ रुग्णांनी घेतला मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ

## -११० रुग्णांवर होणार मोफत मोतीबिंदूची शस्त्रक्रिया
## - शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी राबविला उपक्रम

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** जनसामान्याच्या सुदृढ आरोग्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन नांदगाव शहरातील बारी समाज भवन येथे केले. या शिबिरात डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर चमूंनी रुग्णांच्या तपासण्या केल्या. ४११ रुग्णांनी या निशुल्क महाआरोग्य शिबीरचा लाभ घेतला.

शिबिराच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य तपासणी शिबिराला सुरुवात करण्यात आली. यामध्ये डोळे तपासणी मोतीबिंदूचे ११० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले. काही रुग्णांच्या शुगर, बी.पी. व हाडाचे दुखणे, हृदयरोग तपासणी, काना नाक घसा तपासणी, गरोदर स्त्रियांच्या तपासण्या, थायरॉईड तपासणी, दमा वातविकार तपासणी, अस्थीरोग तपासणी इत्यादी तपासण्या मोफत करून मोतीबिंदू सह एकूण १९७ रुग्णांना पुढील तपासण्या व नंतर शस्त्रक्रिया औषधोपचार करिता डॉ.राजेंद्र गोडे रुग्णालय अमरावती येथे ७ जुलै रोजी मोफत नेण्यात येणार आहे. या आरोग्य तपासणी शिबिरात ग्रामीण रुग्णालयातील RBSK व NCD विभाग सुद्धा उपस्थित होता. यावेळी त्यांनी मोफत रक्त तपासणी केली या शिबिराचे आयोजन शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी केले. यावेळी बाळासाहेब राणे, डॉ.विरेंद्र खापरी, वासुदेव लोखंडे, निलेश ईखार, सुनील गुरमुळे, भूषण दुधे, चेतन डकरे, रवी ठाकूर ,नितीन दुधे, डॉ. अरुण बेलसरे,



रेखा नागोलकर, छाया भारती, शुभम रावेकर, मनोज बनारसे, निलेश डकरे, अक्षय हिवराळे, पवन शिरभाते, महेंद्र डकरे, सुनिल ईखार, शुभम चांदणे, राहुल शिवणकर, प्रेम हिवराळे, सूरज लोमटे इत्यादिंनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.

नांदगाव शहरातील गोर-गरीब नागरिकांना आरोग्य तपासणी शिबिराच्या लाभा सोबत वयोवृद्ध ११० नागरिकांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करणार असून ७ जुलै ला या रुग्णांना नेऊन पुढील तपासण्या व शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे शिबिराचे आयोजक प्रकाश मारोटकर यांनी सांगितले.

# मोबाईल टॉवरवरील चोरी प्रकरण उघड

## - तीन तासांत चोरटे गजाआड - गुन्हे शाखा युनिट १ ची कारवाई

**अमरावती/ प्रतिनिधीः-** मोबाईल टॉवरवरील जनरेटरमधून डिझेल व कॅपेसिटर चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना अमरावती गुन्हे शाखेच्या युनिट १ ने केवळ तीन तासांत अटक केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी ६ हजार रुपयांचा कॅपेसिटर जप्त केला असून, चोरट्यांनी डिझेल विकल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी आता डिझेल खरेदीदाराचा शोध सुरू केला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अरुण उर्फ दिनेश लक्ष्मण ठवरे (वय २७) व तिलक जयप्रकाश बंगय्या (वय २५) यांचा समावेश आहे. दोघेही अमरावतीतील खैरय्या नगर येथील रहिवासी आहेत. बोरगाव धर्माळे मार्गावरील जिओ मोबाईल टॉवरवर ही चोरी झाली होती. टॉवर व्यवस्थापक महेश गजानन ठाकरे (वय ३१) यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये ६ हजार रुपये किंमतीचा मॉड्यूल सुपर कॅपेसिटर (१९०इ) आणि ९,१७० रुपयांचे डिझेल यांचा समावेश होता. गुन्हे शाखा युनिट एकच्या तपास पथकाने गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळवून अरुण ठवरे आणि तिलक बंगय्या यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्यांच्याकडून कॅपेसिटर हस्तगत केला आहे. डिझेल आधीच विकल्याची कबुली त्यांनी दिली असून, आता पोलिस त्याचे खरेदीदार कोण आहे, हे शोधत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे, पोलीस निरीक्षक कैलाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाले, प्रशांत मोहोड, अलीमुद्दीन खतीब, नाजिमुद्दीन सय्यद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, रणजित गावंडे, वाहन चालक अशोक खंगार व किशोर खेंगरे यांनी केली.

# चांदुर रेल्वे येथे तैलिक समाजाची बैठक संपन्न

## युवा उद्योजक कैलास गिरोळकर यांची उपस्थिती

**चांदुर रेल्वे/ प्रतिनिधीः-** चांदुर रेल्वे शहरातील स्पार्क कम्प्युटर या ठिकाणी युवा उद्योजक कैलास गिरोळकर यांच्या अध्यक्षतेखाली तैलीक संघाची बैठक घेण्यात आली. यावेळी तालुक्यातील व शहरातील तैलिक समाजाचे अनेक मान्यवर उपस्थित होते.



यश असोसिएट्स व आसरा हॉटेल, सावली बचत गट यांच्या तर्फे १९ जुलै रोजी राज्यस्तरीय तेली समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार उद्योजक मेळाव्याचे आयोजन सांस्कृतिक भवन अमरावती करण्यात येणार आहे.

या बैठकीमध्ये सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. या बैठकीला समस्त तेली समाज बांधव व समाजातील पदाधिकाऱ्यांची हजेरी होती. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व पुढील करिअर याबाबत मोटिवेशनल स्पीच देण्यासाठी काही स्पीकर्स येणार आहेत. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. तरी जास्तीत जास्त समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे अशी विनंती कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्ट द्वारे करण्यात आली आहे. या बैठकीसाठी कैलास गिरोळकर, जयंतराव औतकर, नितीन जावरे, आशुतोष गुल्हाने, दिलीप गुल्हाने, केशव वंजारी, निलेश गुल्हाने, रमेशराव गुल्हाने, अशोकराव हांडे, महेश गुल्हाने, बंडू आंबटकर, प्रशांत कोठेकर, राजेश डिवरे ,अतुल शिरभाते, रमेश गिरोळकर ,नरेंद्र ढोबळे, योगेश डोनेकर, सचिन बिजवे,बच्चू वानरे, दीपक गिरोळकर,मनीष खुणे, धनश्री श्रीराव ,छाया गिरोळकर, योगिता कळंबे, लीना जावरे, स्वाती निस्ताने, धनश्री जीरापुरे इत्यादी समाजबांधव हजर होते.

# राज्यस्तरीय गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेत शंकर विद्यालयाचा राज्यभर डंका!

**टाकरखेडा शंभू/ प्रतिनिधीः-** गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धा २०२५ मध्ये श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था संचलित शंकर विद्यालय, तळवेल याने ग्रामीण विभागातून राज्यात तिसरा क्रमांक पटकावत मोठा मान मिळवला आहे.

या स्पर्धेअंतर्गत शाळेला २१,००० रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. जळगाव येथील पुरस्कार वितरण सोहळा दिमाखात पार पडला. कार्यक्रमास जैन समूहाचे विश्वस्त अशोक जैन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, सागर मित्र चळवळीचे विनोद बोधनकर, राज्य सल्लागार परिषदेचे किशोर बोरनारे, अंबिका जैन तसेच समन्वयक गिरीश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या वतीने डॉ. तुषार देशमुख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कुरळ पूर्णा नदीपात्रात राबवलेले 'पूर्णामाय स्वच्छता व निर्माल्य संकलन अभियान', तसेच वर्षभर शाळेने



राबवलेले विविध उपक्रम यामुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली, असे संयोजकांनी सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, सचिव नरेंद्रराव देशमुख, सदस्या जयश्री देशमुख, रविराज देशमुख, माजी मुख्याध्यापक डी. बी. वानखडे, प्रभारी मुख्याध्यापक भास्कर काळे, शिक्षिका सुचिता फुटाणे, विजय पांडे, प्रिया देशमुख, कविता देशमुख, माया मंगळे, कर्मचारी गजानन साबळे तसेच अभियानाचे समन्वयक प्रतीक देशमुख, सदाशिव देवताळे यांच्यासह गावकरी व पालक वर्गाने अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# ३० जुलै पर्यंत स्वतंत्र दिव्यांग वस्तीगृह सुरू करा

## दिव्यांग प्रतिनिधी गौरव मालक यांचा सरकारला इशारा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** सध्या सर्वत्र महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहे. असं असताना राज्याच्या वेगवेगळ्या ग्रामीण भागातून असंख्य दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणाच्या निमित्ताने शहरांमध्ये येतात.

पुणे, मुंबई, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये ही संख्या तुलने जास्त असते. मात्र, शहरात आल्यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांना हॉस्टेल मिळत नाही. आधीच घरची परिस्थिती हालाखीची असताना दुसरीकडे हॉस्टेल न मिळाल्यामुळे या विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक आर्थिक छळ होतो. त्यामुळे, येता ३० जुलै पर्यंत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह सुरू करा अन्यथा राज्यभरातील विद्यार्थ्यांसह दिव्यांग कल्याण आयुक्तालयाबाहेर अन्नत्याग उपोषण करू, असा इशारा दिव्यांग विद्यार्थी प्रतिनिधी गौरव मालक यांनी दिला.


## फ्लॅट ही फ्लॅट

अगदी आपल्या बजेट मध्ये,
पोद्दार शाळेच्या बाजुला कठोरा रोड व देसाई लेआऊट मध्ये
तयार फ्लॅट
1-BHK-19.90
8788644334
9823255054
9823544446


## पाहिजेत

अंजुमन गुलशने- इस्लाम बडनेरा, जि. अमरावती उर्दू भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था संस्थे द्वारा संचालित १००% अनुदानित माध्यमिक शाळेत खालील प्रमाणे शिक्षणसेवकाचे पद भरवयाचे आहे. तरी गरजु उमेदवारानी सर्व प्रमाणपत्रा सह संस्थे द्वारा संचालित मौलाना आझाद उर्दू हाय स्कुल बडनेरा, स्थित कार्यारत दि. २०/०७/२०२५ या दिवशी सकाळी ११ ते ०३.०० पर्यंत सर्व आवश्यक कागदपत्रा सह स्वखर्चाने उपस्थित रहावे.

| अनु क्र. | पदाचे नांव | पद संख्या | वर्ग | शिक्षणाचे विषय | शैक्षणीक अर्हता | मानधन | मुलाखती चा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक | ०३ | ९ ते १० करीता | गणित/विज्ञान | बी.एस.सी बी.एड गणित/विज्ञान | शासकीय नियमानुसार | २०/०७/२०२५ |
| २ | शिक्षण सेवक | ०२ | ६ ते ८ करिता | इंग्रेजी/हिंदी/ | बी.ए. बी.एड | शासकीय नियमानुसार | २०/०७/२०२५ |
| ३ | शिक्षण सेवक | ०२ | ५ वी करिता | विज्ञान/इंग्रेजी हिंदी | एच.एस.सी डि एड | शासकीय नियमानुसार | २०/०७/२०२५ |

टीप :१) संस्था उर्दू भाषिक अल्संख्याक असल्यामुळे उर्दू भाषिक पदे भरण्यात येईल.
२) वरिल सर्व पदांचा नियुक्तीस मा. शिक्षणधिकारी, (माध्य) जि.प. अमरावती.
व मा. शिक्षणउपसंचालक, अमरावती. यांचे मान्यते ची अट राहील.
३) उमेदवारास संबंधीत विषयामधील पदवीस ५०% गुण आवश्यक आहे.
४) वर्ग ५ वी व ६ ते ८ करीता टी ई टी / सी टी इ टी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१) मौलाना आझाद उर्दू हाय स्कुल बडनेरा,
२) हाजी शकुर उर्दू हाय स्कुल सिरजगॉव कस्बा.

**अध्यक्ष / सचिव**
**अंजुमन गुलशने इस्लाम बडनेरा,**
**जि. अमरावती.**

## जाहिर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क स्तर) बांदुर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी. क्र. ४२५/२०२५ ने.ता, १४/०८/२०२५

**अर्जदार** :-१) प्रिया प्रमोदराव राठी वय ४१ वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) प्रणव प्रमोद राठी वय २० वर्ष, व्यवसाय- शिक्षण
३) रौनक प्रमोद राठी वय १८ वर्ष, व्यवसाय-शिक्षण
अर्जदार क्र.१ ते ३ रा. शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत प्रमोद जुगलकिशोर राठी** हे दि. ०२/०२/२०२३ रोजी शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे मृत्यु पावले. तसेच **मय्यत सुशिला जुगलकिशोर राठी** ही दि. ११/०७/२०१८ रोजी शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे मृत्यु पावली. त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त त्यांना इतर कोणतेही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवशकता आहे. त्या करीता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) चांदुर बाजार, येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४२५/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांका पासुन ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहुन नोंदवावा. त्या नंतर सदर कोर्टा कडुन कोनत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिली.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
शिक्का
दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार

## जाहिर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर) बांदुर बाजार, जि.**

आर.एम.जे.सी. क्र. ४२४/२०२५ ने.ता, ७/०८/२०२५

**अर्जदार** :-१) शंकर मोतीराम धाडसे वय ५८- वर्ष, व्यवसाय-शेती
२) दिलीप मोतीराम धाडसे वय ५२- वर्ष, व्यवसाय-शेती
३)प्रतिभा बाळकृष्ण धाडसे वय ५०- वर्ष, व्यवसाय-शेती
४) अतुल बाळकृष्ण धाडसे वय ३८ वर्ष, व्यवसाय- शेती
५) सुरज बाळकृष्ण धाडसे वय २२ वर्ष, व्यवसाय- शिक्षण
६) शुभांगी सचिन वानखडे वय ३६ वर्ष, व्यवसाय- घरकाम
अर्जदार क्र. १ला आणि ३रा रा. जयप्रकाश नगर, देवास, ता. जी. देवास अर्जदार क्र.२ रा. जवाहरनगर, वडोदरा, टी.जे. वडोदरा, गुजरात अर्जदार क्रमांक ४ रा. परसापूर, ता. अचलपूर, जि. अमरावती

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**
**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत मोतीराम गणपत धाडसे** हे दि. ७/१२/२०१९ रोजी इंदोर, ता. जि. इंदोर, येथे मृत्यु पावले. तसेच **मय्यत बहिनाबाई मोतीराम धाडसे** ही दिनांक ०८/०६/१९८६ रोजी तुळजापुर गढी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे मृत्यु पावली. तसेच **बाळकृष्ण ऊर्फ रविंद्र मोतीराम धाडसे** हे दि. १४/०३/२०१९ रोजी इंदोर, ता. जि. इंदोर, येथे मृत्यु पावले.यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त त्यांना इतर कोणतेहीकायदेशिर वारस नाहीत.अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवशकता आहे. त्या करीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क. स्तर ) चांदुर बाजार, येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४२४/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांका पासुन ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहुन नोंदवावा. त्या नंतर सदर कोर्टा कडुन कोनत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिली. आदेशानुसार

शिक्का
**सहाय्यक अधिक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार

## जाहिर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर) बांदुर बाजार, जि.**

आर.एम.जे.सी. क्र. ४२६/२०२५ ने.ता, ७/०८/२०२५

**अर्जदार** :-१) प्रतिभा बाळकृष्ण धाडसे,वय ५० वर्ष, व्यवसाय- घरकाम
२) अतुल बाळकृष्ण धाडसे,वय ३८ वर्ष, व्यवसाय- शेती
३) सुरज बाळकृष्ण धाडसे,वय २२ वर्ष, व्यवसाय- शिक्षण
४) शुभांगी सचिन वानखडे,वय ३६ वर्ष, व्यवसाय-घरकाम
अर्जदार क्र. १ला आणि ३रा रा. जयप्रकाश नगर, देवास, ता. जी. देवास अर्जदार क्र.२ रा. जवाहरनगर, वडोदरा, टी.जे. वडोदरा, गुजरात अर्जदार क्रमांक ४ रा. परसापूर, ता. अचलपूर, जि. अमरावती

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**
**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत बाळकृष्ण ऊर्फ रविंद्र मोतीराम धाडसे** हे दि. १४/०३/२०१९ रोजी इंदोर, ता. जि. इंदोर, येथे मृत्यु पावले. तसेच **मय्यत बहिनाबाई मोतीराम धाडसे** ही दिनांक ०८/०६/१९८६ रोजी तुळजापुर गढी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे मृत्यु पावली. त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त त्यांना इतर कोणतेहीकायदेशिर वारस नाहीत.अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवशकता आहे. त्या करीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क. स्तर ) चांदुर बाजार, येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४२६/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांका पासुन ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहुन नोंदवावा. त्या नंतर सदर कोर्टा कडुन कोनत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिली.

आदेशानुसार
शिक्का
**सहाय्यक अधिक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. १६९/२०२५ ने.ता, ६/०८/२०२५ मनोहर /वि निरंक

**अर्जदार -१. मनोहर माधवराव शेलारे**,रा धारणी ता धारणी जि अमरावती
**२. मनोज माधवराव शेलारे**,रा क्वार्टर न ०२ टाईप २ बिल्डींग जूने झेड पी ऑफीस समोर सिव्हील हॉस्पीटल वर्धा ता. जि. वर्धा
**३: भाऊराव माधवराव शेलारे**,रा भांसी चाळ न २ सिटीएस ७८८ हिस्सा-१७गेट नं ४ अपी माहिते होऊस मढ मालाड वेस्ट वेसावा एस.ओ. मुंबई
**४. जनार्धन माधवराव शेलारे**,रा वार्ड नं ०२ शहापूर ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती
**५. प्रेमिला यादवराव वासनिक**,रा घारेफळ (सातेफल) ता जि यवतमाळ६. संघनित्रा प्रविण गजबे, रा भिल्ली पो कसारखेडा ता धामनगाव रेल्वे जि अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत माधवराव फागोजी शेलारे मृत्यु दि.०३.०८.२०१३** रोजी शहापुर, ता नांदगांव खंडेश्वर जि अमरावती तसेच **मयत गुंफाबाई माधवराव शेलारे मृत्यु दि.०४.०८.२०१०** रोजी शहापुर, ता नांदगांव खंडेश्वर जि अमरावती येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्य काही आक्षेप किंवर हरकती घ्यावयाच्या असेल यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजताना दिवाणी न्यायालय नांदगांव खंडेवर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलामार्फत हजर राहणे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक : ०४ जुलै २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिंशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, नांदगाव खंडेश्वर

## जाहिर नोटीस

**वि सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र. २४०/२०२५ ने.ता, १२/०८/२०२५

**अर्जदार- १) रोहन नामदेवराव मालवे**,वय २४ वर्ष व्यवसाय- शेती
**२)रोशनी नामदेवराव मालवे**, वय २१ वर्षे व्यवसाय- घरकाम
**३)कौसल्या पंजाबराव मालवे**, वय ७७ वर्षे व्यवसाय- घरकाम
सर्व रा.दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरूध्द** **गैरअर्जदार :-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **नामदेवराव पंजाबराव मालवे हे दि.२३/०३/२०२५** व त्यांची पत्नी मंजू नामदेवराव मालवे हे दि. ३०/०४/२०२१ रोजी मयत झाले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व कलम ३७२ भारतीय वारसाहक्क कायद्याप्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्य झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.**मालमत्तेचे वर्णन** मयत **नामदेवराव पंजाबराव मालवे** यांचे नावे मौजा दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील शेत गट क. ६०/२/व, ० हे. ८२ आर, आ.रू. ४.२५ या मधील १८८ हिस्सा व मौजा जहानपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील शेत गट क. ९८, ०.हे.४० आर आ.रू. २.२१ या मधील १/८ हिस्सा व मौजा दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील न.प. दर्यापूर अंतर्गत अ.क. १२७८, झोन क. २ वार्ड क्र. ९. मालमत्ता क. १२४४ येणे प्रमाणे मिळकत असून त्याची बाजारभाव किंमत ४०,०००/- रू. आहे. तसेच मयत **नामदेवराव पंजाबराव मालवे** यांचे नावे अकोला अर्बन को-ऑप बैंक शाखा दर्यापूर, येथे बचत खाते क. १०१८००५००८४६४ असे खाते असून त्यात रक्कम २२८५३४/- रुपये जमा आहेत.आज दि.०४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
शिक्का
**सहाय्यक अधिक्षक** (प्रशासन) दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहिर नोटीस

**वि २ रे सह दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र. २६१/२०२५ ने.ता, ३०/०७/२०२५

**अर्जदार- १. शांता बळीराम इसळ**, वय ४९ वर्ष व्यवसायः शेती
**२ चेतन बळीराम इसळ**, वय २५ वर्ष व्यवसायः ..
**३ भाग्यश्री बळीराम इसळ**, वय २३ वर्ष व्यवसायः शेती
रा. मु. कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **बळीराम गोपाळ इसळ** हे दि. ८/०६/२०१८ रोजी मयत झाले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात** अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहा.सहाय्यक अधिक्षक** (प्रशासन)
शिक्का
दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर

## जाहिर नोटीस

**वि सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र. २६६/२०२५ ने.ता, ५/०८/२०२५

**अर्जदार- १.गोरखनाथ रामदास धोटे** ,वय ३० वर्ष व्यवसायः शेती
**२. गोपाल रामदास धोटे**
रा. मु. कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरुध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **पुष्पा रामदास धोटे** हे दि. २८/०५/२०१८ रोजी मयत झाले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात** अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि.०२/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक** (प्रशासन)
दिवाणी न्यायालय व. स्तर,
शिक्का
दर्यापूर

## जाहिर नोटीस

**वि २ रे सह दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र. २६५/२०२५ ने.ता, ५/०८/२०२५

**अर्जदार- १. शोभा रघुनाथ गांजरे**,वय ६९ वर्ष व्यवसायः शेती
रा. मु. कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **गोपाल रघुनाथ गांजरे** हे दि. ३०/०४/२०१५ व त्यांचे **वडिल रघुनाथ डेबुजी गांजरे** दि.२२/०६/२०१० रोजी मयत झाले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात** अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**प्र.सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर,
शिक्का
दर्यापूर

# खेट्री येथील जिल्हा परिषद शाळेच्या दुरुस्तीचा मुहूर्त निघेना

## भरपावसात उघड्यावर शिक्षण घेताहेत विद्यार्थी; पालक, गावक-यांमध्ये संतापाची लाट





■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेची दुरुस्ती गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असून, यामुळे विद्यार्थ्यांना उघड्यावर, तेही भरपावसात शिक्षण घेण्याची वेळ येत आहे. वर्गखोल्यांच्या छतावरील टिनपत्रे उडून गेल्याने तसेच काही टीनपत्रे जीर्ण झाल्याने पावसाचे पाणी थेट वर्गांमध्ये साचत आहे. परिणामी वर्गखोल्या जलमय झाल्या असून, विद्यार्थ्यांचे शिक्षण अक्षरशः ढगांखाली वाऱ्यावर सुरू आहे.**

शाळेच्या मुख्याध्यापक, पालक व ग्रामस्थांनी वारंवार दुरुस्तीची मागणी केली असतानाही प्रशासनाकडून फक्त आश्वासने दिली जात आहेत. नवीन शैक्षणिक सत्राचा गाजावाजा करत २३ जूनपासून शाळा सुरू करण्यात आली. स्वागत सोहळे पार पडले, परंतु मूलभूत सुविधांची पुरती दुरवस्था असल्याचे वास्तव काही दिवसांतच पुन्हा समोर आले.

शाळेच्या दुरावस्थेवरून पालकांमध्ये संतापाचे वातावरण असून, शासनाच्या शिक्षणावरील प्राथमिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विकासाचे दावे करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीतही विद्यार्थ्यांचे भविष्य भरपावसात चिंधडीसारखे भिजत असल्याचे चित्र अत्यंत वेदनादायक असून या प्रकारामुळे शिक्षण विभाग, लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात संतापाची लाट निर्माण होत आहे. तर या गंभीर प्रकाराची त्वरित दखल घेऊन वर्गखोल्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी पालक आणि ग्रामस्थांकडून तीव्र होत आहे.

**प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष – पालक व विद्यार्थ्यांमध्ये संताप**

खेट्री ग्रामपंचायतीचे सरपंच जहूर खान यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'पंधरा वित्त आयोगाअंतर्गत शाळा दुरुस्तीच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे दोन वेळा ग्रामसभा पार पाडून जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे अहवाल पाठवण्यात आला, मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.'

**विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ – पटसंख्येवर परिणाम**

शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी शिक्षण विभागाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत. गावात प्रभातफेरी, स्वागत सोहळे व प्रोत्साहन दिले जात असले तरी वर्गात जागा नसणे, पाणी साचणे आणि सुरक्षिततेचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी शाळेकडे पाठ फिरवली आहे. शिक्षणाची गंगा गावागावात पोहोचवण्याचे सरकारी धोरण कागदावरच राहिले आहे, अशी भावना पालक व्यक्त करत आहेत.



# आषाढी एकादशीला अकोल्यात फुलला भक्तांचा मळा

## पुरातन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महाअभिषेकाने भक्तिभावाचे वातावरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक जुने शहरातील ३२१ वर्षांच्या इतिहास असलेल्या पुरातन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढ शुद्ध एकादशी निमित्त पहाटे पाच वाजता श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची षोडशोपचार महापूजा व अभिषेक संपन्न झाला. श्री विठ्ठल महापूजा मंडळाचे सेवा अधिकारी कृष्णा गोवर्धन शर्मा व सौ. अर्चना शर्मा यांच्या हस्ते हा विधी पार पडला.

या पवित्र दिवशी गेल्या ९२ वर्षांपासून अखंड चालणाऱ्या हरिनाम सप्ताहाची परंपरा यावर्षीही उत्साहात जपण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. विठुरायाच्या दर्शनासाठी भाविक बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठुनामात दंग होण्याचा लाभ घेतला.

मंदिर परिसर यात्रेसारखा गजबजलेला होता. भाविकांनी उत्साहात कीर्तन, भजन, अभंग गायनात सहभाग घेतला. मंदिर व्यवस्थापन समिती, श्री विठ्ठल महापूजा मंडळ आणि पोलीस विभाग यांच्यावतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी मंदिर विश्वस्त समितीचे व्यवस्थापक रमेश अलकरी, प्रवीण वाणी, यशोधन गोडबोले, आनंद उगले, नितीन खोत, संजय ठाकूर, महेश कडूसकर, राजेश खोत, बबलू ठाकूर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. भाविकांच्या हरिनामात रंगलेल्या या पावन दिवशी अकोल्यातील विठ्ठल मंदिर परिसर भक्तिभावाने उजळून निघाला.

## जाहीर नोटीस

सर्व बँक, वित्तीय संस्था व इतर लोकांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली मालमत्ता : मौजे अकोला येथील भुमापन क्र. २४/३५, लेआउट प्लॉट क्र. ४१, शिट क्र. ६६, मधील १९७० चौ. फुट जागा आहे त्यावरील चार दुकान प्रत्येकी ३५० चौ. फुटांची व काही खुली जागा, ज्यास चतु:सिमा, पुर्वेस : डॉ. वोरा यांचे घर, पश्चिमेस : सडक, उत्तरेस : सर्व्हिस लेन व दक्षिणेस : लक्ष्मीचंद जैन यांचे दुकान.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेबाबत माझे पक्षकराचा सख्खा भाऊ नामे सतिष दिगांबर गोसावी, रा. अकोला यांनी माझ्या पक्षकाराचा हिस्सा डावलण्याच्या हेतुने खोटे मृत्युपत्र त्यांचे नावे केले असून त्याव्दारे सदर वर नमूद मालमत्ता ही गैरकायदेशीररित्या स्वतःच्या नावे केली असून माझ्या पक्षकाराला मिळालेल्या माहिती नुसार माझ्या पक्षकाराचा भाउ सतिष दिगांबर गोसावी हे वर नमूद मालमत्ता विकण्याच्या प्रयत्नात आहे. करीता माझे पक्षकार हे विद्यमान दिवाणी न्यायालय, अकोला येथे लवकरच प्रकरण दाखल करणार असून हया नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, कोणीही वर नमूद मालमत्तेबाबत सतिष दिगांबर गोसावी हयांच्या सोबत कुठलाही सौदा, गहाण किंवा इतर कुठलाही व्यवहार करू नये, केल्यास तो माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. तसेच माझे पक्षकार न्यायालयात दाखल करत असलेल्या प्रकरणात संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती ही पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.

अकोला
दि. ०५/०७/२०२५

**पक्षकार तर्फे अधिवक्ता**
ॲड. विष्णु एस. इंगळे, अकोला.

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८१/२०२४ — प्रोसेस नं.१००६८/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ — दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. अर्चना दिलीप नळकांडे २. विशाल दिलीप नळकांडे दोघेही रा. व्दारा उज्वल विश्वनाथ खुमकर यांचे घराजवळ, गजराज अपार्टमेंट च्या समोर, केला प्लॉट्स, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्राजक्ता निकेश वानखडे रा. हिरपूर ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिलीप रामचंद्र नळकांडे
**पत्ता :-** रा. व्दारा उज्वल विश्वनाथ खुमकर यांचे घराजवळ, गजराज अपार्टमेंट च्या समोर, केला प्लॉट्स, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी 'मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिलीप रामचंद्र नळकांडे यांचे दि. १२/०३/२०२४ रोजी आयकॉन हॉस्पिटल अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११४८/२०२४ — प्रोसेस नं.१०१७०/२०२५
चौ.ता. १३/०८/२०२५ — दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** १. रवि उर्फ रविकुमार मनोहरराव मोरगांवकर २. मधुकर रवि उर्फ रविकुमार मनोहरराव मोरगांवकर रा. अकोला अर्बन बँक च्या मागे, गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिला रवि उर्फ रविकुमार मनोहरराव मोरगांवकर
**पत्ता :-** रा. अकोला अर्बन बॅक च्या मागे, गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिला रवि उर्फ रविकुमार मनोहरराव मोरगांवकर यांचे दि. १२/११/२०२३ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विधी व न्याय सेना अमरावती विभागीय अध्यक्षपदी ॲड. महेश शिंदे यांची नियुक्ती



**मोफत कायदे सल्ला केंद्र स्थापन करण्याचा ॲड. शिंदे यांचा निर्धार**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अधिकृत वकील संघटनेत महत्त्वाची जबाबदारी पातूर तालुक्यातील उमरा येथील ॲड. महेश गजानन शिंदे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांची शिव विधी व न्याय सेनेच्या अमरावती विभागीय अध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

५ जुलै रोजी मुंबई येथील शिवसेना भवनात झालेल्या विशेष कार्यक्रमात शिवसेना पक्षाचे सचिव व खासदार अनिल देसाई, शिव विधी व न्याय सेनेचे राज्याध्यक्ष ॲड. नितेश सोनवणे यांच्या हस्ते, शिवसेनेचे उपनेते व आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. महेश शिंदे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी राज्य प्रभारी उपाध्यक्ष ॲड. स्वप्ना कोदे, राज्य चिटणीस ॲड. सुमित घाग, राज्य कार्यकारिणी सदस्य व विदर्भ समन्वयक ॲड. गिरीश दिवाणजी, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष ॲड. भक्ती दांडेकर, युवा सेना अकोला जिल्हाप्रमुख सागर रामेकर, पातूर उपतालुकाप्रमुख पवन तायडे यांची उपस्थिती होती. या नियुक्तीनंतर बोलताना राज्याध्यक्ष ॲड. नितेश सोनवणे यांनी सांगितले की, 'अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये लवकरच शिव विधी व न्याय सेनेची वकिलांची प्रभावी टीम उभारली जाईल. गरजू व गरीब जनतेसाठी प्रत्येक जिल्ह्यात मोफत कायदेशीर सल्ला केंद्र उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होईल.'

शिवसेनेच्या '२० टक्के राजकारण, ८० टक्के समाजकारण' या ब्रीदवाक्याला न्याय देण्यासाठी ॲड. महेश शिंदे यांच्या कार्यक्षम नेतृत्वाचा उपयोग होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## Change In Name

I HAVE CHANGE MY NAME FROM **ZAKIYA BI ABDUL QADEER** (AS PER OLD PASSPORT NAME / WRONG NAME) -TO- **ZAKIYA BI ABDUL QUADEER** (NEW NAME AS PER ON TWO PHOTO ID) PASSPORT NO.V9754417 ADDRESS - (IF AS PER OLD PASSPORT OR IF CHANGE THEN AS PER ADHAR) AT POST KHETRI TQ PATUR, AKOLA : PIN : 444501, MAHARASHTRA, INDIA

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने एकदिवसीय ग्रंथ वाचक मेळावा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या तत्वप्रणालीला उत्तमपणे प्रदर्शित करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'भगवान बुध्द आणि त्याचा धम्म' हा धम्म ग्रंथ 'आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा' ह्या तीन महिन्याच्या कालावधीत गावागावात पठण आणि श्रवण करून धम्मचळवळ गतिमान करण्यात येत असते.

ह्या धम्म चळवळीचा महत्वाचा धागा म्हणून कार्य करणारा ग्रंथवाचक अतिशय महत्वाचा दुवा मानला जातो.

ह्याच ग्रंथवाचकाला प्रशिक्षित आणि मार्गदर्शक सूचना देण्याच्या उद्देशाने भारतीय बुध्द महासभेच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन राहुलनगर अकोट करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा अकोट तालुका अध्यक्ष सुरेश गवई होते. सदर कार्यशाळेला जिल्हा कार्यकारणीचे अध्यक्ष पी. जे. वानखडे, सरचिटणीस नंदकुमार डोंगरे, कोषाधक्ष्य विजय जाधव, केंद्रीय शिक्षक गवई गुरुजी, विलास बावस्कर यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी धम्म अधिष्ठान मजबूत करण्याहेतू सामाजिक राहत असताना ग्रंथवाचकाने कोणत्या बाबी प्रकर्षाने पाळाव्या, कुठले संस्कार रुजवावे, इत्यादी विचार अभिव्यक्त केले. यावेळी धम्मग्रंथांचा संपूर्ण भाग सारांश रूपाने मांडला गेला ज्यामध्ये मिलिंद तेलगोटे, अरुण रायबोले, भिमराव वानखडे, रविंद्र इंगळे, मनिष सरकटे यांनी खंडनिहाय धम्म विषद केला. यावेळी भारतीय बौद्ध महासभा अकोट तालुका ची संपूर्ण कार्यकारणी उपस्थित होते सोबतच केळीवेळी, जळगाव न., वडाळी सट, लोहारि, मुण्डगाव, आलेगांव खैरखेड, पिंपरी खुर्द, जीतापुर, तांदूळवाडी, चोहट्टा बाजार, रेल, निजामपूर देवर्डा, आसेगाव बाजार, कवठा, सावरा, देऊळगाव अकोली जहागीर अकोलखेड सुकळी, मरोडा, दणोरी, वरुर जवळका, बेलुरा, अकोट शहर आणि तालुक्यातील बहुसंख्य गावातील ग्रंथवाचक तथा उपासक उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद तेलगोटे तर प्रास्ताविक श्रीकांत घनबंहादूर आणि आभार प्रदर्शन दुर्योधन भेले यांनी केले.

## 'कर्जमाफी आठवण' शेतकरी विकास मंचाचे आज धरणे आंदोलन

**अकोला :** राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकरी विकास मंच, महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक आज ७ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणा आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या आश्वासनाची आठवण करून दिली जाणार आहे. मंचाचे म्हणणे आहे की, अनेक वेळा निवडणुकीपूर्वी व निवडणुकीनंतर सरकारने कर्जमाफीचे आश्वासन दिले, मात्र अद्याप हजारो शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही.

# शहरातील पथदिवे बंद, नागरिक त्रस्त

## ए.पी.जे. अब्दुल कलाम संस्थेचा प्रशासनाला इशारा!

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरातील जुनी वस्ती, खडकपुरा व आसपासच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पथदिवे बंद असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडाल्याने पादचारी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ए.पी.जे. अब्दुल कलाम बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नगरपरिषद मुर्तिजापूरचे मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये २४ तासांच्या आत पथदिवे सुरु करण्यात यावेत, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आगामी काळात होणाऱ्या कोणत्याही अनुचित प्रकारास प्रशासनच जबाबदार राहील, असा ठाम इशारा संस्थेने दिला आहे.

शहरात लाखो रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेले पथदिवे केवळ शोभेच्या वस्तू ठरत असल्याची तीव्र टीकाही निवेदनात करण्यात आली आहे. खडकपुरा, जुनी वस्ती तसेच परिसरातील अंधारामुळे महिला, वृद्ध, विद्यार्थी आणि कामावर जाणाऱ्या नागरिकांना रोजच्या जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संस्थेने निवेदनात स्पष्ट केले आहे की, दोन दिवसांच्या आत जर पथदिवे सुरू झाले नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्यास जबाबदार नगरपरिषदेचे प्रशासन असेल.

या निवेदनावर संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद शब्बीर, कोषाध्यक्ष मोहम्मद शोएब, सचिव मोहम्मद रियाज, सदस्य दिन नासिक, नदीम दिन, शेख समीर, मोहम्मद जुनैद, मोहम्मद मुनव्वर, मोहम्मद गोलू यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कच्छी मस्जिदचा तांत्रिक नवाचार : 'कच्छी मस्जिद अजान ॲप'चे लोकार्पण

## १३५ वर्षांची ऐतिहासिक मस्जिद आता थेट मोबाईल ॲपद्वारे अजानसाठी सज्ज; पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा आदर्श उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोल्यातील १३५ वर्षे जुनी ऐतिहासिक कच्छी मस्जिद ही आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेत देशातील एक प्रेरणादायक उदाहरण ठरली आहे. या मस्जिदतर्फे 'कच्छी मस्जिद अजान ॲप' या नावाने एक विशेष मोबाईल ॲप तयार करण्यात आले असून त्याचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले.

या ॲपच्या माध्यमातून आता भारतातच नव्हे तर परदेशातही असलेल्या नमाजी व्यक्तींना अकोल्यातील मस्जिदमधून थेट अजान ऐकता येणार आहे. यामुळे वेळेवर नमाज अदा करणे अधिक सुलभ झाले असून ही कल्पना समाजासाठी आणि पर्यावरणासाठीही उपयुक्त ठरणारी आहे. तर येत्या चार दिवसात अकोल्यातील सर्व परिसरात असलेल्या इतर मस्जिद सुद्धा या ॲपचा वापर अमलात आणणार असून अतिशय चांगला असा हा उपक्रम अकोल्यात राबविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हा प्रयोग देशात प्रथम अकोल्यातून सुरू होत आहे.

या ॲप ची निर्मिती हुदा टेक्नॉलॉजी, पुणे या आयटी कंपनीने केली आहे. कंपनीचे डायरेक्टर सादुल्ला व सीनियर प्रोजेक्ट मॅनेजर बशीर काझी



यांनी ॲपची माहिती सादर केली. या उद्घाटन सोहळ्याला आमदार साजिद खान पठाण, ट्रस्टचे अध्यक्ष जावेद जकारिया, हाजी मुदाम, मुतवल्ली एजाज सूर्या, हाजी यासीन बच्चव, हाजी फारूक भुरानी, मोहम्मद इरफान, इरफान कासमानी, तय्यब खान तसेच कच्छी मेमन जमात व हाशम सेठ ट्रस्टचे पदाधिकारी आणि शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा ॲप धार्मिक श्रद्धा, तंत्रज्ञान आणि सामाजिक सलोखा यांचे प्रतीक आहे. आमचा उद्देश म्हणजे आधुनिकतेशी जुळवून घेत नमाजींना सुविधा देणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे,' असे मत कच्छी मस्जिद ट्रस्टच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

कच्छी मस्जिद अजान ॲप' हे ॲन्ड्रॉईड युजर्ससाठी गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. वापरकर्त्यांनी ते डाउनलोड करून अजानच्या वेळेस सतर्क राहता येईल. अशी माहिती यावेळी आयोजकांनी पत्रकार परिषदेत दिली.

**सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिसीमा मार्गदर्शक तत्त्वांचा विचार**

ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी कच्छी मस्जिद ट्रस्टने सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. अजानसाठी मोठ्या स्पीकरऐवजी ॲपचा वापर करून नमाजप्रेमींना थेट त्यांच्या मोबाइलवर अजान ऐकता येईल, याची कल्पना सामाजिक बांधिलकी जपत राबवण्यात आली आहे.

### ॲपची वैशिष्ट्ये

- पाच वेळची थेट अजान
- मस्जिदशी थेट जोडणी
- किबला डिरेक्शन
- कोणत्याही ठिकाणाहून योग्य दिशादर्शक
- रमजान, जुमा व धार्मिक कार्यक्रमांची नोटिफिकेशन्स
- वापरण्यास सोपा आणि स्मार्ट यूजर इंटरफेस
- वेळेच्या अचूकतेनुसार नमाजाची आठवण

**सौरऊर्जेचा वापर – पर्यावरणाशी सुसंगत मस्जिद :** कच्छी मस्जिद ही विदर्भातील पहिली मस्जिद आहे जिने आपल्या छतावर सौरऊर्जा प्रणाली बसवली आहे. हाशम सेठ चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने उभारलेला हा प्रकल्प पर्यावरण संवर्धनाचा आदर्श दाखवतो. ॲपद्वारे ध्वनीप्रदूषणही टाळले जात असल्याने हा तंत्रज्ञान आणि नैतिकतेचा उत्तम संगम ठरतो आहे.

# वर्धा जिल्हा स. संस्था गटसचिवांचा अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

## पुणे येथील सहकार आयुक्त आणि राज्य निबंधक यांना दिले निवेदन

**आष्टी (शहीद)/ जनमाध्यम**

सहकारी संस्थेच्या गट सचिवांनी सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज कर्ज माफी योजनेची कामे जिल्हा सहकारी बँकेत स्वखर्चाने मुक्कामी राहुन रात्रीचे जागरण करून अहोरात्र काम केले. त्यांनी घेतलेल्या मेहनतीने शासनाकडुन जिल्हा सह.बँकेला ८२९१.०५ लाख रुपये प्राप्त झाले.हा पैसा सेवा सहकारी संस्थेच्या कर्जदार सभासदांचा असल्यामुळे गटसचिवांना वेतनाकरीता द्यावयास पाहिजे होता. परंतु जिल्हा बँकेचे कार्यकारी अधिकारी व सहकारी संस्थेचे वर्धा जिल्हा उपनिबंधक यांनी हेतु पुरस्पर दिले नाही.

तेव्हा जिल्हा बँकेचे कार्यकारी अधिकारी कोरडे यांनी सांगितले जो पर्यंत मी या पदावर आहे, तो पर्यंत जिल्ह्यातील गटसचिवांचे वेतन होऊच देणार नाही. जर गटसचिवांना वेतन मिळाले तर माझे तळहाताला केस फुटेल. तेव्हा पासुन आज पर्यंत वर्धा जिल्ह्यातील गटसचिवांना वेतनाचा एक पैसा सुध्दा मिळाला नाही.

वेतन मिळण्यासाठी गटसचिवांनी सात वर्षात वरीष्ठ स्तरावर सर्वच ठिकाणी दाद मागितली मुख्यमंत्री, सहकार मंत्री, खासदार,आमदार जिल्ह्याचे पालकमंत्री, सहकार सचिव, सहकार आयुक्त,डी.डी.आर, जिल्हाधिकारी या सर्व अधिकाऱ्यांना शेकडो निवेदने आणि विनंती अर्ज दिले परंतु यापैकी कोणीही गटसचिवांच्या वेतनाची दखल घेतली नाही. सहकार प्रशासनाने गटसचिवांना जबरदस्तीने उपासमारी आणि दारिद्री जीवन जगण्यास भाग पाडले आहे.

इतकेच काय तर अनेक गटसचिवांच्या मुलांचे शिक्षण अर्धवट राहिल्यामुळे त्यांच्या मुलांचे जीवन सुध्दा उध्वस्त झाले आहे. कुटंबातील म्हातारे आई-वडील याचे आरोग्य पैशाच्या समस्येमुळे वाढतच गेले.सहकार प्रशासनाने गटसचिवांचे पी.एफ.चे पैसे भरल्या नसल्यामुळे गटसचिवांना पी. एफ. चे पैसे सुध्दा भेटत नाही. यावरून गटसचिवांचे भविष्यही अंधकारातच जाणार आहे.

वर्धा जिल्ह्यातील गट सचिवां मधील काही गटसचिव आर्थिक समस्यांमुळे मरण पावले आहेत तरी या सहकार प्रशासनाला गटसचिवांची दया येत नाही, ही फार मोठी शोकांतिका आहे असे म्हणायला हरकत नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी सन्था अधिनियम १९६०चे कलम ७९(१) च्या निर्देशा नुसार गतसचिवाना वेतन व इतर देने शासन निर्णय ११०८ प्र.क्र.६९८ र.स.२००८ अन्वये गठीत झालेल्या जिल्हा देखरेख समितीच्या शिफारशी नुसार सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महा.राज्य.पुणे यांचे पत्रानुसार गटचिवांना वेतन देने अनिवार्य आहे.असे असून सुद्धा गटसचिवाने केलेल्या कामाचा मोबदला न मिळणे हे कितपत योग्य आहे.

जिल्ह्यातील सर्व गटसचिवांना योग्य न्याय मिळण्यासाठी आष्टी तालुक्यातील गटसचिव विलास गुंबळे यांनी प्रत्यक्ष पुण्याला जाऊन सहकार आयुक्त व राज्य निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे कार्यालयात बसुन अन्नत्याग आंदोलन करण्याच्या इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावर सहकार आयुक्त तावरे, वर्धा जिल्ह्यातील गटसचिवांना योग्य न्याय देते की अन्न त्याग आंदोलन करण्यास भाग पाडते हे येत्या काळात दिसुन येणार आहे.

## आठ वर्षाच्या चिमुकल्यासोबत अनैसर्गिक कृत्य

**आंजी (मोठी)/ जनमाध्यम**

आठ वर्षाच्या चिमुकल्यासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याची संतापजनक घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीस अटक केली.आठ वर्षाच्या चिमुकल्यावर मारुती शेंद्रे (वय ५०) नावाच्या नराधम इसमाने अनैसर्गिक कृत्य केले. चिमुकल्याने ही बाब आईवडिलांना सांगितली. याप्रकरणी तक्रारीवरून खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी आरोपी मारुती शेंद्रे विरोधात गुन्हा दाखल केला. खरांगणा पोलीस स्टेशनचे ठाणेदार चंद्रकांत पाटील यांनी वेताने तपास करत आरोपीला बारा तासाच्या आत अटक केली. पुढील तपास विनोद सानप, धवणे करीत आहेत.

## क्षुल्लक कारणातून मारहाण

**वर्धा**-क्षुल्लक कारणातून इसमास मारहाण केल्याची घटनाआंजी (मोठी) येथे घडली. याप्रकरणी खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आंजी (मोठी) येथील गजेंद्र रामदास सावरे यांच्या मालकीच्या शेळीचे पिल्लू सुनील वाणी यांच्या घराकडे गेले. शेळीचे पिल्लू घराजवळ आल्याच्या कारणातून सुनील वाणी यानी गजेंद्र सावरे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## बोरी येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**कारंजा (घाडगे)**-तालुक्यातील बोरी येथील शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बोरी शिवारात घडली. श्रीराम परसराम बारंगे (वय५५) रा. बोरी असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. श्रीराम बारंगे हे नऊ एकर शेतीत उत्पादन घेत होते. शेतीवर त्यांनी २०१९-२० मध्ये एक लाख ५० हजार रुपये पीक कर्ज घेतले. शेती कोरडवाहू आणि सातत्याने नापिकी होत असल्याने कर्जाची परतफेड करता आली नाही. पाच ते सहा दिवसांपूर्वी त्यांना बँकेचा नोटीस आला होता. त्यामुळे ते सातत्याने चिंतेत राहत होते. नापिकी आणि कर्जाला कंटाळून गळफाास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी कारंजा (घाडगे) पोलिसांनी नोंद केली.

## बी.फार्मसी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**वर्धा/ जनमाध्यम**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलद्वारे औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सीईटी सेलने याचे सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.वेळापत्रकानुसार ४ जुलैपासून ऑनलाइन नोंदणी सुरू करण्यात आली असून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पहिली अंतिम गुणवत्ता यादी २१ जुलैलाअर्ज नोंदणी आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी १३ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे. औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी ५ जुलै ते १४ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. १३ जुलैपर्यंत नोंदणी न करणार्या विद्यार्थ्यांना केंप फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही. १६ जुलै रोजी तात्पुरती गुणवत्तायादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर अर्जामध्ये झालेल्या दुरुस्त्या सुधारण्यासाठी १७ते १९ जुलै हा कालावधी दिला जाणार आहे. सर्व तक्रारींचे निवारण झाल्यानंतर २१ जुलै रोजी पहिली अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

# विठ्ठल-रुख्मिणी चरणी पालकमंत्री डॉ. भोयर सपत्नीक नतमस्तक

**वर्धा / जनमाध्यम**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथील विठ्ठल-रुख्मिणीचे आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी डॉ. भोयर व शीतल भोयर यांनी विठ्ठल चरणी नतमस्तक होत शांती व समृद्धीसाठी साकडे घातले.

रविवार ६ रोजी पहाटेची पूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस यांच्या हस्ते पार पडली. त्यावेळी डॉ. भोयर दाम्पत्याची उपस्थिती होती. विदर्भात अजूनही वरुणराजा दमदार बरसला नाही. त्यामुळे विदर्भावर कोरड्या दुष्काळाचे सावट आहे.



**शांती, समृद्धीसाठी घातले साकडे पहाटेच्या पूजेला होती उपस्थिती**

मागील काही वर्षात शेतकरी नैसर्गिक संकटानी चहू बाजून वेढला गेला आहे. त्याचे संकट निवारण्यासाठी विठ्ठल चरणी प्रार्थना केली. जगात शांती नांदू दे, शेतकरी आणि नागरिकांना समृद्धी नांदो असे साकडे यावेळी डॉ. भोयर व शीतल भोयर यांनी विठ्ठल-रुख्मिणीला आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात घातले.

## महिलेच्या पर्समधील दीड लाखांचा ऐवज लंपास

**तळेगाव**-बसमध्ये चढताना महिलेच्या हॅण्डबॅगमधील पर्स काढून एक लाख ४९ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही घटना तळेगाव बसस्थानकावर घडली. आष्टी तालुक्यातील रामदरा तळेगाव (श्या. पंत) येथील कांता रमेशराव ईखार (वय ५५) या तळेगाव बसस्थानकातून बसमध्ये जात होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या हॅण्डबॅगमधील पर्स लंपास केली. त्यात सोन्याचा गोफ, अंगठी, मंगळसूत्र, सोन्याचे मनी, चांदीचा ऐवज तसेच सात हजार रुपये रोख असा एक लाख ४९ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी तक्रारीवरून तळेगाव (श्या. पंत) पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पर्यावरणाचे संतुलन राखू तरच जीवसृष्टीचे अस्तित्व-डॉ. सचिन पावडे

## पवनार येथील नागटेकडी परिसरात फळरोपांची लागवड

**वर्धा / जनमाध्यम**

पर्यावरणाचे संतुलन राखू, हिरवळ वाढवू तर पुढील पिढ्या जिवंत राहतील. आपण संयुक्तपणे गेल्या तीन वर्षांपासून नाग टेकडीवर वृक्षारोपणाचा जो उपक्रम राबवीत आहात, तो खरच स्तुत्य आहे. यावर्षी विविध फळांची रोपे लावून त्यांना कठड्यांचे संरक्षण आपण दिले. यातून वन्यप्राणी टेकडीवरील झाडांवरील फळे खातील व शेतशिवारात होणारे पिकांचे नुकसान, नासधूस थांबेल, असे मनोगत वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष तथा बालरोगतज्ज्ञ डॉ. सचिन पावडे यांनी केले.

स्थानिक तपोवन बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था व वर्धा येथील कृषी विभाग कर्मचारी वृंद सहकारी पतसंस्था, पवनार ग्रामपंचायत कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फळरोप लागवड कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे, वर्धा श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण धोपटे, ग्रामविकास अधिकारी आदिनाथ डमाळे, बजरंग दलाचे जिल्हा संयोजक बबलू राऊत, कृषी विभाग कर्मचारीवृंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रशांत भोयर, प्रा. डॉ. पुरुषोत्तम खोब्रागडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. मेघे यांनी सांगितले की, पर्यावरणाच्या समतोलाकरिता झाडे लावणे आणि ती जगविणे अत्यंत आवश्यक आहे. आपण सर्वांनी पुढाकार घेऊन या वृक्षांचे संगोपन केले पाहिजे. प्रवीण धोपटे म्हणाले की, आपण जे वृक्षारोपण व जतनाचे काम करीत आहात, ते या परिसरातील पुढील पिढ्या लक्षात ठेवेल. हरितपट्ट्याने हा परिसर निसर्गसौंदर्याने नटेल आणि येथे नागरिकांना निसर्गाचे सान्निध्य अनुभवता येईल. कार्यक्रमाची सांगता वृक्षांचे जतन करण्याचा संकल्प घेऊन करण्यात आली. या



उपक्रमामुळे निसर्गाचा समतोल राखण्यास निश्चितच मदत होणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमाकरिता सामाजिक कार्यकर्ते जयंत गोमासे, नितीन कवाडे, माजी उपसरपंच राहुल पाटणकर, विशाल नगराळे, मनीष ठाकरे, अंजार शेख, संजय आदमाने, प्रफुल्ल मुंगले, अतुल सगळे, अरुण पवार, गिरीश ठाकरे, सतीश पानखावशे, अमोल उमाटे, नरेश बावणे, इब्राहिम पठाण, गोविंद वानखेडे, जयश्री भट, महानंदा हुलके, अरुणा नगराळे, छाया पेठकर, सतीश खेळकर, राहुल खोब्रागडे, गणेश मसराम, सुरेश काशीकर, प्रकाश कोसरे, प्रतीक वाघमारे आणि सायली आदमने यांनी सहकार्य केले.

## कुटकी तळोदी शिवारात ८.५ फूट लांब आढळला अजगर

**वर्धा** - कुटकी तळोदी शिवारात एका शेतात तब्बल ८.५ फूट लांबीचा अजगर आढळून आला. शेतात काम करत असलेल्या महिला आणि शेतकऱ्यांनी मोठ्या भीतीने आरडा-ओरड केल्यावर लगेचच सर्पमित्र सुनील आत्राम आणि त्यांचे सहकारी विशाल धुर्वे घटनास्थळी दाखल झाले. सर्पमित्रांनी शिताफीने अजगराला सुरक्षितरित्या पकडून वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या सर्पमित्रांनी दिले जीवनदान उपस्थितीत नोंद करून जंगलात सोडून दिले, असे सुनील आत्राम यांनी सांगितले.

त्यांनी अजगराला जीवदान देत परिसरात निर्माण झालेली घबराटही कमी केली.सर्पमित्रांचे वेळेवर दाखल होणे आणि धाडसी प्रयत्नांमुळे हानी टळली. ग्रामस्थांनी सर्पमित्रांचे आभार मानले असून, वन्यजीव संरक्षणासाठी त्यांचे कार्य गौरवास्पद असल्याचे सांगितले.

# हरिरामनगर येथील जीर्ण भिंत प्रशासनाने पाडली

**पुलगाव / जनमाध्यम**

येथील हरीरामनगर मधून श्री टॉकीज कडे जाणाऱ्या रस्त्यावर वळणाच्या ठिकाणी असलेली मिलची जीर्ण भिंत वाहतुकीच्या मार्गावर केव्हाही पडण्याची शक्यता होती. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असल्यामुळे भिंत पडल्यास मोठा अनर्थ घडू शकत होता.

परंतु या भागातील कर्तव्यदक्ष माजी नगरसेवक गौरव दांडेकर यांनी प्रशासनाशी संपर्क करून यावर त्वरित उपाययोजना करण्याची विनंती केली.

नगरपरिषद प्रशासनाने जेसीपी द्वारे भिंतीचा जीर्णभाग काढून टाकला. त्यामुळे या रस्त्याने वाहतूक करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळालेला आहे. या मार्गाने आदर्श हायस्कूल येथील विद्यार्थी



मोठ्या प्रमाणावर आवागमन करतात. त्याचप्रमाणे शहरातील अनेक भागातील नागरिक याच रस्त्याने जाणे-येणे करतात. त्यामुळे केव्हाही धोका घडून येऊ शकत होता. नगरपरिषद प्रशासनाने तातडीने कारवाई करत भिंत पाडल्यामुळे पुलगाव शहरातील नागरिकांनी नगर परीषद प्रशासन पुलगाव आणि सामाजिक कार्यकर्ते गौरव दांडेकर यांचे आभार मानले आहे. मिल प्रशासनाने सुद्धा या भिंतीचा बाहेर आलेला भाग काढून टाकून लवकरात लवकर व्यवस्थित करण्याचे आश्वासन दिले आहे. मिलचे वरिष्ठ अधिकारी महादेवराव कणसे यांनी लवकरच कामाला सुरुवात करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# सर्व दाखल्यांसाठी मुद्रांक शुल्क माफ

## महसूलमंत्र्यांची घोषणा; विद्यार्थ्यांना दिलासा

**वर्धा / जनमाध्यम**

सर्वप्रकारच्या दाखल्यांसाठी जोडाव्या लागणाऱ्या प्रतिज्ञापत्राचे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपर ऐवजी साध्या कागदावर अर्ज करून विविध प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.




जातपडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रीमिलेअर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यांसह शासकीय कार्यालयांत दाखल कराव्या लागणाऱ्या सर्वप्रकारच्या दाखल्यांसाठीच्या प्रतिज्ञापत्रांसाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागत होते. आता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्रे मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा खर्च वाचणार आहे.

दहावी, बारावीच्या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी धांदल सुरू होते. केवळ शैक्षणिकच नाही, तर इतर अनेक कारणांसाठीही दाखले लागतात.

# होमिओपॅथीची माहिती व विश्वसनीयता वाढविणे गरजेचे- डॉ. कविश्वर

## होमिओपॅथीक बाहयरुग्ण केंद्राचे सालोड येथे उद्‌घाटन

**वर्धा / जनमाध्यम**

अलीकडच्या काळात वैद्यकिय उपचाराचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेरचा होत चालला आहे पण स्वताची व कुंटुबियांची काळजी घेण्यासाठी होणाऱ्या खचर्चाकडे दुर्लक्ष करावे लागते अशात माफकदरात उपलब्ध असललली वैद्यकिय सुविधा केवळ होमियोपॅथी मध्ये असल्याने अलीकडे लोकांचा कल हयाकडे वाढलेला आहे, मात्र होमिओपॅथीचे कमी प्रमाणात असलेले दवाखाने आणि विविध आजारांवर उपलब्ध असणारे औषधोपचारांची माहिती व विश्वसनीयता वाढविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन एच.एम.ए. आय. चे मार्गदर्शक डॉ दादासाहेब कविश्वर यांनी व्यक्त केले. डॉ. हॅनिमन यांच्या स्मृतिदिना निमित्य होमिओपॅथीक मेडिकल असोशियशन ऑफ वर्धा व्दारे सालोड (हि) येथे महाराष्ट्र राज्यात पहिले हमिओपथीचे बाह्य रुग्ण केंद्राचे उद्घाटन करतांना बोलत होते. यावेळी मंचावर संत साहित्याचे विचारवंत डा नारायण निकम, ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबु अग्रवाल, वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ अभ्युदय मेघे, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, डा प्रसाद देशमुख होमिओपॅथीक मेडिकल असोशिएशन चे जिल्हाध्यक्ष डॉ दत्ता कुंभारे, उपाध्यक्ष डॉ अनिल लोणारे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.सामाजिक कार्यात काम करतांना संवेदनशीलता जपणे गरजेचे असते सर्वसामान्यांना मदत करण्यांचे त्यांच्या अडचणीवर मात करून सहकार्य करणाचे अनेक उपक्रम होमियोपॅथीक मेडिकल असोशिएशन ऑफ इंडिया वर्धा शाखा अनेक वर्षापासून राबवित आलेले आहे त्याच श्रखंलेत आज हा महत्कार्य असोशियशनच्या वतीने होणे ही एक अभिनंदनीय बाब आहे अशी भावना डॉ नारायण निकम, मोहनबाबु अग्रवाल, इमरान राही, डॉ अभ्युदय मेघ यांनी आपल्या भाषणात नमूद केली.

कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ अनिल लोणारे तर अहवाल वाचन डॉ दत्ता कुंभारे संचालन डॉ. शुभांगी निमकर डॉ. आनंद गाढवकर तर आभार डॉ. विजय चौधरी यांनी मानले.याप्रसंगी मुंबई होमिओपॅथी तज्ञ डॉ. प्रतिभा रवि अय्यलसोमयाजुला यांचा शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ सुचिता कुर्वे, डॉ. रविन्द्र देशमुख, डॉ. मिलीद वासेकर, डॉ. आनंद माढवकर, डॉ प्रशांत खातदेव, डॉ. प्रतिभा रवि आदींनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाला, उप-विभागीय अभियंता विजय नाखले, समाजसेवी राजु लभाणे, दिलीप भागवतकर प्रामुख्याने उपस्थित होते. ॲडव्हन होमिओ फार्मसी व नेचर होमिओपॅथी यांचे सहकार्य लाभले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १३अंक २२२

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/ २०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :**— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल**- atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# कानडा राजा पंढरीचा...











आषाढी एकादशीनिमित्त शहरातील विठ्ठल रूक्मिणी मंदिरात सुंदर आरास करण्यात आली होती. तसेच भाविकांनी हरिनामाचा गजर करून विठ्ठलाला प्रार्थना केली. यावेळी विविध मंदिर प्रशासनाच्यावतीने भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. (छायाः प्रदीप इंगोले)

## एमईआरसी यूटर्नचा राज्याच्या प्रगतीला धक्का



### सर्वांच्या हितासाठी पारदर्शक टिकाऊ आणि न्याय ऊर्जा धोरण राबवा

### पत्रकार परिषदेतून सीएम, डीसीएमला विनंती

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्राला जबरदस्त धक्का बसला आहे. हजारोच्या संख्येने हरकती आणि जनतेच्या विरोध असूनही एम आरईसी ने उद्योग व्यवसाय आणि ग्राहकांच्या हिताकडे दुर्लक्ष करत राजकीय दबाव, कोळसा लॉबी आणि वितरण कंपन्यांच्या फायद्यासाठी निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला जबर धक्का बसला आहे. राज्याच्या हितासाठी पारदर्शक टिकाऊ आणि न्याय उर्जा धोरण राबविण्यात येण्याची मागणी पत्रकार परिषद मध्ये ऑल इंडिया रिनेव्हल एनर्जी असोसिएशन द्वारा करण्यात आली आहे.

एक फेब्रुवरी २०२५ रोजी एमआरसी ने एमएसडीसी एलच्या एमवायटी याचिकेवर हरकती मागवल्या होत्या. हरकत नोंदवणाऱ्यांची संख्या इतकी मोठी होती की आयोगाची वेबसाईट क्रॅश झाली. महाराष्ट्रभर सार्वजनिक सुनावण्या पार पडल्या. ज्यामध्ये अनेक त्रुटी आणि चुकीचे गणित स्पष्ट झाले. २८ मार्च २०२५ रोजी एमआरसी ने तळजोडीतून काहीसा संतुलित आदेश दिला. मात्र तत्काळ एमएसडीसीएल ने हिशोबातील चुकावरून स्थगितीची मागणी केली आणि नव्याने याचिका सादर करण्यासाठी वेळ मागितला. यानंतर एमएआरसी ने सार्वजनिक प्रक्रिया न करता एम एसडीसीएलची सुधारित याचिका स्वीकारली आणि २५ जून रोजी नवीन आदेश जारी केला हा निर्णय आधीच्या सुनावण्या हरकती आणि प्रक्रियात्मक नियमांना झुगारून दिला गेला असून आयोगांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह यामुळे निर्माण झाले. उद्योगांनी व्यवसायावर याचा परिणाम झाला. सर प्रकल्प दहा किलो वॅट पेक्षा जास्त असणाऱ्यांना नाही मिळणार. परिणाम स्वरूप उद्योगांना महागड्या दराने वितरण कंपन्यांकडून वीज खरेदी करावी लागेल. यामुळे उत्पादन खर्च वाढेल. स्पर्धात्मकता कमी होईल आणि अनेक उद्योगांना इतर राज्यात स्थलांतरित व्हावे लागेल. औद्योगिक स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी रोजगार आणि महसूल कमी होण्याची शक्यता, नवीन गुंतवणुकीवर नकारात्मक परिणाम होणार आहे. सार्वजनिक प्रतिनिधीच्या आणि क्षेत्रीय तग्यांच्या नुकत्या झाल्यानंतर नवीन निर्णय होणे गरजेचे आहे. उद्योग, व्यापार आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी यावर विचार करणे गरजेचे आहे यासंदर्भात ८ जुलै रोजी कलेक्टर सोबत बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऊर्जामंत्री यांनी यामध्ये हस्तक्षेप करावे अशी विनंती पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे औद्योगिक विकासाचे चक्र थांबू नये महाराष्ट्राचे सामर्थ्य अशा चुकीच्या धोरणामुळे कमी होऊ नये म्हणून यावर तात्काळ कार्यवाहीची गरज असण्याची मांगणी केली आहे.

पत्रकार परिषद मध्ये मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष रणजीत बंड, हॉटेल असो चे बिट्टू सलूजा, सारंग राऊत, बीपीसीएल असो चे जगताप, एनर्जी असोचे विवेक यादव आशिष पेठे व सदस्य उपस्थित होते.

## ‘त्या’ कर्मचाऱ्याला ९ तास ताटकळत ठेवल्याचा आरोप

**अचलपूर/वार्ताहर**

नगर परिषद आरोग्य विभागाचे कर्मचारी व वॉर्ड जमादार अब्दुल शहीद अब्दुल कदिर (५१, रा.आयेशा कॉलनी ,परतवाडा ) हे प्रभागात साफसफाईचे काम करीत असताना त्यांच्याशी शिवीगाळ व गैरवर्तन केल्याची घटना हिरापुरा भागात गुरवारी सकाळी घडली आहे .याबाबत तक्रार देण्यासाठी गेलेल्या या कर्मचाऱ्याला अचलपूर पोलीस स्टेशन मध्ये ९ तास ताटकळत बसावे लागले.

तसेच घटनेची तक्रार नोंदविताना नावातही चूक केल्याचे त्यांचे म्हणणे आहे .

अचलपूर नगरपरिषदेच्या वतीने ३ जुलै रोजी नगरपरिषदेचे वार्ड जमादार अब्दुल शहीद अब्दुल कदीर हे साफसफाईच्या कर्तव्यात होते. हिरापुरा प्रभाग क्रमांक १५ व १८ येथे साफसफाई कामे सुरू होती. ट्रॅक्टरद्वारे कचऱ्याचे ढीग भरताना शेख शकील शेख अजीम(५५, रा. हिरापुरा)हा तेथे आला.माझ्या घराजवळ बकऱ्याचा चाऱ्याचा कचरा पडला आहे.तो उचलून घेऊन जा ,असे म्हणताच शकीलचा पुतण्या शेख सलमान शेख उसमान (३५) यांने अब्दुल शहीद यांना शिवीगाळ करून गैरवर्तन केल्याचे तक्रारीत नमूद आहे . त्यामुळे अब्दुल शहीद अब्दुल कदीर हे अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यास सकाळी ९ वाजता पोहोचले.

परंतु अब्दुल शहीद अब्दुल कदीर यांना सकाळी ९ पासून सायंकाळी ६ पर्यंत पोलिस ठाण्यातच बसवून ठेवले. सायंकाळी ६ वाजता तक्रार घेऊन त्यांना जाण्यास सांगितले. तब्बल ८ तास आपल्याला व आपल्यासोबत तिन्ही आरोग्य निरीक्षकास पोलिसठाण्यात बसवून ठेवल्याचे त्यांनी म्हटले व नावातही चूक केल्याचे अब्दुल शहीद अब्दुल कदिर यांचे म्हणणे आहे.

दुसऱ्या दिवशी आरोग्य निरीक्षकांना घेऊन पोलिस ठाण्यात पोहोचले असता अचलपूर पोलिसांनी एनसीआर कॉपी दिल्याचे अब्दुल शहीद अब्दुल कदीर यांचे म्हणणे आहे.

## संक्षिप्त

### ग्रंथालयाला पुस्तके भेट



**अचलपूर -** आषाढी एकादशी निमित्त लायन्स क्लब अचलपुरचा सहकार्याने विरेंद्र कोकाट, ग्रामविकास अधिकारी काकडा व गजानन बरले, ज्युली बरले यांच्याकडून अचलपूर शहरातील भागवताचार्य पंडित नंदकीशोर शर्मा सार्वजनिक ग्रंथालयाला विविध प्रकाशनाचे २०० पुस्तके सप्रेम भेट म्हणून देण्यात आली. यामुळे विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होऊ शकणार आहे. यावेळी नितिन सुंभाटे , लायन्स क्लबचे अध्यक्ष पंकज शर्मा, शैलेश लोखंडे, पंडित गजानन शर्मा, सुनिल ठाकरे, कीशन श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

### रामकृष्ण क्रीडा विद्यालयात विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव उत्साहात



**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती द्वारा संचालित श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालय येथे २३ जून रोजी शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले, तर सर्व उपस्थित विद्यार्थ्यांवर गुलाबाच्या पाकळ्यांचा वर्षाव करत नवीन शैक्षणिक सत्राच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी संपूर्ण शाळा परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता, तसेच सर्व वर्गखोल्या फुलांनी सुशोभित करण्यात आल्या होत्या. शाळेच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शाळेचे माजी प्राचार्य आदरणीय मोहड व माजी शिक्षक आमले सर यांना विशेष आमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी नव्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या. प्राचार्या वाडेगावकर , उपप्राचार्या आडे व पर्यवेक्षक खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत सुयोजित पद्धतीने पार पडला. संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकररावजी वैद्य व सचिव डॉ. माधुरी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व यशस्वी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे सचिव माननीय श्री खांडेकर सर व कोळेश्वर सरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक सत्राच्या शुभेच्छा दिल्या. श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालय हे अमरावतीतील एक नामांकित विद्यालय असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण – ज्ञानात्मक, बौद्धिक व क्रियात्मक – विकासासाठी सातत्याने उपक्रमशील राहते. प्रवेशोत्सवाने नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अतिशय उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात झाली.

### हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘एक पेढ माँ के नाम’



**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय अमरावती मध्ये एक पेढ माँ के नाम या उपक्रम अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालया च्या परिसरात विविध प्रजाती च्या वृक्षांची लागवड करण्यात आली. श्री हव्याप्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य साहेब व सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांचे मार्गदर्शन व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजली राऊत यांचा पुढाकार व प्रमुख उपस्थिती मध्ये डॉ. रंजीत केवले, डॉ. मिलिंद अनासाने, डॉ. राजश्री शेळके, प्रा. कांचन सानप, प्रा. सागर मोहितवार, प्रा. स्वप्नील निमकर्डे, निलेश झाडे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजने चे कार्यक्रम अधिकारी डॉ. नचिकेत राठोड, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पुष्पजा सौदागरे व सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पराग अकर्ते व स्वयंसेवकांचा सहभाग होता.

## महावितरणमध्ये अपघातशुन्य काम करा- निलेश उईके




महावितरण अधिकारी व कर्मचारी यांचा निरोप व सत्कार

**तिवसा/वार्ताहर**

सध्या परिस्थितीत महावितर ण मध्ये अधिकारी व कर्मचारी आपल्या ईच्छुकस्थळी बदली करत नवीन जागेच्या कार्यक्षेत्रात विराजमान होतात मात्र तेथिल परिस्थिती आपल्याला अवगत नसते तेथील परिस्थितीवर मात करत आपण कधी कधी फार तणावपूर्ण वातावरणात असतो त्यामुळे तणावरहीत काम न करता अपघात शुन्य काम कसे करता येईल याकडे लक्ष देऊन आपल्या कंपनीसह कुटुंबाची काळजी घेत रहा, असे मार्गदर्शन महावितरण तिवसा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश वि. उईके यांनी अधिकारी कर्मचारी यांच्या निरोप समारंभ व सत्कार सोहळ्यात आपल्या कर्मचाऱ्यांना केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जे जनमित्र काम करता करता तसेच दिर्घ आजाराने दुःखद निधन अशांना मौन श्रद्धांजली देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी प्रत्येकांनी आपले अनुभव कथन केले. निरोप व सत्कार सोहळ्यात मडावी, आश्विनी पंडित, मनिष रामेकर, साहेबराव बावणे, वांगे, सुष्मा रायकर, गजानन सोळंके, सचिन रूंदे, रोशन गवळी, निलेश कडव, प्रफुल्ल उईके, सारिका खडसे, चेतन जामोदकर, कीरण निळे यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तिवसा शहर चे सहाय्यक अभियंता मीश्रा व श्रिकांत संत यांनी कर्मचाऱ्यांना आपल्या कामाप्रती अपार चिकाटी ठेवून काम करा असे अवगत केले. प्रास्ताविक अभिजीत केचे संचालन हर्षल राऊत यांनी केले. यशस्वीतेसाठी जीवन आडे, सलीम शहा, आशिष सावंत, मनोज बनारसे, महेश साबळे, ठवकर, सोळंके, वैभव चिंचखेडे, गौरव खाकसे, रोहीणी उमप, राऊत, कडू आदींनी परिश्रम घेऊन प्रथमच असा विलक्षण क्षण घडवून आणत सर्वांना आनंदमय सोहळा पार पडला.

## विश्रोळी पूर्णा प्रकल्पाचे २ गेट ५ सेमीने उघडले



**अमरावती/का.प्र.**

तालुक्यातील विश्रोळी येथील धरण ५ जुलैला दुपारी १ वाजता ५७. २० टक्के धरण भरले असल्याने या धरणाचे २ गेट ५ सेमीने उंच केले असून त्यामधून पाणी पूर्णानदीच्या पात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

चांदूरबाजार तालुक्यात पावसाची सुरुवात झाली असल्याने पावसामुळे प्रकल्पात येव्याच्या प्रमाणात काही वाढ झाली असून पाणीसाठ्यात ५७. २० टक्के धरण भरल्याने पूर्णा प्रकल्पाचे दोन गेट ५ सेमीने उंच करून पाण्याचा विसर्ग पूर्णानदीत सोडण्यात येत असल्याने सर्व नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाआहे. पूर्णा मध्यम प्रकल्प विश्रोळी येथील शनिवारी दुपारी २ वाजता धरण प्रचलन सूचीनुसार एकूण ९ दरवाजांपैकी २ दरवाजे उंची ५ से. मी. उघडून पाणी पूर्णा नदीपात्रात सोडण्यात आले.

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या ५ ३ २ विद्यार्थ्यांचा देशांतर्गत अभ्यास दौरा



**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावतीतर्फे यंदाही भव्य अशा निःशुल्क देशांतर्गत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेला हे साध्य झालेले नाही, अशा या उपक्रमातून पाटील एज्युकेशनल ग्रुपमधील एकूण ५३२ गुणवंत विद्यार्थ्यांना विमान प्रवासाचा अनुभव देत त्यांना नामांकित कंपनी तसेच उद्योग व शिक्षण संस्थांना भेटी आयोजित करण्यात आल्या आहेत . विशेष म्हणजे यंदाच्या दौऱ्यात विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच मायक्रोसॉफ्ट या बहुराष्ट्रीय कंपनीला भेट देण्याची संधी मिळणार असून पोटे ग्रुपचे विद्यार्थी ठरले मायक्रोसॉफ्टमध्ये शैक्षणिक भेट देणारे विदर्भातील पहिले आणि एकमेव..!

यंदाचा अभ्यास दौरा १० पासून ते ३० जुलै २०२५ पर्यंत विविध टप्प्यांत पार पडणार आहे. इंजिनिअरिंग, एमबीए, एमसीए, फार्मसी, कृषी, आर्किटेक्चर, नर्सिंग व बीएएमएस विभागातील विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची या दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या विमान प्रवासाची, पंचतारांकित हॉटेलमधील निवासाची, नामांकित उद्योग व संस्थांना भेट देण्याची व पर्यटनाची संपूर्ण जबाबदारी संस्थेने उचलली असून उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेतून ह्या उपक्रमाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून गेली अनेक वर्षे ही परंपरा संस्थेने सातत्याने जपली आहे. महाविद्यालयाचे व्यवस्थापक, प्राचार्य व संपूर्ण शिक्षकवर्गांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या असून या ऐतिहासिक उपक्रमासाठी उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील यांना विशेष धन्यवाद व्यक्त करण्यात आले.

# मोटरसायकल व स्कूटीचा अपघात, युवक ठार

## महिलेसह दोन तरुणी गंभीर जखमी





**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी ते सिंभोरा रोडवरील नशीदपूर फाट्याजवळ मोटरसायकल व स्कुटीच्या आमने-सामने झालेल्या धडकेत एका २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून एका गर्भवती महिलेसह दोन तरूणी गंभीर आहेत. जखमींना एक्झॉन हॉस्पिटल अमरावती येथे हलविण्यात आले आहे. हा अपघात आज दि.६ जून रोजी सायंकाळी ६ वाजताचे सुमारास झाला.

मृतक तरुणाचे नाव नकुल राजेश नवले (वय २३,रा.अंतोरा,जि.वर्धा) असे आहे. तर करिष्मा भीमराव रामटेके (वय ३२, रा. वरुड),महिमा प्रदीप भोकरे (वय २५, रा. अमरावती) व दिपाली हरिदास पाटील (वय २३, रा.ब्राह्मणवाडा भगत) असे जखमींचे नाव आहे. यातील एक महिलेसह दोन तरुणी इसाफ बँक मोर्शी येथे कार्यरत असून या तिघी मैत्रिणी आज रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे आपली स्कुटी क्र.एम. (पान २ वर)


अप्पर वर्धा धरण मार्गावरील घटना

# जुन्या वादातून कुत्र्याला निर्दयतेने मारहाण

## हल्लेखोरांवर कारवाईची मागणी

### असदपूर येथील घटना



**अचलपूर/प्रतिनिधीः-** गावातील दोन जणांचा जुना वाद होता. या वादात दोन व्यक्तींनी विरोधकाच्या कुत्र्याला लोखंडी पाईप, काडी, कुऱ्हाड याने निर्दयतेने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना तालुक्यातील असदपूर येथे घडली. याबाबत असतपूर पोलीस स्टेशनला फिर्यादही देण्यात आलेली आहे

प्राप्त माहितीनुसार अचलपूर तालुक्यातील असदपुर येथील रहिवाशी असलेले गोकुळ पाठक यांचा गावातीलच धन आणि धावट ह्यांचेशी जुना वाद होता. पाठक हे शेतात काम करत असताना त्यांना फोन आला की तुमच्या बावऱ्या नावाच्या कुत्र्यावर धन आणि धावत या दोन व्यक्तींनी कुऱ्हाडीने वार केले व दुसऱ्याने लोखंडी शिकणे मारहाण करून गंभीर जखमी केले आहे. ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले तेव्हा (पान २ वर)

आपण माणसांची दुश्मनी समजू शकतो. पण एखाद्या मानवाचा बदला मुक्या प्राण्यावर काढावा ही अत्यंत दुर्दैवी घटना असून धन व घावट या क्रूरकर्म्यांना पोलिसांनी त्वरित अटक करावी. **-उषा पानसरे (पशुप्रेमी ) असदपूर**

■ माझ्या बावड्या नावाच्या कुत्र्यावर धन व घावट यांनी दुश्मनी काढली. त्याला मी घरी नसताना कुऱ्हाडीने आणि लोखंडी पाईपाने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्याच्या मानेवर पोटावर डोळ्याजवळ कुऱ्ह ाडीच्या गंभीर जखमा आहेत. मी आलो त्यावेळेला तो मरणासन्न होता. केविलवाण्या डोळ्यांनी बघत होता. यासंदर्भात मी रीतसर पोलीस स्टेशनला फिर्यादी दिलेली आहे. सदर दोघा क्रूरकर्म्यांवर पोलीसांनी कडक कारवाई करावी. **-गोकुळ पाठक, असदपूर**

# विठ्ठल नामाच्या जयघोषात पार पडले युवक कॉंग्रेसचे शहर स्वच्छता अभियान

## आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल-रुख्मिणी मंदिर परिसराची स्वच्छता




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरुद्ध अमरावती शहर युवक कॉंग्रेसने 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे. राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१९ जून पासून या (पान २ वर)

# जि.प.उर्दु शाळेत शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

## शाळेतुन नाव कमी करण्याची वेळ पालकांवर

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवणे ही एक मोठी आव्हानात्मक गोष्ट ठरली आहे. त्यामुळे सरकारकडून जिल्हा परिषद शाळा व्यवस्थित सुरू ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. तरीही या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढताना दिसत नाही.

या शाळा मुख्यतः गरिब कुटुंबातील मुलांवर आधारित आहेत, जे पालक त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करण्याची आर्थिक क्षमता ठेवत नाहीत. मात्र आता हे पालकही त्यांच्या मुलांच्या भविष्यासंदर्भात चिंतेत आहेत. याचे प्रमुख कारण तालुक्यातील जिल्हा परिषद उर्दू शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याचे समोर आले आहे.

शासनाने दिलेल्या सुविधा प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना मिळत नाहीत. त्यामुळे पालक त्यांच्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत घालण्यास इच्छुक नाहीत. परिणामी, विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असून, शिक्षकांच्या अभावामुळे या शाळांचे अस्तित्व धोक्यात आला आहे.

या परिस्थितीत काही पालकांनी आपली मुले उर्दू माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेतून काढून घेतली असून, जोपर्यंत नवीन (पान २ वर)

■ 'जिल्ह्यातील पवित्र पोर्टवर नवीन शिक्षकांची नियुक्ती झाली आहे. त्यातील उर्दू माध्यमाच्या शिक्षकांची नियुक्ती अंजनगांव तालुका मधील जिल्हा परिषद शाळांमध्ये व्हावी यासाठी मी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला आहे.' **-सुधीर खोडे,** प्रभारी गटशिक्षण अधिकारी, अंजनगाव सुर्जी.

# शोषण करायचं अन् कंपनीराज आणायचं हे सरकारी षडयंत्र - बच्चू कडूंचा घणाघात

## सोमवारपासून 'सातबारा कोरा करा' पदयात्रा

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** देशात आणि राज्यात राजकीय, धार्मिक आणि जातीय ध्रुवीकरणाच्या सावलीत शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची हत्या होत असल्याचा घणाघात प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केला आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हिंदू म्हणून एकत्र येऊ शकतात, मराठा-ओबीसी एक होऊ शकतात, तर शेतकरी-शेतमजूर एकत्र का येऊ नयेत?, असा थेट सवाल बच्चू कडू यांनी केला. ते आज रविवारी स्थानिक विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.




सोमवार, ७ जुलैपासून १३८ किलोमीटरची सातबारा कोरा करा, ही पदयात्रा काढण्यात येत आहे. या यात्रेच्या तयारीसाठी कडू आज यवतमाळ येथे आले होते. भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ ( जि. अमरावती) येथून सुरू होणाऱ्या या यात्रेचा समारोप महाराष्ट्रातील पहिली शेतकरी (पान २ वर)

### ■ सरकारने भाकड गायींसाठी काय धोरण आणलं?

भाजप इतका हुशार दुसरा कोणताही पक्ष नाही. पण तरीही निवडणुकीआधी हिंदी सक्ती का केली? या षडयंत्राचे संशोधन व्हावे, असे कडू यावेळी म्हणाले. गाय वाचवण्याच्या घोषणा देणाऱ्या सरकारने भाकड गायींसाठी काय धोरण आणलं? प्रभू श्रीरामाची शपथ घेऊन सत्तेवर बसल्यावर जबाबदारी कुणाची?, अशी थेट टीका त्यांनी केली.

# पोलीस आयुक्त चावरीया यांना रोटरी क्लब अंबिकाचे मानद सदस्यत्व

## क्लबतर्फे पिन प्रदान करून सन्मान, सामाजिक उपक्रमांची माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने नुकतेच अमरावतीचे पोलीस आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारलेले अरविंद चावरीया यांचे रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकातर्फे औपचारिक स्वागत करण्यात आले. या प्रसंगी क्लबने त्यांना सन्मानपूर्वक 'मानद सदस्यत्व' बहाल करत, रोटरीची पिन प्रदान केली.

स्वागत समारंभात क्लबचे अध्यक्ष रोटेरियन अमोल चवणे व सचिव रोटेरियन डॉ. लोभस




घडेकर यांनी पोलीस आयुक्तांचे हार्दिक स्वागत करत त्यांना क्लबचे कार्य, समाजाभिमुख प्रकल्प व भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. क्लबने अलीकडील काळात आरोग्य, शिक्षण, महिला सबलीकरण, पर्यावरण (पान २ वर)

# अंदाजपत्रक फलक लावण्याचा नगरपालिका प्रशासनाला विसर

## अंजनगाव नगरपरिषद अंतर्गत कोटींची कामे सुरू

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी** - अंजनगाव शहराच्या वेगवेगळ्या रस्त्यांवर सध्या नगपालिकेच्या बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य अशा विभागांमार्फत अनेक विकास कामे सुरू आहेत; पण या कामांची माहिती देणारे फलक लावण्याचे विस्मरण नगरपालिकेच्या सर्वच विभागांना झाले आहे. शहरातील सर्व कामांच्या ठिकाणी संबंधित नगरपरिषदच्या कामाचे स्वरूप, काम पूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी, कंत्राटदाराचे नाव, नगपालिकेच्या अधिकाऱ्यांचे नाव आणि संपर्क क्रमांक असे माहिती




फलक लावण्याच्या सूचनांकडे नगरपालिकेने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. नगरपरीषदेचा हा कामचुकारपना की परीषदेकडुन जनतेची डोळेझाक असा प्रश्न निर्माण झाला आहे.

लोकसभा, विधानसभा निवडणुका झाल्यामुळे अनेक कामे थांबली होती. निवडणुका संपल्यानंतर शहराच्या अनेक भागांत प्रलंबित विकासकामांना गती देण्यात आली आहे. यामध्ये नगपालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, अशा महत्त्वाच्या विभागांची (पान २ वर)

■ साईधाम नगरातील सिमेंट कॉंग्रेट रस्त्यांचे काम होऊन एक महिना होत आला असून वारंवार बांधकाम अभियंता यांना बांधकामांचे फलक लावण्यासाठी सूचना दिल्या. मात्र अजून फलक लावण्यात आले नाही. **-धिरज नवले, साईधाम नगर**

■ नगरपरिषदेने रस्ते सुरक्षा धोरणांतर्गत एखाद्या ठिकाणी काम सुरू असल्यास त्याची सर्व माहिती नागरिकांसाठी जाहीर फलकावर लावणे बंधनकारक आहे.नगरपरिषदेचे हे धोरण कागदावर तयार असले, तरी त्याची अंमलबजावणी नगरपरिषद प्रशासक राज असल्याने करताना दिसत नाही.

# केकमध्ये गुंगीचं औषध देऊन भाचीचा केला विनयभंग

## मानलेल्या मामाचा प्रताप

### वडिलांना अश्लील फोटोच्या बदल्यात १० लाखांची खंडणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** एका विश्वासघातकी मानलेल्या मामाने केकमध्ये गुंगीचं औषध देऊन भाचीचा विनयभंग केला. एवढ्यावरच न थांबता अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्या वडिलांकडे १० लाखांची मागणीही केली. ही संतापजनक घटना समोर आल्यानंतर राजापेठ पोलीस ठाण्यात ३८ वर्षीय नागपूरस्थित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडित तरुणीच्या सांगण्यानुसार, तिची आणि आरोपीची ओळख डिसेंबर २०१९ मध्ये एका कौटुंबिक कार्यक्रमातून झाली. घरचा मानलेला असल्याने त्याच्याशी संवाद सुरू राहिला. डिसेंबर २०२१ मध्ये (पान २ वर)




# आषाढी एकादशीचा उत्सव, टाळ मृदंगाचा गजर

## विदर्भाचे पंढरपूर कौंडण्यपूरात लाखो भाविकांची मांदियाळी





**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथे आषाढी एकादशी निमित्त लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कृष्ण देवाने माता रूक्मिणीचे हरण ज्या ठिकाणाहून केले होते त्या कौंडण्यपूरला विदर्भाचे पंढरपूर म्हणतात. रविवारी ६ जुलैला आषाढी एकादशीला येथील विठ्ठल रूक्मिणी संस्थानात मोठा उत्सव भरला. टाळ मृदंगाचा गजर, महिलांतर्फे गायली जाणारी विठ्ठलाची गाणी व भजने,कदमताल करित चालणारे भक्त असे या मंदिर परिसरात चित्र होते.संस्थानचे अध्यक्ष ना.बा.अमाळकर, इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जेष्ठ विश्वस्त सत्यनारायण चांडक यांनी पहाटे ६ वाजता सपत्नीक विठ्ठल रूक्मिणीची महापुजा व अभिषेक केला.त्यानंतर भक्तांसाठी मंदिर खुले केले.रात्रीचे ८ वाजले तरीही भाविकांची गर्दी कायम होती.